29-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

ABG/ 13:00

29-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

ABG/ MHM/ SBT/ 13:00

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

उल्हासनगर शहरात ६१० लिटर केरोसिनचा जप्त केलेला अवैद्य साठा

(१) * १७०७ श्री. अनंत तरे : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि-ांज ८ जानेवारी, २००५ च्या सुमारास उल्हासनगर शहरात ६१० लिटर केरोसिनचा अवैद्य साठा जप्त करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत "

श्री. सुनिल तटकरे : (१) अंशत: खरे आहे. दिनांज ६-१-२००५ रोजी उल्हासनगर येथे एकूण ६१० लिटर निळ्या व सफेद केरोसिनचा अवैध साठा जप्त करण्यात आला.

(२) होय.

(३) या दोन्ही प्रकरणी केरोसिनचा अनधिकृत साठा करणाऱ्या निशा एजन्सीचे मालक श्री.जयराम जेठानंद मलानी व पुष्प इंडस्ट्रीजे मालक श्री.दिपक धनशाम कालरा यांच्याविरुध्द पोलीसांकडे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही अनाधिकृत व्यापाऱ्यांना अटक करण्यात आली होती, सध्यस्थितीत दोन्ही आरोपी जामिनावर मुक्त आहेत. चौकशीअंती दोन्ही परवानाधारकांचे फ्रिसेल केरोसिन परवाने निलंबित करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमाल शासन जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर प्रकरणाचा पोलीस तपास अद्याप सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

२९-०३-२००५ (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-२

ABG/ MHM/ SBT/ १३:००

ता.प्र.क्र.1707...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय,गेल्या आठवडयात अशाच प्रकारचा प्रश्न या सभागृहात उपस्थित झाला होता. सभापती महोदसय, एका बाजूला स्वस्त धान्य दुकानात केरोसिन मिळत नाही. महिलांना केरोसिन मिळण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत आणि दुस-या बाजूला अशा प्रकारे केरोसिनचा अवैध साठा सापडत आहे. सभापती महोदय, उल्हासनगर शहरात गेल्या काही दिवसापासून केरोसिनची टंचाई भासत आहे. अशी परिस्थिती असताना उल्हासनगर येथे 610 लिटर केरोसिनचा अवैध साठा सापडला आहे. मागील आठवडयात अशाच प्रकारचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता त्यावेळी लक्झरी बस जप्त केली होती, नंतर ती सोडून देण्यात आली अशा पध्दतीची कारवाई केली गेली. परंतु या ठिकाणी तशी कारवाई केली गेलेली दिसत नाही. हा गुन्हा 6.1.05 रोजी उघडकीस आलेला आहे. जवळपास या गुन्हयास तीन महिने होत आलेले आहे. परंतु याबाबतच्या चौकशीत काहीही आढळून आले नाही असे उत्तर वाचल्यावरुन दिसून येते. या व्यक्तींकडे केरोसिन कुठून आले याचा शोध विभागाने घेतलेला नाही. या प्रकरणी संबंधित दोन व्यक्तींचे फक्त परवाने रद्द केले आहेत. तसेच या दोघा व्यक्तींना अटक केली आहे. सदर व्यक्तींना कोर्टाने जामीन देऊन सोडले आहे. आपण या दोघा व्यक्तींचे लायसन्स निलंबीत केले आहे त्यास हिअरींग देऊन स्टें दिला आहे काय ? हा अवैध केरोसिनचा साठा प्रत्यक्षात कुठे सापडलेला आहे ? या परिसरातील जे शिधा वाटप निरीक्षक आहेत त्यांच्यावर या अनुषंगाने काय कारवाई केली आहे ? हा साठा सदर व्यक्तीने कोठून आणला ? त्याने सदर केरोसिन साठा कोठून विकत घेतला यासंबंधीचा तपास केला आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, दिनांक 6.1.05 रोजी स्टेशन रोड उल्हासनगर येथे पुष्प इंडस्ट्रीज आहे, त्या इंडस्ट्रीजमध्ये स्टोव्हचे बर्नल तयार केले जातात. त्या इंडस्ट्रीजच्या ठिकाणी विना परवाना बेकायदेशीर साठा केल्याचे आढळून आलेले आहे. बस किंवा इतर ठिकाणच्या आवारात साठा पकडण्यात आलेला नाही. सदर कंपनीच्या आवारात हा अवैध साठा पकडण्यात आलेला आहे. केरोसिनचा जो अवैध साठा जप्त केला गेला त्यात 440 लिटर हे सफेद केरोसिन जप्त करण्यात आले आहे तसेच 60 लिटर निळे केरोसिन जप्त करण्यात आलेले आहे. या कंपनीचा चालक श्री.दीपक धनशाम कालरा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन,उल्हासनगर येथे गुन्हा दाखल केलेला आहे. दिनांक 10.1.05 रोजी त्यांना कोर्टाने जामीनवर सोडलेले आहे. सदर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1707...

श्री.सुनील तटकरे...

केरोसिन हे श्री. जयराम जेठानंद मलानी या केरोसिन विक्रेत्याकडून त्यांना मिळाले. श्री. मलानी यांच्याकडे केरोसिन परवाना होता तो देखील जप्त करण्यात आला असून त्यांना देखील या प्रकरणी अटक करण्यात आली होती. अशा पध्दतीने जी कारवाई करावयाची होती ती विभागाने केलेली आहे. बाकीच्या कामाच्या बाबतीत पोलीस तपास चालू आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा स्टे देण्यात आलेला नाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, नवीन मुंबईत अशाच प्रकारचा केरोसिनचा अवैध साठा जप्त केला व त्या अनुषंगाने सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. आज अवैध केरोसिनच्या साठयाबाबत उल्हासनगर शहराचा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला आहे.ठाणे जिल्हयात मोठया प्रमाणात अवैध केरोसिनचे साठे सापडत आहेत. आपल्या खात्यातर्फे भरारी पथके नेमण्यात आलेली आहेत. या ठिकाणी देखील भरारी पथकाची नेमणूक केली गेलेली असेल. या प्रकरणात भरारी पथकातील ज्या अधिका-याने कामचुकारपणा केला असेल त्या अधिका-यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, हा एक वेगळा कारखाना आहे. या कारखान्यात बर्नल तयार करण्याचे काम केले जाते. आमच्या विभागाच्या शिधा वाटप निरिक्षकांनी त्या ठिकाणी जाऊन हा अवैध केरोसिनचा साठा जप्त केलेला आहे. जप्त केलेल्या केरोसिनमध्ये 440 लिटर पांढरे आणि निळे 60 लिटर केरोसिन जप्त केलेले आहे. तसेच संबंधित व्यक्ती विरुध्द कारवाई केलेली आहे. या व्यक्तींना अटक देखील करण्यात आलली असून त्यांचे विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि याबाबतचा पुढचा तपास पोलिसांमार्फत चालू आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1707 पुढे सुरु ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, या दोन्ही प्रकरणी केरोसिनचा अनधिकृत साठा करणा-या निशा एजन्सीचे मालक श्री. जयराम जेठानंद मलानी व पुष्प इंडस्ट्रीजचे मालक श्री. दिपक धनशाम कालरा यांच्याविरुध्द पोलिसांकडे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही अनधिकृत व्यापा-यांना अटक करण्यात आली होती. म्हणजे साठा जप्त केलेला आहे आणि गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. मुद्देमाल मिळालेला आहे.जामिनावर सुटले आहेत तो कोर्टाचा मुद्दा आहे. असे असताना पोलीस तपास चालू आहे म्हणजे आणखी कसला तपास चालू आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, यापूर्वी मा. सदस्य श्री. तरे यांनी प्रश्न विचारला होता की, 610 लिटर निळया व सफेद केरोसिनचा साठा कुठून आला ? याबाबतचा पोलीस तपास चालू आहे. फ्री सेलचे रॉकेल आहे ते उपलब्ध आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेंगुर्ले तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) ग्रामपंचायत तुळस यांच्या गैरकारभाराची चौकशी

(२) * ४८१३ मेजर सुधीर सावंत : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ले तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) ग्रामपंचायत तुळस यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २००५ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने या प्रकरणातील दोषी व्यक्तींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, या प्रकरणी चौकशी करण्यात आली नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता: (१) होय.

(२) या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग मार्फत चौकशी करण्यात आली आहे. तक्रारीत नमूद सर्व रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली असून त्याचे मुल्यांकन कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, कुडाळ यांनी प्रमाणित केले आहे.

(३) व (४) ज्ञामे पूर्ज झाली असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मेजर श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांना जादा अधिकार देण्याची भूमिका निश्चितपणाने स्वीकारार्ह आहे. पण यात अधिकारी,सरपंच आणि कार्यकर्ते मिळून भ्रष्टाचार करीत आहेत हे नाकारता येत नाही. त्यातीलच हे एक उदाहरण आहे. ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनीच प्रमाणित केले आहे अशा प्रकारचे उत्तर आहे. 60-70 हजार रुपयांचा रस्ता दुरुस्तीचे काम झाले आहे. डांबरी रस्ता रिपेअर करण्याचे ग्रामपंचायतीने केव्हापासून सुरु केले आहे ? हा पैसा प्रत्यक्षात योजनेवर खर्च झालेला नाही. बोगस चौकशी झालेली आहे. अधिकारी आणि सरपंच यांचे साटेलोटे आहे. म्हणून याची पुन्हा चौकशी होण्याची आवश्यकता आहे. तेव्हा शासन याप्रकरणाची फेरचौकशी करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा रस्ता डांबराचा नाही. या रस्त्यावर दुरुस्तीचे काम झाले होते. अंदाजपत्रक तयार केल्यानंतर झाले आहे.

मेजर श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, रस्त्याच्या डांबरीकरणासाठी किरकोळ दुरुस्ती केली जात होती. ती कशा प्रकारे करण्यात आली हे मला माहीत नाही.डांबरी रस्त्याची किरकोळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4813 पुढे सुरु..

मेजर श्री. सुधीर सावंत..

दुरुस्ती ग्रामपंचायत केव्हापासून करते ? हरिजन वाडी-काजरमोळी रस्ता दुरुस्ती,आजतळी-वेंगुर्ला रस्ता दुरुस्ती ,वाघेरी मेनरोड रस्ता दुरुस्ती,देउळवाडा रस्ता दुरुस्ती ,गिरा कालवा ते वाघेली रस्ता दुरुस्ती,तुळस मुख्य रस्ता ते गोरेवाडी रस्ता दुरुस्ती ,गिरा ते ब्राम्हणतळ रस्ता दुरुस्ती या कामाची पुन्हा चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. शासन पुन्हा चौकशी करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या कामाची पुन्हा चौकशी करु.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मूल्यांकन प्रमाणित करण्याचे अधिकार कनिष्ठ अभियंत्यांना नाहीत. ते उपअभियंता यांना आहेत.मोजमाप कनिष्ठ अभियंता घेतो.मूल्यांकन दाखला उपअभियंता देतो. कायद्यात तशी तरतूद आहे. शासनाने कायद्यामध्ये अशी काही दुरुस्ती केली आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कायद्यामध्ये कोणतीही दुरुस्ती केलेली नाही. या प्रकरणाची फेर चौकशी करु. अंदाजपत्रक कनिष्ठ अभियंता यांनी तयार केले होते. चुकीचे आहे त्यामुळे पुन्हा चौकशी करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहामध्ये विविध माध्यमातून शासनाकडून जी उत्तरे येतात त्यामध्ये सुरुवातीला आम्हांला उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय असे विचारावे लागते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड

ता.प्र.क्र.4813..श्री.रावते..

सन्माननीय सदस्य श्री,प्रमोद नवलकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती त्यावरील चर्चेच्या वेळी सुध्दा उत्तरात दुरुस्ती करावी असे त्यांनी सांगितले होते. आता माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले आहे की अधिका-यांनी असे चुकीचे उत्तर लिहून दिलेले आहे ज्युनिअर इंजिनिअर यांनी या कामाचे मुल्यांकन प्रमाणित केलेले आहे.तेव्हा ज्या अधिका-याने चुकीचे उत्तर लिहून दिलेले आहे त्यांच्याविरुध्द काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी तसे म्हटलेले नाही.या कामाचे ज्युनिअर इंजिनिअर यांनी एस्टिमेट केले होते हे खरे आहे आणि त्याप्रमाणे उत्तरामध्ये तसे लिहिले होते. ही पध्दत चुकीची असून डेप्युटी इंजिनिअरने ते करावयास पाहिजे होते हे खरे आहे. यासंबंधीच्या चौकशीत ही दुरुस्ती करण्यात येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : उत्तरात दुरुस्ती करा.

श्री.रणजित कांबळे : ठीक आहे. या उत्तरात दुरुस्ती करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी

(३) * १९६५ श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , मेजर सुधीर सावंत दिनांक १६ डिसेंबर, २००२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक २७५९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :

सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कारभाराची आर्थिक उत्पन्नाची व "ॲम्बे" या अमेरिकन कंपनीच्या डिस्ट्रीब्यूटरशीपबाबत चौकशी करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून मागविण्यात आलेला अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्यास त्याबाबतच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री. रणजित कांबळे,विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता: (१) होय, हे खरे आहे.

(२) या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार व पदाचा गैरवापर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी केला नसल्याचे चौकशी अंती सिध्द झाले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय,सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अमेरिकन कंपनीच्या मालाची डिस्ट्रीब्युटरशीप होती हे खरे आहे काय ? ही डिस्ट्रीब्युटरशीप घेण्यापूर्वी सबंधितांनी शासनाची मान्यता घेतली होती काय ?

श्री.रणजित कांबळे : सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.दिलीप बंड यांच्याकडे या कंपनीची डिस्ट्रीब्युटरशीप नव्हती. त्यांची पत्नी सौ.सुनिता बंड यांच्याकडे ही डिस्ट्रीब्युटरशीप होती. याबाबतीत त्यांनी दिनांक 28.9.2000 ला शासनाला कळवले होते आणि शासनाची परवानगी घेतली होती.

श्री.संजय दत्त : श्री.दिलीप बंड यांच्या पत्नीच्या नावावर या कंपनीची डिस्ट्रीब्युटरशीप होती. परंतु सातारा जिल्हा परिषदेच्या वा इतर जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचा-यांनी या कंपनीचा माल खरेदी केला होता काय व त्यासाठी या इनफलुएन्सचा वापर करण्यात आला होता काय ?

श्री.रणजित कांबळे : काही कर्मचा-यांनी ॲम्बे कंपनीच्या वस्तु खरेदी केल्या होत्या.

श्री.नितीन गडकरी : या वस्तू कोणत्या होत्या ?

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : टूथब्रश आणि टूथपेस्ट इत्यादी वस्तू होत्या. या संदर्भात चौकशी करण्यात आली होती त्यामध्ये काहीही आढळून आलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील :या वस्तू विकण्यासाठी त्यांनी शॉप ॲक्ट प्रमाणे सातारा जिल्हयात लायसेन्स घेतले होते काय ?

श्री.रणजित कांबळे : या साठी दुकानाची गरज नाही. हा मल्टीलेव्हल मार्केटीगचा भाग आहे.त्यामध्ये दुकानाच्या परवानगीची गरज नसते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 13.10 **उमरी तालुक्यात (जि.नांदेड) अंपगाचे बोगस प्रमाणपत्र घेवून रॉकेलचा होत असलेला काळाबाजार**

(४) * ३११० श्री. धोंडीराम राठोड , श्री. सुधाकर गणगणे , श्री. मुझफ्फर हुसे□सय्यद , श्री. □तिकोद्दीन खतिब , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी तालुक्यात (जि.नांदेड) अपंगाचे बोगस प्रमाणपत्र घेऊन व घरपोच रॉकेल विक्रीचा परवाना घेऊन हॉकर रॉकेलचा परस्पर काळाबाजार करीत असल्याचे माहे डिसेंबर, २००४ - जानेवारी,२००५ वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हॉकरर्स विरुध्द पुरवठा अधिकारी व तहसिलदार, उमरी यांचेकडे गेल्या दोन महिन्यापासून वारंवार तक्रार करुनही हॉकरर्सवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त हॉकरर्सवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाबा सिध्दिकी,श्री.सुनिल तटकरेयांच्याकरिता : (१) हे खरे नाही. तथापि, श्री.सुभाष दशरथ पेरेवार, माजी उपाध्यक्ष दक्षता समिती उमरी, माजी नगराध्यक्ष, नगरपरिषद उमरी व श्री.दत्तात्रय जिरेवार, शिवसेना तालुका प्रमुख, उमरी यांनी दिनांक ३१.१.२००५ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्याकडे श्री.गणेश बच्चेवार, केरोसिन हॉकर परवानाधारक यांच्याविरुध्द तक्रार केली होती.

(२), (३) व (४) हे खरे नाही. तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, उमरी यांनी परवा-ाधारज ाला हॉज र नेमून दिलेल्या ठिकाणी भेट दिली असता, तो त्याठिकाणी आढळून आला नाही. तसेच, परवान्यातील इतर अटींचे पालन हॉकर परवानाधारकाने केले नसल्याने, त्यांचा खुलासा घेण्यात आला. सदर खुलासा समाधानकारक नसल्यामुळे, सदर हॉकर परवाना दिनांक २५.२.२००५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.धोडीराम राठोड : सभापती महोदय, नांदेड जिल्हयातील उमरी तालुक्यात अपंगाचे बोगस प्रमाणपत्र घेऊन व घरपोच रॉकेल विक्रीचा परवाना घेऊन हॉकर रॉकेलचा काळाबाजार करीत आहेत,भ्रष्टाचार करीत आहेत याबाबतीत जिल्हा पुरवठा अधिका-याकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या काय या प्रश्नाला " हे खरे नाही " असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यानतर पुढे असेही म्हटलेले आहे की या बाबतीत तक्रारी केल्या आणि चौकशी करण्यात आली तेव्हा हे "खरे नाही "हे उत्तर दुरुस्त करण्यात येईल काय ?

श्री.बाबा सिध्दिकी :सभापति महोदय, प्रश्न पूछा गया था कि क्या अंपगता के बोगस प्रमाणपत्र के आधार पर लाईसेंस लिया गया था ? तो इसके जवाब में मैं यह कहना चाहता हूं कि जब लाईसेंस उनको मिला था, तब उन्हें वह अपंगता के आधार पर नहीं मिला था.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड :बोगस प्रमाणपत्राच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आला आहे आणि त्याला जोडूनच असे विचारण्यात आले होते की हे रॉकेल काळया बाजारात विकले जात होते हे खरे आहे काय ?

श्री.बाबा सिध्दिकी : सभापति महोदय, जब यह पाया गया कि उस आदमी का 29.1.1999 को एक्सीडेंट हुआ था और उसने बाद में तहसीलदार से कहा था कि मुझे फिक्स पाइंट दिया जाए तो उसके अनुरोध पर उन्हें फिक्स पाइंट दिया गया था. लेकिन उसके बारे में शिकायत आइर्, तो उसकी जांच करने पर यह पाया गया कि वह फिक्स पाइंट पर नहीं था और इसी लिए उसका लाईसेंस सस्पेंड किया गया है. इस मामले की नांदेड के डी.एस.ओ.जांच करेंगे. अगर जांच में वे दोषी पाये जाएंगे तो उनके खिलाफ कार्रवाई की जाएगी.

श्री.धोडीराम राठोड :सभापती महोदय, हे लायसन्स निलंबित करण्यात आलेले आहे तेव्हा पुन्हा ते लायसन्स रिन्यू करुन देणार काय ?

श्री.बाबा सिध्दिकी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य ने पूछा है कि उनका लाईसेंस सस्पेंड किया गया है. लेकिन अब लाईसेंस सस्पेंड करने के बाद रिन्यू कर दिया जाएगा. मेरी राय में यह काल्पनिक प्रश्न है. जब इनक्वारी होगी और उसमें वे दोषी पाये जाएंगे तो उसके आधार पर निर्णय लिया जाएगा. मैं इस संबंध में आज निर्णय नहीं ले सकता हूं.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.व्ही.बी.पांडे आरोग्य उपसंचालक यांची शासकीय अनुदानात केलेला भ्रष्टाचार

*** 4578 श्री. जोविंदराव आदिक, श्री. संजय दत्त, श्री. अनिल तरे, श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, श्री. यशवंतराव जडाळ, प्रा. जोजेंद्र कवाडे, श्री. रमेश बिराजेसे : दिनांक 9 डिसेंबर, 2004 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्र.क्र.744 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्मानीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डॉ.व्ही.बी.पांडे आरोग्य उपसंचालक यांनी शासकीय अनुदानात भ्रष्टाचार केल्याबद्दल पोलीस ठाणे यवतमाळ येथे नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याची ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(2) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(3) अद्याप कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व ती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

श्री.रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांचेकरिता : (1), (2) व (3) ॲन्टी करप्शन ब्युरो तपास पूर्ण केला असून त्या अनुषंगाने ॲन्टी करप्शन ब्युरो पुढील कार्यवाही करीत आहे.

श्री. संजय दत्त : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. पोलीस चौकशीमध्ये हे डॉ.पांडे दोषी आढळले आहेत काय ? असल्यास, त्यांच्या विरूद्ध खात्या मार्फत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, यासंबंधातील पोलीस चौकशी अजून अंतिम टप्प्यावर आहे आणि ॲण्टी करप्शन ब्यूरो या प्रकरणी त्यांचा अहवाल आपल्याकडे सादर करणार आहेतच, तो आल्यानंतर त्या आधारे या प्रकरणी आम्ही निर्णय घेऊ.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, या डॉ.पांडे यांच्याबाबतीतील जे सारे आरोप आहे ते सर्व खात्याकडे आलेले आहेत. त्यांच्या भ्रष्टाचारासंबंधात पोलीस खात्याकडे तक्रारी आलेल्या आहेत आणि त्याच अनुषंगाने ॲण्टी करप्शन ब्यूरोने त्यांना रेड टाकून पकडले आहे. अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे कोणालाही पकडल्यानंतर संबंधित शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यास आपण ताबडतोब निलंबित करीत असतो. तेव्हा या प्रकरणी या डॉ.पांडे यांना देखील आपण निलंबित करणार काय ?

..... डी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4578 ..

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, या प्रकरणी ॲण्टी करप्शन ब्यूरोचा रिपोर्ट अजून आलेला नाही. ....

श्री. दिवाकर रावते : त्याचा काय संबंध आहे, तो रिपोर्ट येण्यासाठी अजून सहा महिने लागतील म्हणून आपण त्याचेवर निलंबनाची कारवाई करणार नाही का ?

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, हे प्रकरण 1992 चे आहे त्यामुळे आता त्यांना निलंबित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. शिवाय या प्रकरणीचा ॲण्टी करप्शन ब्यूरोचा रिपोर्टदेखील अंतिम टप्प्यावर आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यांचेवर कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, या डॉ.पांडे यांचेवर कोणकोणते आरोप होते ? कारण या ठिकाणी 9 लाख 37 हजार रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. ही काही छोटी गोष्ट नाही. एडस् सारख्या भयंकर रोग की ज्याच्यासाठी आपल्याला परदेशातून देखील मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य केले जाते, ..

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय आपण लेखी उत्तर काय दिले आहे ते वाचतच नाहीत. आता देखील या ठिकाणी उपप्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, ॲण्टी करप्शन ब्यूरोची चौकशी चालू आहे, रिपोर्ट अपेक्षित आहे. परंतु येथे जे लेखी उत्तर आपण दिले आहे त्यामध्ये अगोदरच म्हटलेले आहे की, ॲण्टी करप्शन ब्यूरोने तपास पूर्ण केला असून त्या अनुषंगाने ॲण्टी करप्शन ब्यूरो पुढील कार्यवाही करीत आहे. .. अध्यक्ष महाराज, ॲण्टी करप्शन ब्युरोने आपला तपास पूर्ण केल्याचे मंत्री स्वत:च येथे लेखी उत्तरात कबूल करीत आहेत आणि दुसरे म्हणजे ॲण्टी करप्शन ब्यूरो तुम्हाला कशासाठी त्याचा अहवाल देईल ? आणि ॲण्टी करप्शन ब्यूरो पुढील कारवाई करीत आहे पण खात्यामार्फत आपण या डॉ. पांडेवर काय कारवाई करणार आहात ? खरे तर त्याला आपण ताबडतोब निलंबित करावयास पाहिजे होते. तेव्हा त्याला निलंबित आपण करणार का ?

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, शासनाने सेक्शन 10 प्रमाणे कारवाई त्यांचेवर केलेली होती. ....

(यानंतर श्री. जागडे .... इ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्यांच्यावर कोणकोणते आरोप होते ? तसेच त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ? 1992 सालापासून त्यांच्यावर हे आरोप आहेत. आजपर्यन्त त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई झालेली नाही. आता या ठिकाणी जो एसीबीचा अहवाल प्राप्त झाला आहे, त्यामध्ये काय म्हटले आहे ? तसेच त्यांना आपण निलंबित करणार आहांत काय ? तसेच या ठिकाणी कोणती अनियमितता होती ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 9 लाखाची औषधे परवानगी घेतल्याशिवाय खरेदी करण्यात आली होती. औषधे खरेदी करण्यासाठी तांत्रिक मंजूरी नव्हती. ज्या औषधांची गरज नव्हती, ती औषधे खरेदी करण्यात आली आहेत. रुरल हॉस्पीटलची मागणी नसताना औषधांची खरेदी करण्यात आली आहे. टेंडर न काढता या औषधांची खरेदी करण्यात आली आहे. डिलीव्हरी चलनही नव्हते. तसेच खरेदीचे डायक्युमेंटस् उपलब्ध नाहीत. असे आरोप 1992 सालच्या एसीबीच्या अहवालामध्ये होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे माझ्या प्रश्नाचे त्यांनी उत्तर द्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे, तो शासनाला भूषणावह आहे काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे. या ठिकाणी जी खरेदी करण्यात आली होती, त्यामध्ये अनियमितता झालेली होती, भ्रष्टाचार झालेला नाही. मंजूर नसताना औषधे खरेदी करण्यात आली होती. खरेदी करण्यापूर्वी तांत्रिक मंजूरी घेण्यात आलेली नव्हती. ग्रामीण रुग्णालयाची मागणी नसताना औषधांची खरेदी करण्यात आली होती. पूर्वमंजूरी घेण्यात आली नव्हती. यामध्ये अनियमितता झाली आहे.

डॉ. दीपक सावंत : याला मंजूरी कोणी दिली ?

डॉ. विमल मुंदडा : डेप्युटी डायरेक्टरांनी यास मंजूरी दिली आहे.

डॉ. दीपक सावंत : कोणत्या नियमानुसार ही मंजूरी डेप्युटी डायरेक्टरांनी दिली आहे ? त्यांनी ही मंजूरी कशी दिली आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, याला मंजूरी देण्याचे अधिकारी उप संचालकांना असतो. सिव्हील सर्जनच्या अधिकारात त्यांना ज्या औषधांची गरज भासते, त्या औषधांची खरेदी करण्याचे अधिकार त्यांना दिलेले असतात. या ठिकाणी अनुदान मंजूर नसताना खरेदी करण्यात आली आहे. या खरेदीमध्ये अनियमितता झाली आहे. त्यामुळे एसीबीमार्फत याची चौकशी सुरु आहे. एसीबीच्या चौकशीचा अहवाल आतापर्यन्त आमच्याकडे प्राप्त झालेला नाही. आता जो काही अहवाल आला आहे, त्या आधारावर आम्ही निश्चितपणे कारवाई करु. कोणालाही हे शासन पाठीशी घालणार नाही.

(गोंधळ)

डॉ. दीपक सावंत : एडस् सारख्या महत्वाच्या औषधांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे.

डॉ. विमल मुंदडा : यवतमाळमध्ये 1992 साली झालेला हा भ्रष्टाचार नसून अनियमितता आहे. आता सध्या डॉ. पांडे हे एडस् कंट्रोल या पदावर काम करीत आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पोस्ट फॅक्टो मंजूरी देण्याचा अधिकार उप संचालकांना आहे काय ? उपसंचालकांनी कोणत्या अधिकाराखाली ही मंजूरी दिली आहे ?

श्री. रणजित कांबळे : त्यांना तो अधिकार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता खरे उत्तर पुढे आले आहे. तेव्हा त्यांना प्रथम निलंबित करा आणि नंतर पुढील कारवाई करा. आपण अधिका-यांना पाठीशी का घालीत आहांत ?

डॉ. रणजित कांबळे : सभापती महोदय, एसीबीचा अहवाल आम्हाला लवकरात लवकर मिळण्याची अपेक्षा आहे. एसीबीचा अहवाल आल्यानंतर आम्ही पुढील चौकशी करु.

(गोंधळ)

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, भ्रष्टाचार आणि अनियमितता यामध्ये नेमका फरक काय आहे ? तसेच भ्रष्टाचार करणा-या अधिका-यांना पाठीशी घालून शासनाची पुण्याई का खर्च करीत आहांत ? या ठिकाणी अधिका -यांनी दिलेले उत्तर न देता गैरप्रकार करणा-या अधिका-यांना निलंबित करण्यासाठी कोणती हरकत आहे ?

(यानंतर श्री. सरफरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4578...

श्री. वसंतराव काळे...

मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये घोषणा करुन त्यांना निलंबित केले पाहिजे. त्यांनी जरी औषध खरेदीमध्ये अनियमितता केली असली, गैरप्रकार केला असला तरी त्या भ्रष्ट अधिकाऱ्यास शासनाने पाठीशी घालता कामा नये. अशा अधिकाऱ्याला आपण निलंबित करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणामध्ये शासकीय पध्दतीचा अवलंब करावयास पाहिजे होता तो केला नाही हे वस्तुस्थितीला धरुन आहे. या प्रकरणी अँटी करप्शन ब्युरो यांचेमार्फत चौकशी चालू आहे. त्यांच्याकडून चौकशी अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. हे प्रकरण 91-92 सालातील आहे.

डॉ. दीपक सावंत : मंत्रिमहोदय अनियमितता म्हणजे भ्रष्टाचार नाही असे म्हणत आहेत. असे जर त्यांचे म्हणणे असेल तर समाजामध्ये याचा वाईट मेसेज जाईल. प्रत्येक डॉक्टर अनियमितता करुन औषध खरेदी करील आणि सरकारला डुबवेल...

(गोंधळ)

उपसभापती : गुन्हा अन्वेषण विभागाकडून अजून पर्यंत चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही असे मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले. या प्रकरणी 1992 सालापासून चौकशी चालू आहे. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा ठरलेली असते, त्या कालमर्यादेत चौकशी पूर्ण केली पाहिजे. वास्तविक पहाता या भ्रष्टाचाराची चौकशी जवळपास 13 वर्षे चालू आहे. हे जर खरे असेल तर इतका प्रदीर्घ काळ चौकशी चालू रहाणे संयुक्तिक वाटत नाही. म्हणून मी मंत्रिमहोदयांना सूचना करतो की, या प्रकरणाची चौकशी 7 ते 8 दिवसात पूर्ण करुन ताबडतोब अहवाल मागवून घेण्यात यावा.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अँटी करप्शन ब्युरोने चौकशी अहवाल द्यावयाचा आहे. तो केव्हा द्यावयाचा हे त्यांच्यावर अवलंबून आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर आपण पुढील कारवाई करु.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 13 वर्षे हा भ्रष्टाचार सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त होईपर्यंत आपण हा प्रश्न राखून ठेवावा...

(गोंधळ)

उपसभापती : या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी 13 वर्षे लागली हे सांगणे सुध्दा योग्य नाही. म्हणून माननीय सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन मी आपणास संधी दिली. आता या प्रश्नाचे गांभीर्य आणि माननीय सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता या प्रकरणाचा चौकशी अहवाल येत्या 7-8 दिवसात आपण मागवून घ्यावा अशी मी मंत्रिमहोदयांना सूचना करतो. त्याबाबत मी या आसनावरुन माननीय गृह राज्यमंत्र्यांना सूचना देतो किंवा आपण सूचना द्याव्यात....

(गोंधळ)

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, तो पर्यंत आपण हा प्रश्न राखून ठेवावा...

श्री. प्रकाश शेंडगे : ज्या अधिकाऱ्यांनी 13 वर्षे चौकशीकरीता लावली त्या अधिकाऱ्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे...

(गोंधळ)

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, आपण सूचना केल्या प्रमाणे अे.सी.बी. मार्फत चौकशीसाठी 12 ते 13 वर्षाचा कालावधी लागला आहे, 1992 सालापासून ही चौकशी चालू आहे. तेव्हा या चौकशीच्या अधीन राहून तूर्त या संबंधित अधिकाऱ्यांना मी निलंबित करते.

श्री. प्रकाश शेंडगे : ज्या अधिकाऱ्यांनी चौकशीला 13 वर्षे लावली त्या अधिकाऱ्याचे काय करणार?

(गोंधळ)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4578 . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणात आपल्यासमोर अशा प्रकारची कार्यपध्दती आलेली आहे, मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो, कारण त्यांनी संबंधित भ्रष्ट अधिका-याला निलंबित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पण येथे एक वेगळा प्रश्न उपस्थित झालेला आहे आणि त्याबाबतीत संबंधित खात्याकडून निवेदन होणे आवश्यक आहे. ॲन्टी करप्शन ब्युरो हे गृह खात्याच्या अंतर्गत येते आणि अशा प्रकारे गृह खात्याच्या माध्यमातून चौकशीसाठी 14-14 वर्षे लागत असतील, तर त्या कालखंडात किती आले आणि किती निवृत्त झाले ? अशी 12 वर्षाच्या काळातील स्थिती आहे. तेव्हा या चौकशीसाठी 12-13 वर्षाचा काळ का लागला ? याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांनी त्यांच्या खात्याच्यावतीने आपल्यासमोर निवेदन करावे अशी मी आपल्या माध्यमातून माननीय गृह मंत्र्यांना विनंती करतो.

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परळी व पारस औक्ष्जज वीज प्रज्ल्पाची व मौदा येथील -ॅश-ाल थर्मल पॉवर ज्ॉर्पोरेश-ाच्या वीज प्रज्ल्पाची सद्य:क्स्थती

(6) * 2832 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जो□द्र □वाडे , प्रा. फौजीया □ा-ान , श्री. ज□ानाथ शेवाळे , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हा□ , श्री. विलास अवचट , श्री. अ-ांत तरे , श्री. अरविंद सावंत : स-मा-ानीय ऊर्जा (अपारंपरि□ ऊर्जा व□ळू-ा) मंत्री पुढील □ाष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) राज्यातील वीजेची तीव्र टंचाई दूर ज्रज्याच्यादृष्टी-े परळी (250 मेज्ावॅट) व पारस (250 मेज्ावॅट) औक्ष्जज वीज प्रज्ल्पाचे ज्ामाची सद्य:क्स्थती ज्ाय आहे,

(2) तसेच -ॅश-ाल थर्मल पॉवर ज्ॉर्पोरेश-ाच्या 1000 मे.वॅ.ज्मतेच्या मौदा येथील प्रज्ल्पाचा ए-ाटीपीसी ज्डू-ा सुसाध्यता अहवाल तयार ज्ेला आहे ज्ाय,

(3) असल्यास, त्या-ुसार पुढे ज्ोजती ज्ार्यवाही ज्ेली वा ज्रज्यात येत आहे,

(4) उक्त प्रश-ी वीजेची टंचाई दूर व्हावी यासाठी लवज्रात लवज्र उपाययोज-ा ज्रज्याबाबत ज्ोजती ज्ार्यवाही ज्ेली वा ज्रज्यात येत आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : (1) अ) -ावी-ा परळी औक्ष्जज प्रज्ल्प संच क्र.1 (250 मे.वॅ.) च्या मुज्य उपज्ज / फ्लॅटची पुरवठा व ज्मिश-ींज्चे, महत्वाच्या सर्व स्थापत्य ज्ामासाठीचे, तसेच यांत्रिज्ी व विद्युत ज्मापैज्ी ज्ाही ज्ामाचे आदेश देज्यात आले आहेत. प्रज्ल्पासाठी लाज्जारी इतर ज्मे / उपज्रजे यांचा पुरवठा व उभारजीसाठी ि-विदा ि-क्श्चत ज्रज्यात येत आहेत. दि-ांज् 15.02.2005 रोजी बॉयलर ड्रम लिख्क्टज् ज्रज्यात आले असू-ा हा संच जुलै 2006 मध्ये ज्ार्याक्वत होजे अपेज्ित आहे.

ब) पारस औक्ष्जज विद्युत ज्ेंद्र विस्तार प्रज्ल्प संच क्र.1 (250 मे.वॅ) च्या मुज्य उपज्रज फ्लॅटचा पुरवठा व ज्मिश-ींज्चे तसेच महत्वाच्या स्थापत्य ज्ामाचे आदेश देज्यात आले असू-ा प्रज्ल्पाच्या इतर ज्ामासाठी आदेश देज्यासंबंधीची प्रक्रिया सुरु आहे. सदर संच -ोव्हेंबर 2006 पर्यंत ज्ार्याक्वत होजे अपेज्ित आहे.

(2) -ाही.

(3) प्रश-ा उद्भवत -ाही.

(4) राज्यातील वीज टंचाई दूर ज्रज्याच्या दृष्टी-े वीज ि-र्मितीत वाढ ज्रज्यासाठी शास-ा-े धोरजात्मज् ि-र्जय घेतला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, परळी व पारस याठिकाणी प्रत्येकी 250 मे.वॅ.च्या औष्णिक वीज प्रकल्पाच्या संदर्भात आदेश देण्यात आल्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. पण प्रश्न क्र.2 नुसार नागपूर जवळच्या मौदा याठिकाणी एन.टी.पी.सी. कडून एक हजार मे.वॅ. क्षमतेचे थर्मल पॉवर स्टेशनचा पूर्ण रिपोर्ट देखील तयार झाला. काही कोटी रुपये खर्च झाले. असे असताना आपल्या शासनाने राज्यातील विजेची टंचाई लक्षात घेऊन

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2832 . . . .

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

मौदा येथे एन.टी.पी.सी.च्या एक हजार मे.वॅ.क्षमतेच्या प्रकल्पासाठी मंजूरी देण्याबद्दल काही ठोस कारवाई केली आहे का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मौदा येथे एक हजार मे.वॅ.चा प्रकल्प एन.टी.पी.सी.च्या माध्यमातून उभा करण्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. या संदर्भात केंद्र शासनाने आणि एन.टी.पी.सी.ने राज्य शासनाला पत्र पाठवून या प्रकल्पाच्या संदर्भात आपण काय भूमिका घेत आहात ? अशा प्रकारची विचारणा केली होती. राज्य शासनाने यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन एन.टी.पी.सी.ने हा प्रकल्प केला तर त्याबाबतीत आमची संपूर्ण तयारी राहील असे कळविले होते. यासंदर्भात फॉरेस्टच्या बाबतीतील सर्व परवानग्या देण्याच्या बाबतीत आपण त्यांना आश्वासन दिले होते. माननीय श्री.अनंतराव गिते केंद्रीय मंत्री असताना या प्रकल्पाच्या संदर्भात एक बैठक झाली होती आणि त्यावेळी मी स्वत: दिल्लीला गेलो होतो.परंतु एन.टी.पी.सी.कडून याचा फिजीबिलीटी रिपोर्ट तयार करणे, याचा ए.टी.आर.तयार करणे यासंदर्भातील कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. या प्रकल्पातील खरी अडचण म्हणजे कोल कॉस्ट आणि दुसरी पाणी. जोपर्यंत गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण होत नाही, तोपर्यंत हा प्रकल्प मार्गी लागू शकत नाही. म्हणून केंद्रीय मंत्री महोदयांना तेव्हा विनंती केली होती की, या प्रकल्पाच्या अगेन्स्ट तुम्ही काही निधी उपलब्ध करुन दिला तर गोसीखूर्द प्रकल्पाचे पुढील काम गतीमान करता येईल आणि पाण्याची उपलब्धता झाल्यावर हा प्रकल्प देखील मार्गी लावता येईल. तेव्हा असे ठरले होते की, एन.टी.पी.सी.कडून निधी उपलब्ध करुन देता येणार नाही. तर पॉवर फायनान्स् कॉर्पोरेशनकडून या प्रकल्पासाठी पैसे मागितले तर केंद्र शासन मदत करील. एन.टी.पी.सी.आणि केंद्र शासनाची ही भूमिका पाटबंधारे विभागाला सांगण्यात आली होती. याबाबतीत पाटबंधारे विभागाकडून सचिव स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. एन.टी.पी.सी.बरोबर आज सुध्दा चर्चा झाली. त्यामध्ये त्यांनी फिजीबिलीटी रिपोर्ट लवकर तयार करण्याच्या बाबतीत तयारी सुरु केल्याचे सांगितले. छत्तीसगढ येथील रायगड खाणीतून कोळसा उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याचेही ठरविलेले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2832 (पुढे चालू

कोळशाची उपलब्धता निश्चित झाल्यानंतर येणाऱ्या वाहतुकीचा खर्च गृहित धरुन टेरिफ ठरविण्याचे मान्य केलेले आहे. या सर्व विवेचनावरुन लक्षात येईल की, राज्य सरकारच्या बाजूने ज्याज्या वेळेला सकारात्मक भूमिका घेण्यात आलेली आहे, या संदर्भातील निर्णय हा एन.टी.पी.सी.ने, केंद्र सरकारने करायचा आहे. त्या संदर्भात एन.टी.पी.सी.कडे आणि केंद्र सरकारकडे याबाबत पाठपुरावा आम्ही करत आहोत.

प्रा.बी.टी.देशमुख : उत्तराच 1 अ) मध्ये म्हटलेले आहे की, "नवीन परळी औष्णिक प्रकल्प संच क्र.1 हा संच जुलै 2006 मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षिलेले आहे आणि ब) मध्ये म्हटलेले आहे की, पारस औष्णिक विद्युत केंद्र विस्तार प्रकल्प संच क्र.1 हा संच नोव्हेंबर 2006 पर्यन्त कार्यान्वित होणे अपेक्षित आहे." माझा प्रश्न असा आहे आहे की, औष्णिक प्रकल्प संच क्रमांक 2 इन्टॉल करण्यासाठी काही स्कोप आहे काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : दोन्ही ठिकाणी अजून वीज निर्मिती व्हायची आहे. आपल्याला एन.टी.पी.सी.कडून निधीची उपलब्धता, पाण्याची उपलब्धता, कोळशाची उपलब्धता यावर 250-250 मे.वॅटचे एकेक संच त्या ठिकाणी एक्स्पन्शन करण्याचे आपण ठरविलेले होते. या संदर्भामध्ये राज्य सरकारने निर्णय घेतला. त्या संदर्भातील कामे सुरु झालेली आहेत. दिलेल्या तारखेला कामे पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामध्ये अधिक एक्स्पान्शन करावयाचे असेल तर त्यासाठी अतिरिक्त स्टेजला पुलऑन करण्याच्या संदर्भामध्ये देखील विचार करावा लागेल. राज्य सरकारच्या वतीने केंद्र सरकारकडे काही कोळशाच्या खाणी मागितलेल्या आहेत, आवश्यकता असल्यास, राज्य सरकार त्यासाठी कंपनी स्थापन करेल. कारण भविष्यामध्ये यासाठी कोळसा कमी पडणार आहे. कोळशाची उपलब्धता केली पाहिजे. पुढच्या 20 वर्षाचा विचार केल्यास, राज्याला कोळसा मिळू शकणार नाही. म्हणून कोळशाची मुबलक उपलब्धता करुन, त्यासाठी आवश्यकता असल्यास कॅपट्यू मायनिंगमध्ये जाणे आणि त्यानंतर एक्स्पान्शनचा कार्यक्रम हातामध्ये घेणे, या स्टेप्स् मंडळाने ठरविलेल्या आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : उत्तराच्या ब मध्ये म्हटलेले आहे की, "पासर औष्णिक विद्युत केंद्र विस्तार प्रकल्प संच क्र. (250 मे.वॅ.) च्या मुख्य उपकरण प्लॅटचा पुरवठा व कमिशनींगचे तसेच महत्वाच्या स्थापत्य कामाचे आदेश देण्यात आले आहेत ". हे स्थापत्य कामाचे आदेश केव्हा देण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2832 (पुढे चालू... श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू...

आले आहेत ? त्याचबरोबर इतर कामासाठी आदेश देण्यासंबंधीची प्रक्रिया सुरु आहे, ते आदेश केव्हा देण्यात येतील ? त्याचबरोबर या प्रकल्पाची किंमत किती आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : या पारस औष्णिक विद्युत प्रकल्पाची किंमत 1121 कोटी रुपये आहे. मंडळाने 29-1-2004 ला ठराव केला. राज्य सरकारने यासाठी 190 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. सी.एफ.सी.चे कर्ज 120 कोटी रुपयाचे आहे. उर्वरित 11 कोटी रुपये मंडळाकडून खर्च करणे अभिप्रेत आहे. या संदर्भात मुख्य टर्बाईन ट्रान्फॉर्मर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी हे केंद्र सरकारच्या भेल कंपनीकडे देण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : इतर कामासाठी आदेश देण्यासंबंधीची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितलेले आहे,त्याचे आदेश केव्हा दिले जातील ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : यामध्ये वेगवेगळी पॅकेजेस असतात, त्याप्रमाणे टेंडर काढली जातात. मेन टेंडर आहे, ते दिलेले आहे. पारसच्या संदर्भातील बहुतेक बाबी पूर्ण होत आलेल्या आहेत. त्याबाबतचे सगळे बोर्डाच्या स्तरावर निर्णय घेतले जातात. परंतु वेळेमध्ये दोन्ही प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारलेली आहे.

श्रीमती फौजीया खान : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री जी से यह पूछना चाहती हूं कि जब आप यह अपेक्षा रखते हैं कि जुलाई 2006 तक परली का प्रकल्प शुरु हो जाएगा तो जिस गति से यह काम हो रहा है, उसे देखते हुए क्या यह प्रकल्प 2006 तक सचमुच में कार्यान्वित हो जाएगा ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, ऐसा माना जाता है कि बिजली की बचत यानी बिजली का निर्माण. लेकिन कई बार यह देखा गया है कि दिन में भी स्ट्रीट लाईट चालू रहते हैं. तो इसके लिए कानून के अन्तर्गत कौनसी धारा लगाई जाती है ? आज की स्थिति में यह बिजली का वेस्टेज है. इसलिए ऐसे मामलों को गंभीर समझते हुए इस सिलसिले में क्या सरकार कोई कानूनी कार्रवाई करने के बारे में विचार करेगी ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हा प्रकल्प वेळेमध्ये पूर्ण करण्याच्या संदर्भात निश्चित प्रयत्न केले जातील. आता दिवसा लाईट सुरु ठेवणे, यास आपल्याला वीज चोरी असे म्हणता येणार नाही. ऊर्जा बचतीच्या संदर्भामध्ये सामाजिक जागृती करणे, यासाठी मंडळाच्या माध्यमातून, वर्तमानपत्राच्या माध्यमातून, दूरदर्शनच्या वेगवेगळया चॅनेल्सच्या माध्यमातून जाहिराती दिल्या जातात.

यानंतर कु. थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2832....

श्री. दिलीप वळसे-पाटील...

ठिकठिकाणी लोकांमध्ये जागृती निर्माण करुन वीज वाचविणे आणि कॉन्झर्व्हेशन करणे याच्या संदर्भात निश्चितप्रकारे आपल्या बाजूने प्रयत्न सुरु आहेत. वीज चोरीच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न मांडलेला आहे. या सभागृहाने एक मताने वीज चोरी प्रतिबंधक कायदा मंजूर केला आणि तो सन्माननीय राष्ट्रपतींकडे सहीसाठी पाठविल्यानंतर दरम्यानच्या काळात वीज अधिनियम 2003 केंद्र सरकारने मान्य केला. आपला कायदा होता त्याच कायद्यातील सगळया तरतुदी केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये आहेत. दरम्यानच्या काळात काही न्यायालयीन प्रकरणे झाली. त्या प्रकरणांमध्ये काही भूमिका न्यायालयाने घेतली. त्या संदर्भात असलेला 2003 च्या कायद्यात काही दुरुस्ती करणे अभिप्रेत आहे. ती दुरुस्ती आम्ही लवकरच सभागृहासमोर घेऊन येत आहोत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी श्री. गिते हे एनर्जी मिनिस्टर होते त्यावेळची माहिती दिली. आता श्री. पी.एम.सईद हे नवीन एनर्जी मिनिस्टर आहेत. त्यांच्याकडे हा प्रश्न मांडून, नॅशनल पॉवर ग्रीडकडून जास्तीत जास्त लवकर हा प्रश्न मार्गी लावण्याच्यादृष्टीने काही प्रयत्न केले जातील काय? आणि दुसरा प्रश्न असा की, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजियाखान यांनी म्हटले की, दिवसा लाईट सुरु राहतात. त्याला मी चोरी म्हणत नाही.पण हा निग्लिजन्स आहे. हया निग्लिजन्साठी आजपर्यंत शासनाने कोणत्या विभागावर कारवाई केली आहे काय? कारण निग्लिजन्सी ईज मोअर डेंजरस. आणि प्रामुख्याने विजेच्या बाबतीत चोरीपेक्षा ते जास्त धोकादायक आहे. म्हणून शासनाने या संदर्भात काही कारवाई केली आहे काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : स्ट्रिट लाईट ग्रामपंचायतीच्या हद्दीत असेल तर ग्रामपंचायतीने त्यावर कंट्रोल ठेवला पाहिजे. स्ट्रिट लाईट नगरपालिकांच्या हाद्दीत असेल तर नगरपालिकेच्या प्रशासनाने कंट्रोल ठेवणे अभिप्रेत आहे. महानगरपालिकेच्या हद्दीत असेल तर महानगरपालिकेने कंट्रोल ठेवणे अभिप्रेत आहे.या संदर्भात राज्य शासनाने नुसत्याच स्ट्रिटलाईटसाठी नाही तर सर्व सरकारी कार्यालयातसुध्दा तेथील प्रमुखांनी वीज बिलामध्ये 20 टक्के बचत करुन दाखविण्याच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भामध्ये सर्क्युलर निर्गमित केलेले आहे. विजेचा प्रश्न राज्यातील अतिशय गंभीर प्रश्न आहे. या संदर्भात कायदा करुन किंवा आदेश देऊन आपल्याला या संदर्भात काळजी घ्यावी लागेल. तसेच सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, सर्व नगरसेवक, सर्व लोकप्रतिनिधी, सर्व नगरपरिषदेचे सदस्य यांनी सुध्दा आपआपल्या विभागामध्ये मग पाणी योजना असतील किंवा स्ट्रिट लाईट असेल त्या बाबतीत कमीत कमी विजेचा वापर कसा करता येईल, विजेची बचत कशी करता येईल, या संदर्भात काळजी घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व सन्माननीय सदस्यांच्या मदतीची अपेक्षा मी या ठिकाणी करतो. त्याचबरोबर सरकारी कार्यालयात 20 टक्के वीज बचत करुन दाखविण्याच्या संदर्भात आदेश दिलेले आहेत. तसे निर्बंध घातलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भामध्ये राज्य सरकारकडून सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. कालच या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय उर्जा मंत्र्यांची भेट दिल्लीमध्ये घेतली. त्यावेळी त्यांच्या बाकीच्या प्रश्नामध्ये याही प्रश्नाचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. आम्ही सुध्दा सातत्याने त्यांच्या संपर्कात आहोत. एन.टी.पी.सी.बरोबर मी स्वत: आज त्यांठिकाणी बोललो. यासंदर्भात त्यांच्याकडून जी काही कारवाई चालू आहे त्या कारवाईच्या सदर्भामध्ये सातत्याने हा विदर्भाचा महत्वाचा प्रकल्प असल्यामुळे सातत्याने त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : मौदा येथील थर्मल पॉवर स्टेशनच्या 1000 मेगावॅटच्या संदर्भात मंत्रिमहोदयांना चांगले ठावूक आहे की, श्री. सुबोध मोहिते अवजड उद्योग मंत्री असतांना श्री.अनंत गिते साहेबांच्या युती सरकारच्या काळामध्ये या मौदा येथील एन.टी.पी.सी.च्या 1000 मेगॅवॅट विद्युत प्रकल्पाचे भूमिपुजन झाले. त्याचा सर्व्हे करण्यासाठी पाच कोटी रुपये खर्च झाला. एन.टी.पी.सी.ने त्याचा फिजिबिलिटी रिपोर्ट देखील दिला. आपण नेहमी असे म्हणतो की, विकासाच्या कामामध्ये राजकारण आड येता कामा नये.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

माननीय श्री. पी. एम. सईद हे केंद्रामध्ये या विभागाचे मंत्री आहेत. आपण सर्व मिळून जर त्यांच्याकडे प्रयत्न केले तर माननीय श्री. पी. एम. सईद साहेब निश्चितच या प्रकल्पाला मदत करतील आणि आपली जी विजेची टंचाई आहे ती देखील भरुन निघेल. माझा प्रश्न असा आहे की, यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय आणि सरकारने पुढाकार घेऊन हा एनटीपीसीचा मौदा येथील प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील काय ?

उपसभापती : या प्रश्नावर आता खूप चर्चा झालेली आहे असे मला वाटते.

श्री. दिवाकर रावते : यावरुन उजेड पडत नाही. महाराष्ट्र अंधारात आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : आपण तीन-साडेतीन वर्षे थांबावे त्यानंतर उजेडच उजेड पडेल. काळजी करु नका. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे साहेबांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, माझ्या माहिती प्रमाणे मौदा येथील प्रकल्पाचे कोणतेही भूमिपूजन झालेले नाही. परंतु त्यावेळी जो कार्यक्रम झाला तेव्हा निवडणुका तोंडावर होत्या. त्यामुळे तिकडे साईट ऑफीसचे भूमिपूजन करण्याचा कार्यक्रम झाल्याची माझी माहिती आहे. त्यावेळी मी मंत्रिमंडळामध्ये नव्हतो. परंतु त्यावेळी साईट ऑफीसच्या उद्घाटनाचा किंवा भूमिपूजनाचा समारंभ त्या ठिकाणी झाला. त्या ठिकाणी ते प्रकल्पाचे भूमिपूजन नव्हते. शेवटी या प्रकल्पाची मूळ स्ट्रेंग्थ जी आहे ती म्हणजे गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण झाल्याशिवाय, पाण्याची उपलब्धता झाल्याशिवाय, कोळशाची उपलब्धता झाल्याशिवाय हा प्रकल्प मार्गी लागू शकत नाही. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. म्हणून गोसीखूर्द प्रकल्पाला पैसे उपलब्ध करुन देणे, मग केंद्र सरकारकडून या प्रकल्पाच्या अंतर्गत किंवा इरिगेशन खात्याच्या अन्य प्रकल्पांच्या अंतर्गत उपलब्ध करुन देणे हे दोन्ही प्रश्न सोडविण्याचे काम प्राधान्याने हाती घेणे गरजेचे आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, अजून फिजिबिलिटी रिपोर्ट तयार झालेला नाही. एनटीपीसीने किती पैसे खर्च केले हे मला माहीत नाही. परंतु यासंदर्भातील काही वाटा राज्य सरकारने उचलला पाहिजे अशा प्रकारची भूमिका होती. यातील परिस्थिती अधिक स्पष्ट जर करावयाची असेल तर आपण सभागृहाच्या वतीने पाहिजे तर केंद्रातील सर्व खासदारांना विनंती करु या की, महाराष्ट्रामधील उद्याची विजेची गरज लक्षात घेऊन उपलब्ध असणाऱ्या कोळशाच्या जास्तीत जास्त खाणी दुसऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इंडस्ट्रीजना देण्याच्या आधी या वीज प्रकल्पांसाठीच राखून ठेवल्या पाहिजेत आणि त्यातील महाराष्ट्राची जी मागणी आहे ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. याबाबतीत राज्य सरकारच्या माध्यमातून सुध्दा केंद्रीय कोळसा मंत्री यांच्याकडे प्रयत्न करण्यात येत आहेत. मी स्वत: जाऊन त्यांची भेट घेतलेली आहे आणि त्यांना विनंती केलेली आहे.

श्री. धोंडीराम राठोड : परळी प्रकल्पाच्या बाबतीत काही कामे सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत असे उत्तरात म्हटले आहे. बाकीच्या कामांचे आदेश कधी निघतील ? आपण या ठिकाणी कालमर्यादा दिलेली आहे. पारस प्रकल्पाच्या बाबतीतील उत्तरामध्ये सुध्दा केवळ स्थापत्य कामाचे आदेश काढलेले आहेत. बाकीच्या कामाचे आदेश काढलेले नाहीत. या दोन्ही कामांच्या बाबतीमध्ये या ठिकाणी कालबध्द अशी तारीख दिलेली असली तरी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे काय ? आर्थिक तरतूद उपलब्ध नसेल तर हे काम त्या वेळेत होणार नाही. याचा अनुभव आम्हाला आलेला आहे. मंठा आणि धनसांगवीला 132 के.व्ही. सबस्टेशन मंजूर होऊन एक वर्ष होऊन गेले. त्यासाठी एकही रुपया दिलेला नाही. जोपर्यन्त आर्थिक तरतूद होत नाही तोपर्यन्त ही कामे कशी पूर्ण होणार आणि मराठवाड्याचा अंधार कधी कमी होणार ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : या दोन्ही प्रकल्पांसाठी कोणतीही आर्थिक चणचण नाही. आर्थिक व्यवस्था केल्या नंतरच या प्रकल्पाचे काम हातात घेण्यात आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : गोसीखूर्द प्रकल्पाच्या बाबतीत सांगावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : गोसीखूर्द प्रकल्प हा राज्य वीज मंडळाच्या माध्यमातून घेतलेला प्रकल्प नाही. तो एनटीपीसीचा प्रकल्प आहे. एपटीपीसीने त्यामध्ये पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. दिवाकर रावते : गोसीखूर्द प्रकल्प झाल्याशिवाय पाणी उपलब्ध होणार नाही. पाणी उपलब्ध झाल्याशिवाय मौदा येथील प्रकल्प होणार नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्य परळी आणि पारसच्या बाबतीत विचारत आहेत. हया दोन्ही प्रकल्पाला स्टेजेसप्रमाणे कामे असतात त्यामध्ये बार चार्ट असतो त्या बार चार्टप्रमाणे आपण त्याचे टेंडर काढत असतो आणि त्याप्रमाणे ऑर्डर देत असतो. एकाच वेळी सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2832 ..... श्री. दिलीप वळसे-पाटील .....

टेंडर काढत नाही. त्यामध्ये जशी स्टेज येईल त्या स्टेजला त्या त्या बाबतीत ऑर्डर दिली जाते. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, दोन्ही प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा सबस्टेशनच्या बाबतीत उपस्थित केला. मागे एकदा मी या सभागृहाला हे सगळे समजावून सांगितले आहे की, आपल्याला जनरेशनमध्ये किती खर्च करावयास पाहिजे ? ट्रान्समिशनमध्ये किती खर्च करावयास पाहिजे? डिस्ट्रीब्यूशनमध्ये किती खर्च करावयास पाहिजे ? 132 के.व्ही. किंवा 33 के.व्ही. च्या सबस्टेशनच्या बाबतीत जरुर काही मर्यादा आहेत. त्यामुळे ही कामे हाती घेण्यासाठी जरी विलंब लागत असला तरी तांत्रिकदृष्टया ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या त्या ठिकाणी ती सगळी सबस्टेशन्स मंजूर करणे, त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे, त्याची कामे सुरु करणे

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2832.... श्री.दिलीप वळसे-पाटील....

याचे संपूर्ण नियोजन वीज मंडळाने केलेले आहे. मा.सदस्यांना मंठा व घनसावंगी येथील वीज प्रकल्पाची माहिती देण्याची मी व्यवस्था करतो.

मेजर सुधीर सावंत : उत्तराच्या भाग 4 मध्ये असे उत्तर दिले आहे की, " राज्यातील वीज टंचाई दूर करण्याच्यादृष्टीने वीज निर्मितीत वाढ करण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे." राज्यात वीज निर्मितीत वाढ होण्याच्यादृष्टीने, औष्णिक वीज निर्मितीच्यादृष्टीने महाराष्ट्रातील विदर्भात कोळशाचे साठे आहेत, शेजारच्या राज्यात कोळशाचे साठे आहेत त्या अनुषंगाने शासनाचे धोरण जाहीर केलेले आहे. येत्या पाच वर्षामध्ये विजेची कमतरता वाढणार आहे असेही शासनाने सांगितले आहे. हा विजेचा तुटवडा दूर करण्यासाठी औष्णिक ऊर्जेतून किती वीज निर्मिती करण्याचे शासनाने योजिले आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आज राज्यामध्ये 2300 ते 3000 मे.वॅ.विजेचा तुटवडा आहे. या सभागृहामध्ये मी वारंवार वस्तुस्थिती मांडलेली आहे. त्यानुसार 2010 सालापर्यंत 7700 मे.वॅ.एवढी विजेची टंचाई राज्यामध्ये जाणवणार आहे. 7700 मे.वॅ.विजेचा तुटवडा दूर करावयाचा असेल तर किमान 10 हजार मे.वॅ.वीज निर्मितीचे लक्ष्य ठेवावे लागेल. यासंबंधी या राज्यामध्ये खाजगी वीज निर्मितीच्या क्षेत्रातील गुंतवणूकीसंबंधी एक व्यापक धोरण शासनाने जाहीर केलेले आहे. या धोरणानुसार आता काही इंडस्ट्रीयल हाऊसेसने या राज्यामध्ये किंवा शेजारच्या राज्यामध्ये प्रकल्प सुरु करुन महाराष्ट्राला साधारणपणे 5000 मे.वॅ.पर्यंत वीज निर्मिती करुन किंवा त्यासंबंधीचे उत्पादन सुरु केलेले आहे. यासंबंधीचा अंतिम निर्णय झाल्यानंतर पुढील आठवडयामध्ये सभागृहासमोर येऊन त्याबाबत शासनाची भूमिका मी मांडीन. वीज मंडळाच्या माध्यमातून प्रकल्प हाती घेण्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, मा.राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये स्पष्ट झाले आहे की, उरण वीज प्रकल्पाचा विस्तार करुन तेथून 1000 मे.वॅ.इतकी वीज, तळेगाव येथून 1500 मे.वॅ.वीज आणि खापरखेडा येथून 500 मे.वॅ. अशी एकूण 3000 ते 3500 मे.वॅ.इतकी वीज विद्युत मंडळाच्या माध्यमातून उपलब्ध करण्याची भूमिका स्वीकारली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचप्रमाणे दाभोळमधून 2000 मे.वॅ.इतकी वीज मिळू शकेल. खाजगी, राज्यसरकारच्या आणि दाभोळच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लागेल. त्यानुसार शासनाने 5 ते 7 मे.वॅ.चे लक्ष्य ठेवले आहे. दाभोळ वीज प्रकल्पात परदेशी कंपन्या आणि केंद्र सरकारचा संबंध असल्यामुळे आज त्या प्रकल्पातील वीज जमेस धरलेली नाही.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT

जाजजी मेडिज ल ज ॉलेजची फी वाढ

(7) * 3181 डॉ. दिपज सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. अ तरे , श्री. दिवाज र रावते , श्री. सुरेश जेथलिया , श्री. विलास अवचट , श्री. अ ल परब , डॉ. ि लम जोन्हे : स-मा-न-ीय वैद्य ीय शि मंत्री पुढील ष्टींचा ुलासा रतील ाय :-

(1) -यायमूर्ती जहांजिरदार समिती-ने ठरवू-न दिलेल्या फीमध्ये वैद्यज िय महाविद्यालयां-ा जर्च परवडत -नसल्या-ने तशी फी वाढवू-न देज्याचा प्रस्ताव राज्यातील सुमारे 28 वैद्यज िय महाविद्यालयां-ी -नवि-न शिजज शुल्ज समितीपुढे फी वाढीचे प्रस्ताव सादर ेले आहेत हे जरे आहे ाय,

(2) असल्यास, शिजज समिती-ने ज्या जाजजी वैद्यजीय महाविद्यालयां-ी फी वाढीचे प्रस्ताव सादर ेले अशा महाविद्यालयांचे लेजा हिशेब पाहू-न शास-ा-ने फी वाढीस मा-यता दिली आहे हे जरे ाय,

(3) असल्यास, -या. जहांजिरदार समिती-ने सुचविलेल्या शुल्जात वाढ जरज्याची जारजे ाय आहेत?

श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (1) होय,हे जरे आहे.

(2) हे जरे -ाही.

(3) प्रश्-न उद्भवत -ाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा हा प्रश्न आहे. शासनाने जहागिरदार समिती नेमली होती, त्या समितीचा कार्यकाल पूर्ण झाला. त्या काळामध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालये न्यायालयामध्ये गेली आणि न्यायालयाने शिक्षण शुल्क समितीकडे जाण्यास सांगितले. परंतु जहागिरदार समितीचा काल पूर्ण झाल्यामुळे शासनाने दुसरी समिती नेमली. उत्तरातील क्र.2 मध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे. शासनाने अशाप्रकारे त्रोटक उत्तर देणे योग्य नाही. त्याऐवजी संदर्भ देऊन उत्तर देणे आवश्यक होते. पंडित समिती नेमल्यानंतर फी वाढली असे सांगितले आहे. ही फी किती वाढली आहे. आता ती वाढीव फी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भरावी लागेल काय आणि विद्यार्थ्यांनी फी भरली नाही तर त्यांना कॉलेजमध्ये बसून दिले जाणार नाही अशाप्रकारची धमकी कॉलेजच्या व्यवस्थापनाने दिली आहे हे खरे आहे काय ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 3181 पुढे सुरु...) (डॉ. दीपक सावंत पुढे सुरु...)

विद्यार्थ्यांचे हजेरीचे दिवस कमी झाले तर विद्यापीठाच्या नियमानुसार त्यांना परीक्षेला बसता येणार नाही. म्हणून शासन याबाबतीत कोणती कारवाई करणार आहे ? शासन फी संदर्भातील निश्चित धोरण कधी ठरविणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : 2002मध्ये पै फाऊंडेशनच्या केसच्या संदर्भामध्ये हायकोर्टामध्ये केस होती. हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे शिक्षण शुल्क समितीची स्थापना झाली.

डॉ. दीपक सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही कमिटी शासनाने नेमलेली होती. हायकोर्टाने ही कमिटी नेमलेली नाही.

श्री. सुरेश शेट्टी : कमिटी नेमण्याबाबत शासनाने आदेश दिले. कमिटीचे अध्यक्ष कोर्टाने नेमले. जस्टीस जहागिरदार यांना कोर्टाने अध्यक्ष नेमले. त्यानंतर जस्टीस जहागिरदार यांची टर्म संपल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर निवृत्त जस्टीस पंडित यांची 23.2.2004रोजी नेमणूक करण्यात आली. 17 जानेवारीला के.जी.सोमय्या कॉलेज, कराड, कृष्णा मेडिकल कॉलेज, तसेच जवाहरलाल नेहरु कॉलेज या तीन कॉलेजचे विद्यार्थी हायकोर्टामध्ये आणि नंतर सुप्रीम कोर्टामध्ये गेले. सुप्रीम कोर्टाने पुन्हा कमिटीसमोर जाऊन प्रेझेन्टेशन करावे असे सांगितले. पंडित कमिटीने 17 जानेवारीला निर्णय घेतला. सोमय्या कॉलेजची फी 1 लाख 40 हजार होती ती वाढवून 1 लाख 80 हजार करण्यात आली. ही फी वाढविल्याबद्दल काही विद्यार्थी हायकोर्टात गेले. शासनाने याबाबतीत स्टे दिला आहे. हायकोर्टाने देखील या निर्णयावर स्टे दिलेला आहे. आता 6 तारखेला हायकोर्टामध्ये हिअरिंग आहे. हिअरिंग संपेपर्यन्त निर्णयावर स्टे दिलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये बसू दिले जात नाही. त्यांना धमक्या दिल्या जात आहेत की, एक तर फी भरा नाही तर कॉलेजमध्ये बसू नका.

श्री. दिलीप वळसे-पाटील : फी ठरविण्याचे अधिकार हे फी फिक्सेशन समितीला असले तरी या संदर्भातील प्रकरण वेगवेगळया कोर्टामध्ये प्रलंबित आहे. विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही यादृष्टीकोनातून कोणत्याही कॉलेजच्या विद्यार्थ्यांना क्लास अटेन्ड करायला मनाई करता येणार नाही. अशा प्रकारे जर विद्यार्थ्यांना धमकी दिली, क्लासमध्ये बसू दिले नाही तर त्यासंदर्भात संबंधित महाविद्यालयाविरुध्द कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 3181 पुढे सुरु...)

श्री. विलास अवचट : या प्रश्नाच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री महोदयांनी पूर्वेतिहास सांगितला. या प्रश्नामध्ये मूळ मुद्दा कायम राहातो. 84 हजार रु. फी होती. ती वाढवून 1 लाख 40 हजार करण्यात आली. 1 लाख 40 हजारावरुन ती 1 लाख 80 हजार करण्यात आली. त्यानंतर ही फी 2 लाख 42 हजार रु. करण्यात आली. जहागिरदार समितीने शुल्क वाढवले. शुल्क वाढीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला नाही. त्यानंतर पंडित समिती नेमण्यात आली. त्यासमितीने देखील शुल्क का वाढविले ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : आधीची फी जहागिरदार समितीने ठरविली. त्या फीच्या विरोधात काही कॉलेजेस सुप्रीम कोर्टात केले. सुप्रीम कोर्टाने त्यांना फी फिक्सेशन समितीसमोर जाण्यास सांगितले. दरम्यानच्या काळात जस्टीस जहागिरदार यांनी राजीनामा दिल्यानंतर जस्टीस पंडित यांची नेमणूक झाली. कॉलेजचे म्हणणे असे आहे की, एक तर फी वाढवून द्यावी किंवा कॉलेजेस जी फी क्लेम करतात त्याच्या 60 टक्के फी भरण्यास परवानगी द्यावी. सुप्रीप कोर्टाने फी फिक्सेशन समिती समोर जाण्यास सांगितले. तेथे गेल्यानंतर तीन कॉलेजेसच्या फी च्या संदर्भात निर्णय दिला. ही वाढलेली फी केव्हा पासून लागू करावयाची ? ती आधी पासून लागू करावयाची की नंतर लागू करावयाची या संदर्भामध्ये आणि पंडित कमिटीच्या निर्णया विरुध्द काही विद्यार्थी हायकोर्टामध्ये गेलेले आहेत. हायकोर्टामध्ये हे मॅटर सब्ज्युडिस आहे.

उपसभापती : प्रश्नोतराचा तास संपला.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा (नागपूर) सन 2002-2003 चा सहावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : सहावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2003-2004 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : सन 2003-2004 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी व इतर सदस्य यांनी " दिनांक 27.3.2005 रोजी सोलापूर महानगरपालिकेच्या प्राणी संग्रहालयातील 29 हरणांना एकाच वेळी अकस्मात मृत्यू येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर सदस्य यांनी " बीड जिल्हयातील मादळमोही येथील ह.भ.प.भीमसिंह महाराज मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थी दत्ता राठोड याने वसतीगृहात मिळणा-या निकृष्ट जेवणाबद्दल तक्रार केल्याने वसतीगृहाच्या अधिक्षकाने त्याचा दिनांक 25.3.2005 रोजी केलेला निघृण खून" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे व इतर सदस्य यांनी " नागपूर जिल्हयातील अपंग विद्यार्थ्यांच्या अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांची शासनाने दखल न घेतल्याने त्यांच्यात पसरलेले नैराश्याचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व इतर सदस्य यांनी " शिक्षकांना अशैक्षणिक काम न देण्याचे शासनाचे धोरण असतांना सांगली जिल्हयात शासनाच्या स्वच्छतादूत प्रकल्पांतर्गत शौचालये मोजणीचे काम शिक्षकांसह विद्यार्थ्यांना दिल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असा निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री. पांडूरंग फुंडकर व इतर सदस्य यांनी " खामगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिका-यांच्या नियमबाहय कामकाजामुळे त्यांचेविरुध्द नगरपालिकेने बहुंमताने ठराव पारित करुन देखील शासनाने कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत शासनाने निवेदन करावे...

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने याच आठवडयात निवेदन करण्याचे निदेश आपण द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : शासनाने या आठवडयात निवेदन करावे.

यानंतर श्रीमती नीलम गो-हे,सर्वश्री. विनोद तावडे व इतर सदस्य यांनी " दिनांक 28 मार्च,2005 रोजी दादर येथे बँकेत जात असलेल्या श्रीमती कल्पना पिळवटकर यांना शस्त्राचा धाक दाखवून पैशाची बॅग घेऊन दरोडेखोर पसार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना द्यावी असा निदेश देऊन या सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

यानंतर श्रीमती संजीवनी रायकर व इतर सदस्य यांनी " शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील तांत्रिक कर्मचा-यांना आय.टी.आय. व एम.सी.व्ही.सी. निदेशकांप्रमाणे वेतनश्रेणी मिळण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

श्री. शरद पाटील : मी दोन नियम 93 अन्वये सूचना दिलेल्या आहेत..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी नियम 93 अन्वये दोन सूचना दिलेल्या आहेत त्या सूचनांचे काय झाले ?

उपसभापती : नियम 93 अन्वये इतर सदस्यांच्या सूचना मला प्राप्त झालेल्या आहेत परंतु त्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्यांना अटक व सूटका.

उपसभापती : मला पोलीस अधीक्षक,अकोला यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांना दिनांक 18 मार्च, 2005 रोजी मुंबई पोलीस अधिनियम,1951 च्या कलम 135 तसेच भारतीय दंड विधान संहितेच्या कलम 143,341 अन्वये अकोला येथे 12.40 वाजता अटक करण्यात येऊन त्यांना 14.00 वाजता जामिनावर मुक्त करण्यात आले आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना.

पृ.शी.: सांगली येथील बसस्थानकाला जागा देणेबाबत.

मु.शी.: सांगली येथील बसस्थानकाला जागा देण्याबाबत श्री.कन्हैयालाल गिडवाणी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी सांगली येथील बसस्थानकाला जागा उपलब्ध करुन देणे याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेद छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, निधीअभावी बसस्थानकाचे काम सुरु करण्यात आले नाही असे निवेदनात म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, किती निधीची मागणी करण्यात आली होती ? तसेच या स्थानकाचे काम केव्हा सुरु होणार आहे ? याठिकाणी चारही बाजूंनी अतिक्रमण झालेले आहे. हे अतिक्रमण हटविण्यासाठी काय उपाययोजना केली आहे आणि महानगरपालिकेला तशा सूचना दिल्या आहेत काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सांगली डेपोच्या चारही बाजूंनी अतिक्रमण झालेले आहे आणि ही जागा महापालिकेची आहे. अतिक्रमण हटविण्याबाबत पालिकेला सूचना दिल्या आहेत आणि जागा रिक्त करण्यास सांगण्यात आले आहे. नवा बसडेपो बांधावयाचा आहे ते अंतर 5 कि.मी.पेक्षा जास्त आहे. यासाठी लागणारा निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरु आहे. जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे डेपोचे काम सुरु करण्यात येईल.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, किती निधीची मागणी केली होती याचे उत्तर आले नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जवळजवळ 1.5 कोटी रुपयांच्या निधीची मागणी आहे. बसस्थानक बांधण्याकरिता सुमारे 90 लाख रुपये खर्च येणार आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सांगली शहरात सुरु असलेली गॅस्ट्रोची साथ

मु.शी.: सांगली शहरात सुरु असलेली गॅस्ट्रोची साथ याबाबत सर्वश्री ॲड.अनिल परब,डॉ.दीपक सावंत,विलास अवचट,अनंत तरे, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. विमल मुंदडा (आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री ॲड.अनिल परब,डॉ.दीपक सावंत,विलास अवचट,अनंत तरे यांनी सांगली शहरात सुरु असलेली गॅस्ट्रोची साथ या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, अशाच प्रकारच्या विषयावर श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी सूचना दिली आहे. माझी विनंती आहे की, दोन्ही सूचनांसंबंधी एकत्रित चर्चा घ्यावी.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, विषय फार गंभीर आहे हे आपण मान्य केले होते. मा. पाणी पुरवठा मंत्र्यांनी सुध्दा याबाबत निवेदन करावे असे आपण सांगितले होते. त्यांचे निवेदन असल्याशिवाय चर्चेला अर्थ राहणार नाही.

उप सभापती : पाणी पुरवठा मंत्री श्री. अजित पवार बाहेरगावी आहेत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, पाणी पुरवठा मंत्री आणि आरोग्य मंत्री यादोघांचा हा विषय आहे. दोघांची निवेदने आल्यावर एकत्रित चर्चा व्हावी असे वाटते. ही सूचना राखून ठेवावी.

उप सभापती : पाणी पुरवठा खात्याशी संबंधित प्रश्न त्या मंत्र्यांना विचारा. आरोग्य खात्याशी संबंधित प्रश्न आज विचारता येतील.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : पाणी पुरवठा मंत्री नसतील तर हा विषय उद्या चर्चेला घ्यावा. पाणी पुरवठा मंत्र्यांनी उद्या उत्तर द्यावे.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, याबाबत शुक्रवारी लक्षवेधी सूचना दाखल केली होती आणि ती स्वीकृत झालेली आहे. तेव्हा लक्षवेधी सूचना आणि 93 ची सूचना एकत्रित चर्चेला घ्यावी असे मला वाटते.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की .....

उप सभापती : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या वेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री.अनंत तरे :सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत मी नियम 93 ची सूचना दिली आहे.

उप सभापती : लक्षवेधी सूचनेला सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांचे नाव जोडण्यात येईल.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना चार दिवसानंतर घेतली जाईल.किंवा आठ दिवसानंतर घेतली जाईल. आज त्या भागातील 1000 रुग्ण दवाखान्यात उपचार घेत आहेत. तेव्हा तातडीने ही लक्षवेधी सूचना घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

उप सभापती :या विषयाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली असून त्याला सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी आणि श्री.अनंत तरे यांची नावे जोडण्यात येतील आणि ही लक्षवेधी सूचना दोन दिवसाच्या आत सभागृहात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

पृ.शी.: गव्हाणपाडा (मुलुंड)येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांचा विद्युत पुरवठा खंडित करणे

मु.शी: गव्हाणपाडा (मुलुंड) येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांचा विद्युत पुरवठा खंडित करण्याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

विद्युत

श्री.दयानंद मस्के (गृह निर्माण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,डॉ.अशोक मोडक यांनी गव्हाणपाडा (मुलुंड) येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांचा विद्युत पुरवठा खंडित करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्या प्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरात काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : सन्माननीय सदस्यांची सूचना असेल तर बदल करतो.

श्री.मधुकर चव्हाण : मी जर सूचना केली तर मीच उत्तर दिल्यासारखे होईल.तेथे मी येणार आहे परंतु त्याला अजून वेळ आहे सभापती महोदय,या विषयाच्या सदर्भात काल आपण आदेश दिले होते.माननीय मंत्रीमहोदय हे माझे मित्र असल्यामुळे मला त्यांना अडचणीत आणावयाचे नाही. संबंधित अधिकारी हे त्यांना दररोज फसवत असतात.मी नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारले होते की,गव्हाणपाडा येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशी मे 2004 पासून अंधारात आहेत तेव्हा त्यांची मिटर्स तोडण्यात आली आहेत काय ? डिसेंबर 2004 च्या नागपूरच्या अधिवेशनातसुध्दा मी हाच प्रश्न विचारला होता. त्यावेळी असे उत्तर देण्यात आले होते की,"मुलुंड येथील संक्रमण शिबिरात ज्या भाडेकरुंना संक्रमण गाळयाचे वितरण झाले होते त्यांना वीज देयकाची थकबाकी भरावी लागणार नाही या दृष्टीने संबंधिताशी चर्चा करण्यात येत आहे " आणि डिसेंबर महिन्यात वीज तोडल्याचे मान्य करण्यात आलेले आहे.निवेदनात असे सांगण्यात आलेले आहे की,कोठल्याही प्रकारची वीज तोडण्यात आलेली नाही. काल दुपारी 4.00 वाजता मंत्रालयात गृह निर्माण विभागाचे सचिव श्री.एन.रामाराव यांच्या दालनात बैठक झाली. होती व ही वीज त्वरित का तोडली, माझे आदेश का पाळले नाहीत असे त्यांनी विचारले होते.त्यानंतर त्यांनी श्री.उत्तम खोब्रागडे यांना बोलावल होते. त्या भागातील रहिवाशांना दहा महिने अंधारात का ठेवले ? अशी विचारणा केली आणि याबाबतीत त्यांनी कार्यवाही केली.सबंधितांना मेमो इश्यू केले व त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागवले होते.काल पासून आतापर्यन्त 20 तास झाले आहेत.या 20 तासात आपण असत्य माहिती देत आहेत. तेथील रहिवाशी अंधारात नाहीत काय ? आपले अधिकारी आपल्याला फसवत आहेत. हे काय चालले आहे ? येथे काल माननीय उपसभापतींनी आदेश दिले होते की तेथील रहिवाशी दहा महिने अंधारात आहेत.आपले लोक ते मान्य करतात. डिसेंबर महिन्यात आपण उत्तर दिलेले होते की,हे लोक अंधारात आहेत.37 हजार 500 रुपये त्वरित भरा अन्यथा आपली वीज सुरु करणार नाही अशा प्रकारे जे पत्र त्यांना पाठविण्यात आले होते. ते पत्र माझ्याकडे आहे.असे असतांना तुम्ही असे सांगत आहात की वीज

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

कापली नाही ? याबाबतीत गृह निर्माण सचिवांनी विचारले होते आणि श्री.उत्तम खोब्रागडे यांनी सांगितले होते.त्यांनी असे विचारले होते की तुम्ही माझे आदेश का पाळले नाहीत ? तुम्ही दोन तीन अधिकारी घरी पाठवा." म्हाडा" दलाल चालवत आहेत, अधिकारी चालवत नाहीत. त्या अधिका-यांना घरी पाठवा ना ?

श्री.दयानंद मस्के :या सर्व विषयाची गंभीर दखल घेतली जाईल आणि यामध्ये जर अधिकारी दोषी आढळून आले तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण:: या बाबतीत आपण उद्या निवेदन करणार आहात काय ? याचे कारण असे की हा आपला अपमान आहे.माझा अपमान नाही.

(उत्तर दिले नाही)

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय हा विषय फार गंभीर आहे. एवढी मोठी थकबाकी उप अभियंत्यांनी भरलेली आहे.त्यांनी ही मेहरबानी का केली? निवेदनात असे म्हटलेले आहे की ,"उप अभियंत्यानी आपल्या खिशातून ही रक्कम भरली आहे" याचा अर्थ असा आहे की,काही तरी गफला आहे.त्यांना ही थकबाकी भरण्याची काय गरज पडली होती ? या प्रकरणातून दोन प्रश्न उद्भवतात.सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे तेथील रहिवाशांना दहा महिने अकारण अंधारात रहावे लागले. त्या संबंधात हा अक्षम्य गुन्हा घडला आहे त्या बाबतीत निवेदनात काहीही खुलासा करण्यात आलेला नाही. ज्यांच्यामुळे या रहिवाशांना अंधारात रहावे लागले त्यांना काय शिक्षा करण्यात येणार आहे?

श्री.दयानंद मस्के : या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल आणि संबंधित अधिकारी जर दोषी आढळून आले तर त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : या बाबतीत निवेदन करण्यात यावे.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे यासंबंधीचे निवेदन उद्या करण्यात येणार आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : पुढील आठवडयात निवेदन करतो.

श्री.अनंत तरे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कोणाचेही वीज आणि पाण्याचे कनेक्शन कापता येत नाही असे असतांना या रहिवाशांची विजेची कनेक्शन्स का कापण्यात आली ?

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के : या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.अनंत तरे :किती दिवसात आपण चौकशी करणार आहात ?

श्री.दयानंद मस्के : एक महिना लागेल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. इतक्या दिवस चौकशीसाठी लागणे बरोबर नाही.

श्री.दयानंद मस्के : पुढील आठवडयात चौकशी करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, पहिली गोष्ट म्हणजे या सर्व गोष्टींची चौकशी आपण दोन दिवसात करावी आणि शुक्रवारी आपण या बाबत दुरूस्त निवेदन करावे. मी आपणास त्यासाठी पूर्ण संधी देत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे काल या सभागृहामध्ये एका कॅन्सरग्रस्त महिलेला जागा उपलब्ध करून देण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित झाला असता आपण सदरहू महिलेला जागा उपलब्ध करून देणार होता. उद्या पर्यंत म्हणजे आज सायंकाळपर्यंत सदरहू महिलेला जागा उपलब्ध करून देण्यास मी आपल्याला काल सांगितले होते. तेव्हा माझ्या कालच्या निदेशाची अमलबजावणी केली गेली आहे की नाही हे आपण आज सायंकाळपर्यंत सभागृहामध्ये निवेदन करून जाहीर करावे. सदरहू महिलेला अजून घर दिले नसेल तर संबंधित अधिकाऱ्यावर त्याबाबत ताबडतोब कारवाई आपण केली पाहिजे, तशी आपण ती करावी.

डॉ. अशोक मोडक : अध्यक्ष महाराज, शुक्रवारी मंत्री महोदय याबाबत निवेदन करतील ना?

उपसभापती : होय, मी तसे त्यांना सांगितले आहे.

****

<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u> ...

डॉ. नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील देवदासींचे आपल्या मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण आंदोलन सुरू झालेले आहे. खरे तर कोणीही अशा प्रकारे आंदोलन करीत असेल तर आंदोलनकर्त्यांना संबंधित मंत्र्यांनी, विभागाच्या सचिवांनी भेटून त्यांचे म्हणणे काय आहे याबाबतचे निवेदन स्वीकारले पाहिजे अशी अपेक्षा असते आणि तसे करण्याची आपली प्रथा देखील आहे. परंतु या देवदासींचे आंदोलन सुरू होऊनही अजूनपर्यंत तशी व्यवस्था झाल्याचे दिसत नाही. तेव्हा त्यांच्याकडे जाऊन त्यांचे निवेदन स्वीकारले तरी जावे अन्यथा त्यांना येथे आपल्याला भेटण्यास परवानगी तरी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे. तेव्हा याबाबतची नोंद घेऊन शासनाने याबाबत ताबडतोब कार्यवाही करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. मला वाटते आता आपण लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ. ...

..... पी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत ....

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, मला आपल्या परवानगीने या ठिकाणी औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करून माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे. अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये यापूर्वी अनेकदा 'वॅट' संबंधात चर्चा झाली आहे आणि आता हा कायदा 1 एप्रिल 2005 पासून या राज्यात लागू होत आहे. औषधांवर लागणारा वॅट रद्द व्हावा किंवा तो औषधांवर आकारू नये अशी अनेक निवेदने आम्ही केली होती. पण त्यावर कोठल्याही प्रकारे शासनाकडून उत्तर आलेले नाही. किमान औषधांवर वॅट लागू करताना एमआरपी मध्ये तो समाविष्ट करावा जेणे करून त्यांच्या किंमती वेगवेगळ्या राहणार नाहीत आणि त्यातून ग्राहकांचे नुकसान होणार नाही अशी मागणी औषध विक्रेत्यांकडून, डिलर्सकडून करण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांनी, म्हणजे केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्टस्नी 1 एप्रिल रोजी 'बंद' पुकारलेला आहे. तेव्हा माझी या निमित्ताने माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे की, औषधांवर वॅट लागू होणार आहे की नाही, लागणार असेल तर एमआरपी मध्ये तो समाविष्ट केला जाणार आहे किंवा कसा याबाबतचे धोरण आपण त्वरित जाहीर करावे. जेणे करून लाखो लोकांना औषधे सहजगत्या मिळू शकतील. अध्यक्ष महाराज, यासाठी मी आपल्या मार्फत माननीय वित्त मंत्र्यांना आवाहन करतो की, त्यांनी एक तर 'वॅट' औषधांवर लावू नये आणि लावावयाचा झाल्यास एमआरपीमध्ये समाविष्ट करावा. आणि याबाबतचे धोरण स्पष्ट करावे.

श्री. प्रकाश शेंडगे : अध्यक्ष महाराज, मला देखील एक औचित्त्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. कालपासून मुंबईच्या आझाद मैदानावर देवदासींनी आपल्या मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केलेले आहे पण अद्याप सरकारने त्यांची दखल घेतलेली नाही. तरी शासनाने त्यांची त्वरित दखल घ्यावी. त्याबाबत येथे निवेदन शासनाने केले पाहिजे आणि त्यांचे सुरू असलेले उपोषण थांबविले पाहिजे. ....

उपसभापती : हा विषय सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आताच उपस्थित केला आहे.

..... पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : अध्यक्ष महाराज, मला या ठिकाणी आपल्या परवानगीने एक औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. विक्रमगड येथील स्थानिक पत्रकार आणि 'महाराष्ट्र भूमी समाचार' या पाक्षिकाचे संपादक श्री.ज्ञानेश्वर सांबारे हे एका आदिवासी तरूणाला मारहाण झाल्याबद्दल विक्रमगड पोलीस ठाण्यामध्ये चौकशीसाठी गेले असता तेथील ठाणे अंमलदार व पोलीस शिपाई यांनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली आहे. ही एक अत्यंत गंभीर अशी घटना आहे तरी याबाबत शासनाने त्वरित दखल घ्यावी अशी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. आता यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

*****

<u>लक्षवेधी सुचनेबाबत</u> ....

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील पहिल्या क्रमांकावरील लक्षवेधी सुचनेवर सन्माननीय मंत्री श्री.सुरूपसिंग नाईक हे उत्तर देणार आहेत. परंतु ते आजारी असल्यामुळे आज सभागृहामध्ये उपस्थित राहू शकणार नाहीत. तरी ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल. .... उद्या किंवा परवाच्या दिवशी. ..

श्री. प्रकाश शेंडगे : अध्यक्ष महाराज, उद्या ही सूचना घेतली जाणार असेल तर प्रथम क्रमांकाने घेतली जावी.

उपसभापती : ठीक आहे.

*****

(यानंतर श्री.जागडे ....क्यू 1 ..

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 2 संबंधी

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेचे उत्तर यावयाला वेळ लागणार आहे.

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मला याची जाणीव आहे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना मंगळवारी घेण्यात यावी.

उपसभापती : ठीक आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या 50 टक्के जागा अन्य राज्यांच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे.

मु.शी.: वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या 50 टक्के जागा अन्य राज्यांच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे या संबंधी डॉ. दीपक सावंत, अनंत तरे, मधुकर सरपोतदार, विलास अवचट, अरविंद सावंत, अनिल परब यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकिय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" महाराष्ट्रातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या एकूण पदव्युत्तर पदवी/पदवीकांसाठी सुमारे फक्त 1400 जागा असून त्यापैकी 50% टक्के जागा अन्य राज्याच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येणे, सदर राखीव जागांमुळे महाराष्ट्रातील वैद्यकीय पदवीप्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणारा सतत अन्याय, या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी राज्याच्या कोटयातील जागा वाढून घेण्याबाबत राज्य शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासिनता, दिरंगाईचे धोरण, परिणामी सातत्याने पदव्युत्तर पदवीधारकांचा तसेच सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांचा यापुढे कालांतराने पडणारा तुटवडा, त्यामुळे राज्याच्या शहरी व ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम, तसेच महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलतर्फे पदव्यत्तर पदवी असलेल्या मेडिकल कॉलेजमध्ये डी.एन.बी. (डिप्लोमा ऑफ नॅशनल बोर्ड) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची संधी बंद करण्यात येणे, मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडिया यांचेशी सतत पत्रव्यवहार करुन व झगडून डी.एन.बी. कोर्सला पश्चिम बंगाल शासनाने मिळविलेली मान्यता, पण सदर कोर्सबाबत राज्य शासनाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यातील वैद्यकीय विद्यार्थ्यांत व जनतेत पसरलेली संतापाची लाट व तीव्र असंतोष लक्षात घेता राज्यातील वैद्यकीय पदवी-पदव्युत्तर पदविका व डी.एन.बी.च्या जागा वाढवून घेण्याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकिय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आले आहे. ते खूपच मोठे आहे. निवेदनात असे म्हंटले आहे की, या अभ्यासक्रमाच्या 1179 जागा आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या 987 जागा आहेत. यातील 50 टक्के जागा ऑल इंडिया कोट्याला जात असतात. बाकीच्या राहिलेल्या जागांपैकी 25 टक्के जागा इन सर्विसच्या लोकांना जातात आणि राहिलेल्या 25 टक्के जागा रिझर्व्हेशन आणि ओपनसाठी असतात. त्यामुळे महाराष्ट्रातील मुलांना या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. ऑल इंडियाच्या कोट्यातून महाराष्ट्रातील मुलगा येत नाही. मला या ठिकाणी असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ऑल इंडिया कोट्यातील किती जागा शिल्लक राहिलेल्या आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2003 मध्ये दोन्ही सभागृहाने एक विधेयक पास केले होते. त्या विधेयकामध्ये ऑल इंडिया कोट्यासाठी रिझर्व्हेशन ठेवण्यात आलेले नव्हते. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी दोन्ही सभागृहाने हे विधेयक पास केले होते. हे विधेयक नंतर सुप्रिम कोर्टात फेटाळले गेले. 50 टक्के जागा ऑल इंडिया कोट्यासाठी ठेवाव्या लागतील असा निर्णय सुप्रिम कोर्टाने दिला. त्याप्रमाणे या जागा ऑल इंडिया कोट्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत.

डॉ. दीपक सावंत : 25 टक्के जागा इन सर्विसच्या लोकांना जागात. 25 टक्क्यापैकी साडेबारा टक्के रिझर्व्हेशनसाठी आणि साडेबारा टक्के ओपनसाठी जातात. तेव्हा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. तेव्हा ऑल इंडिया कोटा काढून टाकण्यासाठी, तो कमी करण्यासाठी काही प्रयत्न शासन करणार आहे काय ? शासन यासाठी पुन्हा सुप्रिम कोर्टात जाणार आहे काय ? महाराष्ट्रातील मुलांवर आज जो अन्याय होत आहे, त्यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : आता यासाठी सुप्रिम कोर्टात जाणे बरोबर होणार नाही. कारण मध्यवर्ती सरकारचा जो कायदा आहे, त्याप्रमाणे 50 टक्के जागा ऑल इंडिया कोट्यासाठी राखून ठेवण्यात याव्यात. सर्व राज्यांना हा कायदा लागू आहे.

डॉ. दीपक सावंत : ऑल इंडिया कोट्यातील किती जागा आता शिल्लक राहिलेल्या आहेत?

श्री. सुरेश शेट्टी : ही बाब आता प्रोसेसमध्ये आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्या माहितीप्रमाणे 350 जागा फक्त ऑल इंडीयाकडून भरल्या. आम्हाला 150 जागा नको असे ऑल इंडियाने आपल्याला कळविले हे खरे आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : अजूनपर्यंत ऑल इंडियाकडून आपल्याकडे माहिती आली नाही. परंतु त्यांना नको असलेल्या ज्या सीट शिल्लक रहातात त्या रिव्हर्ट सीट म्हणून सोडून देतो. सीटची फायनल फिगर मिळाल्यानंतर ऑल इंडियाकडे इतक्या सीट शिल्लक असल्याचे आम्हाला कळते. त्या सीट मेरिट लिस्टप्रमाणे वेटींग लिस्टवरील लोकांना देतो.

डॉ. दीपक सावंत : ऑल इंडियाचे पत्र शासनाला प्राप्त झाले आहे. 150 जागा आम्हाला नको असे त्यांनी कळविले. या सीटची गोलमाल करावयाची आहे म्हणून शासन सभागृहाला माहिती देत नाही. या सीटची विभागणी कशी होणार आहे या विषयी माहिती मिळाली पाहिजे. आज 150 डॉक्टर तयार होणार आहेत, त्यापैकी काही एम.डी., एम.एस.साठी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात जातील तर काही केंद्र सरकारच्या कॉलेजमध्ये जातील. एक तर आपल्याकडे डॉक्टर्सची संख्या कमी आहे. आपण बाहेरच्या लोकांना प्रवेश देता. ज्या जागा ऑल इंडियाकडून भरल्यानंतर उरतील त्या फक्त महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना देणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी जोपर्यंत या खात्याचा मंत्री आहे तोपर्यंत ॲडमिशन प्रोसेसमध्ये काही गोंधळ होणार नाही याची मी शासन म्हणून खात्री देतो. स्पेसिफिक संदर्भामध्ये किती सीट रिव्हर्ट झाल्या याची माहिती अद्यापपर्यंत माझ्याकडे आली नाही. एक्झाक्ट फिगर आल्यानंतर सभागृहाला माहिती देतो. ज्या सीट महाराष्ट्रामध्ये रिव्हर्ट होतील त्या 100 टक्के महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मेरीट लिस्टप्रमाणे देऊ.

डॉ. दीपक सावंत : दुसरे असे की, दिल्लीमध्ये डीएनबी अशी डिग्री दिली जाते. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमाप्रमाणे जी कॉलेजेस सुरु आहेत त्या कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन डिग्री आहे त्या कॉलेजमध्ये डीएनबी द्यायला परवानगी नाही. परंतु वेस्ट बेंगॉलमध्ये एमसीआयने तशी परवानगी दिली आहे. आपल्या शासनाने त्या प्रमाणे प्रयत्न कां केला नाही? दुसरे असे की, ज्या कॉलेजमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर नाही, ज्या इंस्टिटयुटमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर नाही अशा इंस्टिटयुटला आपण डीनएनबी करावयास परवानगी देत नाही परंतु शिफारस करता. कारण आज हिंदुजामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

हॉस्पिटलमध्ये, लिलावती हॉस्पिटलमध्ये व आदित्य ज्योत हॉस्पिटलमध्ये डीएनबी करावयास परवानगी दिली जाते. 66 खाजगी हॉस्पिटल्समध्ये डीएनबी करावयास परवानगी दिली जाते. ज्या कॉलेजमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर नाही. त्या ठिकाणी ऑनररी डॉक्टर सांगेल त्याप्रमाणे हे डॉक्टर्स औषधे देणार, त्या डॉक्टर्सना प्रॅक्टिकल एक्सपिरियन्स नसतो त्यांना तुम्ही पुन्हा रिव्हर्ट करणार. जे पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज किंवा इंस्टिटयुट आहेत, जे आज शासनाच्या अखत्यारित नाहीत अशा ठिकाणी डीएनबी सारखे कोर्सेस सुरु करणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : 2002-03 मध्ये शासनाचे जे मेडिकल कॉलेज होते त्याठिकाणी डीएनबी कोर्सेस सुरु होते. त्यानंतर, दि.6.9.2004 रोजी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने पत्र लिहिले की, पोस्ट ग्रॅज्युएट स्टेट इंस्टिटयुटमध्ये एम.डी., एम.एस.साठी कोर्स शिकवीत असाल तर डीएनबी कोर्स सुरु करु शकत नाही. आणि म्हणून स्टेट मेडिकल कॉलेजमध्ये ज्या ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएशन नाही अशा नांदेड व कोल्हापूर या ठिकाणी डीएनबी करावयास परवानगी दिली आहे. त्यानंतर 17 ऑगस्ट 2004 रोजी भारत सरकारने पत्र दिले की, तुम्ही स्टेट मेडिकल कॉलेजमध्ये डीएनबी कोर्सेस सुरु करु शकता. परंतु त्यामध्ये एक क्लॉज असा आहे की, These D.N.B. courses should be started with the prior approval of the Medical Council of India.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

आपल्याकडे केंद्र शासनाकडून 17 ऑगस्ट रोजी पत्र आले. त्यानंतर डी.एम.ई.आर. ने डिपार्टमेंटला लेटर पाठविले आहे. आमच्या विभागातर्फे आम्ही ऑल इंडिया मेडिकल कौन्सिल आणि हेल्थ मिनिस्ट्रीकडे ॲप्रोच झालो आहोत. They said that all the infrastructural facilities should be made available and a prior approval of the Medical Council of India is necessary for starting these courses.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्याला याठिकाणी डी.एन.बी.सुरु करण्यासाठी किती कालावधी लागेल ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आता नक्की तारीख सांगू शकत नाही. पण मी एक आश्वासन देऊ शकतो की, आम्ही लवकरात लवकर म्हणजे झालेतर पुढच्या ॲकॅडमिक इयरमध्ये सुरु करु. आम्हाला चांगले आहे. आमच्या विद्यार्थ्यांना जास्त स्कोप मिळेल, सीट मिळतील. आम्ही प्रयत्न करु. पाहिजे तर केंद्रीय हेल्थ मिनिस्टरनां मी स्वत: जाऊन भेटतो.

. . . .एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे शहराला मिळणारा रॉकेलचा अत्यल्प पुरवठा

मु.शी.: पुणे शहराला मिळणारा रॉकेलचा अत्यल्प पुरवठा या संबंधी सर्वश्री.संजय दत्त, धनाजी साठे, नतिकोद्दीन खतिब, सुधाकर गणगणे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनाजी साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाचा बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"पुणे शहरातील वाढती लोकसंख्या तसेच झोपडपट्टीचे प्रमाण वाढत असून पुणे शहराला मिळणारा रॉकेलचा अत्यल्प पुरवठा, शहरास 72 के.एल.रॉकेल लागत असताना 60 के.एल.पेक्षा कमी रॉकेल पुरवठा होत असणे, त्यामुळे पुणे शहरातील 40 टक्के झोपडपट्टी-वासियांना रॉकेल पुरवठा होत नसणे, गरीब जनतेला रॉकेलासारख्या जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत राज्य शासनानें उपाययोजना करुन पुणे शहरातील रॉकेल पुरवठा वाढवण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुनील तटकरे(अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "केंद्र शासनाकडून राज्यास दरमहा 1,34,231 कि.लि.केरोसीन नियतन मिळते, ते राज्याच्या गरजेच्या 69 टक्के आहे." पुणे शहरामध्ये 10,59,173 कार्डधारक केरोसिन मिळण्यास पात्र असून, ते रॉकेलची मागणी करीत आहेत आणि त्यामानाने पुरवठा अत्यंत कमी प्रमाणात असल्यामुळे गोरगरीब आणि झोपडपट्टीतील लोकांना रॉकेल न मिळण्यामध्ये होत आहे. याबाबतीत शासन लक्ष घालून याची चौकशी करणार आहे का ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये नमूद केल्याप्रमाणे भारत सरकार आपल्याला जे नियतन मंजूर करते, त्यापेक्षा जास्त पुणे शहरासाठी नियतन देण्याचा आपण प्रयत्न केला आहे. जे अतिरिक्त नियतन उपलब्ध झाले, ते सुध्दा त्याप्रमाणात पुणे शहरासाठी ते आपण उपलब्ध केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पुणे शहरामध्ये असलेल्या झोपडपट्टीवासियांना वेळेवर रॉकेल मिळाले पाहिजे. यादृष्टीने राज्य शासनाची कारवाई सुरु आहे. पण याबाबतीत सन्माननीय सदस्यांकडे तक्रार असेल तर तसे सांगावे. त्याबाबतीत चौकशी करुन कारवाई केली जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, याबाबतीत तक्रार आल्यावर दखल घेतली जाईल हे एक ठराविक उत्तर म्हणून ठीक आहे. पण केरोसीनच्या संदर्भात रेशनिंग कृती समितीच्या महिला संघटनेने सातत्याने या प्रश्नाच्या संदर्भात आंदोलने छेडली आहेत. तेव्हा याबाबतीत संघटनेकडून तक्रारी आल्या आहेत का ? त्यासंबंधात काही कारवाई केली आहे का ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताईंनी जे सांगितले, ते खरे आहे. त्याप्रमाणे आमच्याकडे तक्रारी आल्या आहेत आणि त्याची चौकशी केली आहे. त्या अनुषंगाने गृह भेटी सुध्दा आयोजित केल्या आणि त्या भेटीमध्ये तथ्य आढळून आल्यावर जवळपास 20 दुकानदारांचे परवाने निलंबित केले आहेत.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, राज्याला गरजेच्या प्रमाणात फक्त 68 टक्के केरोसीन मिळते, म्हणजे 32 टक्के केरोसीन कमी मिळत आहे. तर ते मिळविण्यासाठी राज्य शासनाने काय प्रयत्न केला आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंदर्भात राज्य शासन वेळोवेळी केंद्र शासनाच्या पेट्रोलिअम विभागाकडे पाठपुरावा करते. गॅस सिलेंडर पेट्रोल कंपन्यांकडून दिले जातात आणि

. . . .एस-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याची माहिती पेट्रोल कंपन्यांकडे असते. जसजसे गॅस सिलेंडर दिले जातात, त्याप्रमाणात रॉकेलचे नियतन कमी करण्यात येते. तथापि भारनियमन आणि अन्य गोष्टी लक्षात घेऊन भारत सरकारने राज्य शासनाला मिळणारे नियतन वाढवून द्यावे यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालू आहे, मी स्वत:ही या बाबतीत पाठपुरावा करीत आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, फक्त रॉकेल वापरणा-यांसाठी गरजेच्या 68 टक्के करोसीन मिळते. माननीय मंत्री महोदयांनी गॅसबाबत सांगितले. पण याठिकाणी गॅस सिलेंडरचा संबंध काय आहे ? आपल्याला गरजेप्रमाणे 100 टक्के रॉकेल का मिळत नाही ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, याठिकाणी गॅस सिलेंडरचा संबंध येतो. जेवढे एक किंवा दोन गॅस सिलेंडर धारक आहेत, त्यांच्या प्रमाणात रॉकेलचे नियतन जात असते आणि या बाबतीत पेट्रोल कंपन्या माहिती देत असल्यामुळे, ते जितक्या प्रमाणात रिलीज होते, तेवढया प्रमाणात केरोसीनचे नियतन कमी होते. तथापि राज्य सरकार याबाबतीत सतत पाठपुरावा करीत आहे आणि मी स्वत:ही याबाबतीत पाठपुरावा करीत आहे.

. . . .एस-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: गोवेली ता.उल्हासनगर, जि.ठाणे येथील शासकीय

रुग्णालयातील रुग्णवाहिका गेल्या तीन महिन्यापासून बंद असणे.

मु.शी.: गोवेली ता.उल्हासनगर, जि.ठाणे येथील शासकीय रुग्णालयातील रुग्णवाहिका गेल्या तीन महिन्यापासून बंद असणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गोवेली ता.उल्हासनगर, जि.ठाणे याठिकाणी शासकीय रुग्णालय असून ग्रामीण-मागास भागातील लोकांसाठी औषधोपचार मिळतात. तथापि या रुग्णालयातील रुग्णवाहिका गेल्या तीन महिन्यापासून "चालका"अभावी बंद असून गोरगरीब व आदिवासी रुग्णांना प्रचंड त्रास होत आहे. गरीब आदिवासी रुग्णांना त्यामुळे अन्य दवाखान्यात जाण्यासाठी प्रचंड खर्च करावा लागत आहे. याबाबत शासनाने दखल घेऊन कारवाई करणेसाठी.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते पुढे चालू....

सभापती महोदय, गोवेली या गावी शासनाचे ग्रामीण रुग्णालय आहे. या रुग्णालयाच्या माध्यमातून त्या परिसरातील गरीब आदिवासी रुग्णांसाठी वैद्यकीय उपचाराची सोय केलेली आहे. परंतु त्या ठिकाणी रुग्णवाहिका नसल्यामुळे अडचण होत होती. यासाठी विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी आमदार फंडामधून रुग्णवाहिका दिली. परंतु गेल्या तीन महिन्यापासून ती बंद स्थितीत आहे. रुग्णवाहिका नसल्यामुळे बाहेरगावाहून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना त्याचा उपयोग होत नाही.. शेवटी त्यांना पैसे खर्च करुन त्रास सहन करावा लागतो. या संदर्भात वारंवार विनंती करुनही त्याची दखल घेतली जात नाही. याबाबत विचारणा केली असता, असे सांगण्यात आले की, चालक नसल्यामुळे रुग्णवाहिका चालू नाही. या त्रासामुळे लोकांनी उपोषण करण्याची नोटीससुध्दा दिलेली आहे. म्हणून या प्रकरणी शासनाने लक्ष घालावे म्हणून आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधीत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृशी. : रोहा (जि.रायगड) तालुक्यातील भातसई येथील आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत कामामध्ये भ्रष्टाचार.

मु.शी. : रोहा (जि.रायगड) तालुक्यातील भातसई येथील आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत कामामध्ये भ्रष्टाचार याबाबत श्री. जयंत पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेजाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूचना मांडतो.

"रोहा तालुक्यातील भातसई (जि.रायगड) येथील आदर्श ग्राम योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये 2 लाख 45 हजार 352 रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झाल्याचे राज्याचे तत्कालिन जतलसंपदा मंत्री मा.बाबासाहेब धाबेकर यांनी दिनांक 7 जून 2004 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना पत्र पाठवून कळविले आहे व अपहारीत रक्कम 15 दिवसांत वसूल करून संस्थेविरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, असेही पत्रात म्हटले आहे. याबाबत जिल्हापरिदेमार्फत कोणत्याच प्रकारची अजून कार्यवाही झाली नाही, म्हणून मी डिसेंबर 2003, मार्च 2004 च्या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न विचारले होते. तरी तत्कालिन जलसंपदा मंत्री यांनी पाठविलेल्या दिनांक 7 जून 2004 च्या पत्रानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कारवाई का केली नाही ? याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे विरुध्द जरूरती शासनाने कारवाई करावी आणि मंत्री महोदयांच्या आदेशानुसार भातसई आदर्श ग्राम योजनेअंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची रक्कम त्वरित वसूल करावी म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृशी. : परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन, डायलेसिस व कोबाल्ट युनिटची व्यवस्था करण्याबाबत.

मु.शी. : परभाणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन, डायलेसिस व कोबाल्ट युनिटची व्यवस्था करण्याबाबत श्रीमती फौजिया खान यां□ दिलेली विशेष उल्लेजाची सूच□.

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती फौजिया खान यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडते :-

"परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात सिटी स्कॅन येऊन मोठा कालावधी लोटला असला तरी ते अद्याप कार्यान्वित झालेले नाही. याशिवाय या रुग्णालयात डायलेसिस युनिट आणि कोबाल्ट युनिटची व्यवस्था करण्यात यावी, अशी या भागातील जनतेची बऱ्याच कालावधीपासून मागणी असून शासनाचे त्याकडेही दुर्लक्ष होत आहे. या आत्याधुनिक यंत्रांच्या अभावामुळे रुग्णांची प्रचंड हेळसांड होत असून ती थांबविण्यासाठी तातडीने कार्यवाही होण्याची गरज आहे", म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करते.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृशी. : अंधेरी (पूर्व) येथे उभारणी करण्यात आलेल्या उड्डाण पुलाच्या बाजूला असलेल्या सेवा मार्ग व भुयारी मार्ग या कामास सुरुवात न झाल्याबाबत.

मु.शी. : "अंधेरी (पूर्व) येथे उभारणी करण्यात आलेल्या उड्डाण पुलाच्या बाजूला असलेल्या सेवा मार्ग व भुयारी मार्ग या कामास सुरुवात न झाल्याबाबत" याबाबत श्री.मधुकर सरपोतदार यांनी दिलेली विशेष उल्लेजाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी एक विशेष उल्लेजासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूचना मांडतो.

"पश्चिम द्रुतगती महामार्गावर अंधेरी (पूर्व) येथे उड्डाण पुलाची उभारणी करण्यात आली आहे. मूळ संकल्पनेनुसार या पुलाचे बांधकाम पूर्ण झालेले नसून केवळ रहदारीसाठी हा उड्डाण पूल वाहनांना खुला करण्यात आला असून उभय बाजूला सेवा मार्ग म्हणून रहदारीचे रस्ते आहेत. मूळ योजनेप्रमाणे पूर्वेकडून पश्चिमेला जाण्यासाठी भुयारी मार्गाची तरतूद केलेली आहे. परंतु त्या कामाला अद्यापही सुरुवात झालेली नसल्यामुळे सकाळी 6-30 ते रात्रो 10-00 वाजेपर्यन्त ये-जा करणाऱ्या आबालवृध्दांपर्यन्त सर्व नागरिकांना अक्षरश: जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडून जावे लागते. परिणामत: काही व्यक्तींना आपले प्राणही गमवावे लागले आहेत. स्थानिक नागरिकांतर्फे हा भुयारी मार्ग त्वरित तयार व्हावा म्हणून रस्ता रोको आंदोलन देखील करण्यात आले. या उड्डाण पुलाचे कंत्राटदार मे.जोग इंजिनिअर्स यांना महाराष्ट्र शासनाकडून त्यांच्या कामाची देय रक्कम न मिळाल्यामुळे त्यांनी काम बंद ठेवल्याचे कळते. हा उड्डाण पूल रहदारीला गाजावाजा करुन शासनातर्फे खुला करण्यात आला आहे. परंतु वेगाने जाणाऱ्या वाहनांची सोय झाली असली तरी पादचाऱ्यांची मात्र खूप गैरसोय झालेली आहे. यादृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या अडचणीचा त्वरित विचार करून आवश्यक बनलेल्या भुयारी मार्गाचे काम शक्य तितक्या लवकर मार्गी लावावे,अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे".

--

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासकीय गटविमा योजनेतील शासनाची नफेखोरी

मु.शी. : शासकीय गटविमा योजनेतील शासनाची नफेखोरी याबाबत डॉ. अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शासकीय गटविमा योजनेतील शासनाची नफेखोरी."

सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर,या माध्यमातून मी सदनाचे लक्ष वेधत आहे. मला सांगायला दु:ख वाटते की, सरकार नफेबाजी करीत आहे आणि बळी सरकारी अधिका-यांचा आणि कर्मचा-यांचा देत आहे. या योजनेचे नाव आहे, "शासकीय गट विमा योजना." जे अधिकारी आणि कर्मचा-यांना वर्ग-1साठी, वर्ग-2साठी, वर्ग-3 साठी आणि वर्ग-4 साठी क्रमशा 480 रुपये, 240 रुपये, 60 रुपये आणि 30 रुपये दरमहा हप्ता म्हणून कापून घेतले जातात. समजा हे कर्मचारी, त्यांच्या दुर्दैवाने, त्यांच्या नोकरीच्या काळातच मरण पावले तर त्यांना क्रमश: 4,80,000 रुपये, 2,40,000 रुपये, 60,000 रुपये आणि 30,000 रुपये इतके पैसे मिळतात. सभापती महोदय, मला सांगायला दु:ख वाटते की, कदाचित जर हा माणूस जीवंतच राहिला तर मात्र त्याचे कमालीचे नुकसान होते. तो ज्या वेळेला वयाच्या 60 व्या वर्षी सेवा निवृत्त होतो,त्यावेळेला त्याच्याकडून संचित झालेल्या रकमेपैकी 35 टक्के रक्कम ही रिस्क कव्हरेज रक्कम म्हणून कापून घेतली जाते आणि त्याच्या पदरात केवळ 65 टक्के रक्कम टाकली जाते. एका बाजूला सरकार असे संगते की, खाजगी व्यक्तिकडून आणि संस्थांकडून जी नफेखोरी चालते, त्याला पूर्णविराम देण्यासाठी पब्लिक सेक्टर एन्टरप्राईजेस असतात. येथे ध्यानात असे येते की, कर्मचा-यांच्या कल्याणाचा बळी देऊन सरकार नफा कमवायला निघाले आहे. हे मी कां म्हणतो? कारण असें की, गेल्या संपूर्ण 20 व्या शतकाचा जर आपण आढावा घेतला तर, 20 व्या शतकाच्या प्रारंभी साधारणत: ॲव्हरेज जीवनाची लांबी कमी होती. 50 व्या, 55 व्या वर्षी माणसे मरण पावायची. आता 70, 75 वर्षा पर्यंत माणसे जगतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

त्यांच्या लक्षात असे येते की, त्यांची फार मोठी रक्कम परस्पर कापून घेतली जाते.म्हणून माझ्या चार मागण्या आहेत. मला असे वाटते की, त्या चारही मागण्या अत्यंत रिलेव्हंन्ट आहेत. त्यांचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपविणार आहे. क्रमांक एक, शासकीय गट विमा योजना शासनाने ना नफा आणि ना तोटा या तत्वावर चालविली पाहिजे. काही राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये अशा योजना आहेत. सरकारने नफा कमवता कामा नये, At the cost of the employees. क्रमांक दोन, या योजनेच्या जमा-खर्चाचा अकाऊंट वेगळा ठेवण्यात यावा. शासनाने विशिष्ट कालावधीमध्ये अधिका-यांकडून, कर्मचा-यांकडून मासिक हप्त्यापोटी जी रक्कम घेतली आहे, त्या रक्कमेतून समजा त्या अधिका-याचा अथवा कर्मचा-याचा मृत्यू झाला तर विम्याच्या हप्त्याच्या भरपाईपोटी त्याच्या कुटुंबियांना अदा केलेली रक्कम आणखीन काही जो खर्च झालेला असेल तो बाजूला काढून प्रपोर्शनेट स्वरुपात स्वाभाविकपणे त्या व्यक्तीला ती परत दिली जावी. शासनाने याच्यावर नफा कमवू नये. क्रमांक तीन, वित्तीय वर्षे संपल्या नंतर त्या वर्षा अखेर अधिका-यांच्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यामध्ये किती रक्कम शिल्लक आहे याची स्लीप दिली जाते. आता ज्या अधिका-यांची आणि कर्मचा-यांची अशी विमा योजना शासन उतरवते त्यांचा लेजिटिमेट हक्क आहे. त्यांच्या खात्यावर किती रक्कम जमा झाली आहे हे त्यांना कळले पाहिजे. कारण दरमहा तुम्ही त्यांच्या पगारातून ती हप्त्याची रक्कम कापून घेता. क्रमांक चार, अशी कल्पना करु या की, 2002-2003, 2003-2004 या वर्षामध्ये सदर योजनेअंतर्गत शासनाकडे झालेली जमा, त्यावर शासनाने केलेला खर्च याची आकडेवारी खरे म्हणजे लोकांना कळली पाहिजे. Let there be transparency and honesty. हे जर केले तर शासन कर्मचा-यांचा बळी देऊन नफा कमवत नाही, असा एक विश्वास लोकांपर्यंत जाईल. नाही तर सरप्लस बजेट आखत बसाल आणि सामान्य माणसाला मात्र डेफिसिट भोगावा लागेल, एवढी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---x---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी. : सन 2000 मध्ये माध्यमिक शाळांना मान्यता मिळण्यापूर्वी अनधिकृत म्हणून जाहीर केलेल्या काही शाळांना पोलिसांकडून होत असलेला त्रास.

मु.शी. : सन 2000 मध्ये माध्येमिक शाळांना मान्यता मिळण्यापूर्वी अनधिकृत म्हणून जाहीर केलेल्या काही शाळांना पोलिसांकडून होत असलेला त्रास.याबाबत श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायक (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"सन 2000 मध्ये माध्यमिक शाळांना मान्यता देण्यास विलंब लागला, तत्पूर्वी त्या शाळा अनधिकृत म्हणून पोलीस स्टेशनला तक्रारी गेल्या, अद्याप त्या तक्रारी मागे न घेतल्यामुळे मान्यता मिळूनही त्या शाळांना पोलिसांकडून त्रास होत आहे."

सभापती महोदय, सन 2000 मध्ये त्यावेळचे शिक्षण मंत्री प्रा. रामकृष्ण मोरे असतांना शाळेला मान्यता द्यायला त्या वर्षी शासनाकडूनच उशीर झाला. त्याच्यापूर्वी हया शाळा अनधिकृत आहेत म्हणून त्या शाळांवर खटले भरण्यात आले होते. तसेच पोलीसस्टेशनला तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यानंतर 2000-2001 साली त्या शाळांना मान्यता मिळाली. आता त्या शाळा रेग्युलर सुरु आहेत. पण पोलीस स्टेशनकडून त्यांना सतत त्रास होत आहे. दर वेळेला त्यांच्यकाडे विचारणा होते की, तुमची शाळा अनधिकृत आहे. त्यावेळेला त्या शाळा सांगतात की, शासनाकडून आम्हाला मान्यता मिळालेली आहे. पण शासनाकडून त्याचे आदेश मात्र गेलेले नाहीत. त्यामुळे सतत या मंडळींना पोलिसांकडून त्रास सहन करावा लागतो. आता पोलीस स्टेशनकडून त्रास कसा होतो हे मी याठिकाणी स्पष्ट करुन सांगण्याची आवश्यकता नाही. माझ्या माहितीची एक शाळा चेंबूरला आहे आणि अशा अनेक शाळा मुंबईमध्ये आहेत. तेव्हा शासनाने एखादे सर्क्युलर काढून पोलीसस्टेशनला कळविले तर या शाळांचा ससेमिरा वाचेल. एवढीच विनंती आहे.

--x---

यानंतर श्री. बरवड ....

अशोधित प्रत / मुद्रितशोधनाची नाही

उपसभापती : यानंतर आपल्याला सन 2004-2006 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु करावयाची आहे. त्याआधी मध्यंतरासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे काय ?

श्री. विलास अवचट : मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक अर्धा तास स्थगित करावी.

उपसभापती : ठीक आहे. मध्यंतरासाठी अर्ध्या तासाची सुट्टी घेऊ. परंतु तत्पुर्वी सभागृहात बहुसंख्य सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत म्हणून विचारतो. आज अर्थसंकल्पावर अडीच तास चर्चा आहे आणि उद्या पुन्हा अडीच तास चर्चा आहे. याच्या व्यतिरिक्त उद्या आपल्याला विशेष सिटींग पाहिजे आहे काय ? विशेष सिटींग पाहिजे असेल तर आता सांगावे, नाही तर एकदा चर्चा सुरु झाली की संध्याकाळी चार पाच सदस्य सभागृहात उपस्थित असतात आणि मग सन्माननीय सदस्यांना कम्युनिकेट करणे कठीण जाते.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, आपण ती तरतूद करुन ठेवावी.

उपसभापती : एकदा तरतूद केली तर ते ताबडतोब सर्क्युलेट होईल.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, उद्या सकाळी 10.30 वाजता चर्चा ठेवावी.

उपसभापती : उद्या सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त सभागृहाची विशेष हाईल. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.46 ते 3.15 वाजेपर्यन्त मध्यंतर)

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

मु.शी.: सन 2005-2006 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे चालू)...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्याचे मा.अर्थमंत्री श्री.जयंत पाटील आणि मा.अर्थराज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी या सभागृहामध्ये सन 2005-2006 चा अर्थसंकल्प मांडलेला आहे. या अर्थसंकल्पाचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्याचा इतिहास आणि राज्याची परंपरा पाहिली तर आपल्याला दिसून येईल मग ती स्व.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या काळातील असो की स्व.वसंतदादा पाटील यांच्या काळातील असो. पण या राज्यामध्ये सातत्याने जादा महसुली उत्पन्नाच्या अनुषंगाने राज्याचा महसुली खर्च दाखविल्याचे दिसून येते. त्यामुळे बजेटमध्ये अडचणी येत होत्या. 1987-88 आणि 1993-1994 या दोन वर्षामध्ये शिलकी अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. हे दोन वर्षे सोडले तर यावर्षी 2005-2006 मध्ये 265 कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. सभापती महोदय, आज जरी शिलकी अर्थसंकल्प मांडलेला असला तरी, 2005-2006 सालासाठी राज्याचे महसुली उत्पन्न 50 हजार कोटीपर्यंत दाखविले असले तरी महाराष्ट्राची आर्थिक स्थिती अडचणीमध्ये आली आहे हे नाकारुन चालणार नाही. 1999 मध्ये युतीचे शासन होते त्यावेळी नागपूरच्या अधिवेशनामध्ये शासनाने श्वेतपत्रिका काढली होती. त्या श्वेतपत्रिकेमध्ये युतीच्या साडेचार वर्षाच्या काळामध्ये 43500 हजार कोटी इतके राज्यावर कर्ज झाल्याचे नमूद केले होते आणि तेव्हापासून 2005-2006 सालचा अर्थसंकल्प मांडत असताना हे कर्ज 1,10,200 कोटी इतके झाल्याचे म्हटलेले आहे. काल सन्माननीय विरोधी पक्ष नेते याठिकाणी सांगत होते की, तुमच्या गेल्या 5-6 वर्षाच्या काळामध्ये जवळपास 72 हजार कोटीने कर्ज वाढले आहे. हे खरे आहे. एकूण या राज्याचे महसुली उत्पन्न आहे ते जाते कोठे ? असा प्रश्न पडतो. याचा आपण शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास आपल्याला आढळून येईल की, 70 टक्के महसुली उत्पन्न सरकारी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

कर्मचा-यांचे पेन्शन बेनिफिट्स यावर खर्च होतो. हे 70 टक्के वजा केले पाहिजे. या राज्यावर 1,10,200 कोटी इतके कर्ज झाल्याचे यापूर्वी म्हटले गेले आहे. या कर्जावरील सर्व्हिसिंग लोन आणि सर्व्हिसिंग इंटरेस्ट देण्यासाठी साधारणपणे 36 टक्के महसुली खर्च होत आहे. त्यामुळे एकंदर 1.3 टक्के एवढया महसुली उत्पन्नापेक्षा जास्त खर्च केला जातो.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

आणि त्यानंतर विकासाचा जो आऊटले आहे त्यासाठी आपल्याला पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून सर्व्हिसिंग लोन आणि सर्व्हिसिंग इंटरेस्ट देण्यासाठी तसेच इतर कामासाठी आपणाला पैसे काढावे लागतात आणि त्यामुळे पुन्हा कर्ज वाढते. अशा दुष्टचक्रामध्ये आजची आपली अर्थव्यवस्था सापडलेली आहे. मी माननीय अर्थमंत्र्यांचे यासाठी अभिनंदन केले की, त्यांनी जवळ जवळ 265 कोटी रुपयाचा शिलकी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. भांडवली खर्च आणि भांडवली नफा यांची गोळाबेरीज केली तर 40 कोटी 16 लक्ष रुपये सरप्लस दाखविलेले आहेत. हा शिलकी अर्थसंकल्प आहे. परंतु त्याच बरोबर या राज्यावर कर्जही फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे, हे तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही. युतीच्या शासनाच्या वेळी 43 हजार कोटी रु.चे कर्ज काढण्यात आले. त्यावेळी त्यांनी निरनिराळ्या योजनांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे, मुंबईतील 55 उड्डाण पूल इत्यादी कामे हाती घेण्यात आली. याठिकाणी अनुशेषाचा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो. अनुशेष हा युतीच्या साडेचार वर्षाच्या काळात वाढलेला आहे....(अडथळा).. मी त्याबाबतची आकडेवारीही देतो. युतीच्या शासनाने मुंबईतील उड्डाण पूल, मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे, कृष्णा खो-यातील प्रकल्प इत्यादी कामे सुरु केली. या निरनिराळया योजनांसाठी, सिंचन प्रकल्पांसाठी त्यावेळी निधी उपलब्ध करुन दिला गेला. कामे सुरु केली गेली. मी असे म्हणत नाही की, युतीच्या शासनाने काहीच काम केलेले नाही. परंतु युतीच्या शासनाने कर्ज काढून जी कामे हाती घेतली ती कामे पूर्ण करण्याची जबाबदारी ही पुढच्या लोकशाही आघाडी सरकारवर आली. मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी हे या सभागृहामध्ये वारंवार सांगतात की, मुंबईतील 55 उड्डाण पूल आम्ही केले. युतीच्या काळामध्ये मुंबईतील 55 उड्डाण पुलांच्या कामांना सुरुवात झाली. त्यावेळी त्या कामावर 748 कोटी रु. खर्च झाला. परंतु हे पूल पूर्ण करण्यासाठी 1350 कोटी रुपये नंतरच्या काळात खर्च करण्यात आले. पुणे-एक्सप्रेस हायवेवर युतीच्या काळात 750 ते 800 कोटी रु. खर्च झाला. त्यावेळी जेवढा रस्ता झाला होता तेवढा तो त्याठिकाणी बंद करुन तो रस्ता जुन्या रस्त्याला जोडला असता तर खर्चाचा बोजा वाढला नसता. तो रस्ता पूर्ण करण्यासाठी एकूण 2250 कोटी रु.खर्च करावे लागले. आज या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे पासून 80 ते 100 कोटी रु.पर्यन्त उत्पन्न मिळते. परंतु 380 कोटी रु. हे शासनाला व्याजापोटी द्यावे लागतात ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. कृष्णेचे पाणी 2000 सालापर्यन्त अडविणे आवश्यक होते. त्यामुळे युतीच्या शासनाने कृष्णा खो-यातील कामांना सुरुवात केली.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी..

13 हजार कोटी रुपये बाँडच्या माध्यमातून कर्ज घेतले गेले. त्यावेळी बाजारात 10 ते 11 टक्के व्याजाने पैसे उपलब्ध होत असताना खुल्या बाजारात 17 ते 18 टक्के दराने युती शासनाने कर्ज घेतले. आपण त्यावेळी 7500 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आणि ते कर्ज आणि त्यावरील व्याज फेडण्याची जबाबदारी या सरकारवर आलेली आहे. म्हणून मी मघाशी सांगितले की, या कारणांमुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था काही प्रमाणात बिघडलेली आहे.70 टक्के रक्कम ही कर्मचा-यांचे पगार,सेवानिवृत्त कर्मचा-यांना देण्यात येत असलेली पेन्शन, यामध्ये खर्च होत आहे आणि 36 टक्के रक्कम आपण जे कर्ज घेतलेले आहे त्यावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी खर्च करीत आहोत. जर 100 रुपये खर्च करावयाचे असतील तर 103 रुपये या रेव्हेन्यूमधून खर्च करीत आहोत. यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न राज्य सरकारच्या माध्यमातून केला जात आहे. माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी सहावा अर्थसंकल्प या सभागृहात मांडलेला आहे. या राज्याची अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी माननीय अर्थमंत्री गेली सहा वर्षे प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. तशा प्रकारचे प्रयत्न करीत असल्याचे प्रत्येक अर्थसंकल्पात दिसून येत आहे म्हणून मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. तसेच या प्रयत्नांबद्दल मी लोकशाही आघाडी सरकारचे देखील अभिनंदन करतो. सभापती महोदय, या अर्थसंकल्पाचे **वैशिष्टय** असे आहे की, 2004-2005 या वर्षात महसुली रक्कम 40 हजार 394 कोटी अंदाजित करण्यात आली होती. ती रक्कम 42 हजार 843 कोटी रुपये इतकी झालेली आहे.2005-2006 मध्ये प्रोजेक्टेड रेव्हेन्यू हा 50 हजार 430 कोटी रुपयांचा दाखविण्यात आलेला आहे. 2003 या वर्षाच्या तुलनेत 2004-2005 या वर्षात 20.65 टक्के महसुलात वाढ झालेली आहे. 2004-2005 च्या सुधारित अंदाजानुसार 2005-2006 या वर्षाची अंदाजित वाढ 17.60 टक्क्यांनी झालेली आहे. हा अर्थसंकल्प सादर करीत असताना उत्पन्नाची सुध्दा साधने निर्माण झालेली आहेत. 1999 मध्ये लोकशाही आघाडीचे शासन आले त्यावेळी या राज्याचे महसुली उत्पन्न फक्त 24 हजार कोटी रुपयांचे होते. 2004-2005 या वर्षात महसुली उत्पन्न 38 हजार कोटी रुपये होते. पण प्रोजेक्टेड उत्पन्न 40 हजार कोटी रुपये झाले. परंतु आता ते उत्पन्न 42 हजार कोटी रुपयांपर्यन्त गेले आणि 2005-2006 मध्ये 50 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त अंदाजित महसुली उत्पन्न या ठिकाणी दाखविण्यात आलेले आहे. पहिला जर परफॉर्मन्स आणि आताच्या परफॉर्मन्स बघितला तर महसुली उत्पन्नात वाढ झालेली आपल्याला ---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

दिसून येईल. परंतु उत्पन्नात वाढ होत असताना हा पैसा कोणत्या भांडवली कामासाठी खर्च करतो आहोत काय यासंबंधी आपण नकाशा बघितला तर आपल्या या सर्व गोष्टी लक्षात येतील. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी उदाहरण दिलेले आहे. त्यांनी जे सांगितले ते सत्य आहे. त्यांनी या ठिकाणी जी आकडेवारी दिलेली आहे. 2000-2001 ला आपला प्लॅन आऊट-ले हा 12 हजार 330 कोटी रुपयांचा होता. त्यातील एकंदर 11 हजार 645 कोटी रुपये आपण खर्च केलेला आहे. म्हणजे आपण प्लॅन आऊट-ले पेक्षा 728 कोटी रुपये खर्च कमी केलेला आहे.2001-2002 मध्ये 11 हजार 700 कोटी रुपयांचा प्लॅन आऊट-ले होता. त्यापैकी 19 हजार 980 कोटी रुपये खर्च केलेला आहे. म्हणजे 1720 कोटी रुपये त्या प्लॅन आऊट-ले पेक्षा खर्च कमी केलेला आहे...

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, 2002-03 या वर्षाकरिता 11135 कोटी रुपयांचा प्लॅन होतात्यापैकी फक्त 7525 कोटी रुपये खर्च झाले आणि 3586 कोटी रुपये कमी खर्च झाले आहेत. 2003-04 या वर्षाकरिता 12650 कोटी रुपयांचा प्लॅन आउटले होता त्यापैकी 8362 कोटी रुपये खर्च झाले आणि 4287 कोटी रुपये कमी खर्च झाले होते. 2004-05 या वित्तीय वर्षामध्ये 19983 कोटी रुपयांचा प्लॅन होता त्यापैकी 10670 कोटी रुपये खर्च झाले 9313 कोटी रुपये खर्च होऊ शकले नाहीत. 2005-06 या वित्तीय वर्षाकरिता 19000 कोटी पेक्षा जास्त रकमेचा प्लॅन तयार करण्यात आला आहे. याचा अर्थ महसूली उत्पन्नामध्ये वाढ होते परंतु विकासाच्या संदर्भात जो निधी आहे तो खर्च होत नाही हे आकडेवारीवरुन दिसून येत आहे. यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. आपण 36 टक्के कर्ज घेतो. कर्जाचे री-शेडयूलींग करा. कशा पध्दतीने व्याज कमी होईल आणि नवीन कर्ज कसे मिळेल यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. आज 7-8 टक्के दराने कर्ज उपलब्ध होईल. वर्ल्ड बँकेकडे प्रस्ताव देऊन 30-35 हजार कोटी रुपये कर्ज उपलब्ध करुन घ्या. राज्याची आर्थिक परिस्थिती सक्षम होत चालली आहे आणि सरप्लस बजेट मांडले आहे. जागतिक बँकेकडून 3-4 टक्के दराने 30-35 हजार कोटी रुपये कर्ज उपलब्ध करुन घ्यावेत. सध्या राज्यावर जो कर्जाचा प्रचंड बोजा आहे तो कमी होण्यास उपयोग होईल. माझी शासनाला विनंती आहे की, हे सर्व पर्याय शोधून कर्जाचे रीशेडयूलींग करावे आणि व्याजाचा दर कमी कसा होईल यासाठी प्रयत्न करावा. आज केंद्रामध्ये सुदैवाने या देशाचे पंतप्रधान हे अर्थतज्ज्ञ आहेत. राज्य शासनाची यासंदर्भातील भूमिका स्पष्ट करावी आणि केंद्राकडे पाठपुरावा करावा त्यादृष्टीनेही आपल्याला मदत होऊ शकते. कर्जाचे रीशेडयूलींग कसे होईल आणि व्याजाचा दर कमी कसा होईल हे पाहणे आवश्यक आहे. आज शासनाला 7-8 हजार कोटी रुपये केवळ व्याजापोटी भरावे लागत आहेत. जागतिक बँकेकडून कमी दराने अर्थपुरवठा झाला तर व्याजातून या राज्याची सुटका होऊ शकते. सभापती महोदय, या बजेटमध्ये वेगवेगळे विषय आहेत. मा.सदस्य श्री.दिवाकर रावते यांना काही प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, केंद्र सरकारचा याठिकाणी मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उल्लेख केला. मा.श्री. शरद पवार,केंद्रीय कृषी मंत्री यांनी 2/3 महिन्यापूर्वी ऊस उत्पादक शेतक-यांना आधार मिळावा म्हणून आणि आत्महत्या करण्यापासून ते परावृत्त व्हावेत

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

म्हणून कोणत्याही परिस्थितीमध्ये 1352 कोटी रुपये केंद्राकडून आणून साखर कारखाने जगवू आणि पैसे उपलब्ध करुन देऊ असे म्हणाले होते. हे पैसे केंद्राकडून आले काय असा माझा प्रश्न आहे. मा.सदस्य हे केंद्र सरकारचे कौतुक करीत आहेत म्हणून मी हा प्रश्न उपस्थित केला आणि त्यांनी माहिती दिली तर माझ्या ज्ञानात भर पडेल.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय,केन्द्रामध्ये आमचा हक्काचा मनुष्य बसलेला आहे हे आपण का नाकारता ? या राज्यातील दुष्काळग्रस्त लोकांना जी मदत द्यावयाची होती ती मदत एन.डी.ए.चे सरकार असतांना आम्हाला मिळाली नाही.परंतु डॉ.मनमोहन सिंग पंतप्रधान झाल्यानंतर कृषी मंत्री या नात्याने माननीय श्री.शरद पवार यांनी महाराष्ट्राचे शिष्टमंडळ पंतप्रधानाकडे नेले होते आणि तेव्हा त्यांनी 500 कोटी रुपयांची मदत दिली होती . ही मदत आपण का नाकारता ? आमचा हक्काचा मनुष्य त्या ठिकाणी बसलेला आहे त्यामुळे जी मदत आम्हाला लागेल ती मदत आम्ही तेथून आणू.त्याचबरोबर त्यांनी जाहीर केलेली जी मदत असेल ती सुध्दा आणण्याचा प्रयत्न लोकशाही आघाडीचे सरकार करील एवढाच भरवसा मी या निमित्ताने आपल्याला देऊ इच्छितो.

डॉ.सुनील देशमुख : माननीय सदस्य श्री.कुलकर्णी सरकारची बाजू येथे मांडत असतांना सन्माननीय सदस्य त्यांच्या भाषणात अडथळे का आणत आहेत ?

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सदस्यांकडे न बघता माझ्याकडे बघून भाषण करावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,या अर्थसंकल्पामध्ये कॉलेज फी आकारण्याच्या बाबतीत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो निर्णय चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही. परंतु सर्व काही फुकट मिळण्याच्या बाबतीत जर आपण राज्यात स्पर्धा निर्माण केली तर ज्यांच्याकडे पैसे देण्याची क्षमता आहे, जे पैसे देऊ शकतात, जे पैसे देऊन शिक्षण घेऊ शकतात त्यांना माफी देण्याचा जर प्रयत्न होत असेल तर तो बरोबर नाही. शासनाने ही जी योजना मांडलेली आहे तिला माझे पूर्णपणे समर्थन आहे.सभापती महोदय, यानंतर मला पर्यटनासंबंधी बोलावयाचे आहे गेल्या अर्थसंकल्पामध्ये जी निरनिराळी पॅकेजेस देण्यात आली होती त्यामध्ये कोकणासाठी 300 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती.याबद्दल मी लोकशाही आघाडी शासनाचे अभिनंदन करतो. या राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्या प्रथम कोकणासाठी एवढा मोठा निधी मिळाला होता.कोकण पॅकेजच्या निमित्ताने कोकणाला 300 कोटी रुपये मिळाले होते.परंतु त्यावेळी आमची हेटाळणी करण्यात आली होती. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी जेव्हा आम्ही ठीक ठिकाणी प्रचारासाठी जावयाचो तेव्हा सर्व विरोधक आमची टिंगल टवाळी करावयाचे.शासनाकडे .खाण्यासाठी पैसे नसतांना 300 कोटी रुपयांचे पॅकेज कसे जाहीर करण्यात आले होते असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

सांगून आमची टवाळी करण्यात आली होती.अनेकांनी आम्हाला त्यावेळी दोष दिले होते. आता 300 कोटी रुपयांची कामे काढण्यात आली असून त्या कामाचा नारळ फोडण्यासाठी आणि क्रेडिट घेण्यासाठी कोकणात मोठी स्पर्धा सुरु आहे. शासनाने 300 कोटी रुपये कोकणाला दिले याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.हे पैसे निरनिराळया पर्यटनाच्या कामावर खर्च करण्यात आलेले आहेत.सिंधुदूर्ग हा एकमेव जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला आहे.तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार असतांना सिंधुदूर्ग पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला नव्हता परंतु त्यानंतर युतीचे शासन असतांना व श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री असतांना हा जिल्हा पर्यटन जिल्हा व्हावा म्हणून चालना देण्याचे काम झाले होते.परंतु त्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. या पर्यटनाच्या कामासाठी आता 20 कोटी रुपयाचा निधी जिल्हयात आलेला असून जिल्हाधिका-यांकडे हा निधी पडून आहेत. आजच मी माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांना अशी विनंती केली आहे की, 31 मार्च पर्यत जर हा निधी खर्च झाला नाही तर हा निधी परत जाईल असे न म्हणता ,हा निधी लॅप्स न करता खास बाब म्हणून त्याला एक्सटेन्शन देण्यात यावे.त्याप्रमाणे त्यांनी ही गोष्ट मान्य केलेली आहे.सिंधुदूर्ग हा पर्यटन जिल्हा जाहीर करण्यात आला असून फेब्रुवारी महिन्यात तो निधी आला आहे.परंतु 31 मार्च पर्यन्त हा निधी खर्च होऊ शकणार नाही म्हणूनच आम्ही स्पेशल मागणी माननीय अर्थ मंत्रिमहोदयांकडे केलेली आहे.कोकणासाठी केन्द्र सरकारने पाच कोटी रुपये कोकण रिव्हायवलच्या नावाने दिलेले आहे.जयगड किल्याच्या सुधारणेसाठी अडीच कोटी रुपये,सिंधुदूर्ग किल्याच्या डागडुजीसाठी आणि त्याच्या परिसरासाठी एक कोटी रुपये विजयदूर्गाच्या किल्यासाठी अडीच कोटी रुपये असे साडे पाच कोटी रुपये केन्द्र सरकारकडून कोकण रिव्हीएराच्या अंतर्गत मिळालेले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुळकर्णी ....

याला दोन अडीच वर्षे झालेली आहेत पण अद्यापपर्यंत याची एजन्सी कोणती आहे हे आम्हाला समजू शकलेले नाही. म्हणजे त्या ठिकाणी केंद्र सरकारचे बांधकाम खाते काम करणार आहे की, राज्य सरकारचे बांधकाम खाते काम करणार आहे हे समजू शकलेले नाही. मात्र आता आम्हाला कळते आहे की, केंद्रीय पर्यटन महामंडळाकडे हे पैसे वर्ग करण्यात आलेले आहेत. अध्यक्ष महाराज, सिंधुदुर्ग किल्ल्याच्या डागडुजीसाठी .. कारण त्या किल्ल्याची संपूर्ण तटबंदीच्या भिंती आता कोसळू लागल्या आहेत म्हणून त्याच्या डागडुजीसाठी 1 कोटीचा निधी पुरातत्त्व खात्याकडे देण्याचे जाहीर झाले आहे पण अद्यापपर्यंत त्याचे काम काही सुरू झालेले नाही. तेव्हा संबंधित खात्याला विनंती आहे की, हा निधी खर्च करण्यासाठी त्वरेने कामे सुरू झाली पाहिजेत. अध्यक्ष महाराज, मला येथे सांगितले पाहिजे की, सागरी पर्यटन महामंडळ होऊ शकलेले नाही, हे खरे आहे. आमची त्या दृष्टीने मागणी जरूर होती. तरीसुध्दा कोकणाच्या पर्यटनाच्या बाबत आज शासनाचे लक्ष नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जे जे प्रकल्प प्रस्थापित केलेले आहेत त्यात 3-4 पंचतारांकित हॉटेल्सचा समावेश आहे .. आज त्या ठिकाणी टाटाचे हॉटेल होण्यासाठी 130 एकर जमीन देऊन ठेवली आहे तर कुणकेश्वर येथेही 10 एकर जमीन हॉटेल उभारण्यासाठी देऊन ठेवलेली आहे पण हे प्रकल्प अजून सुरू झालेले नाहीत त्यामुहे त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करून द्यावी इतकीच विनंती मी या निमित्ताने करतो. ...

श्री. अनंत तरे : या महामंडळाची शासनाने स्थापना केलेली आहे पण त्याला कार्यालयसुद्धा नाही. ...

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : आपण आपल्या भाषणामध्ये त्याबाबतचा मुद्दा जरूर मांडावा. अध्यक्ष महाराज, मी कोकणातील पर्यटनाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो. कोकणामध्ये सागरी महामार्ग झाला पाहिजे हे देखील कोकणवासियांचे एक स्वप्न आहे. ज्याप्रमाणे कोकणामध्ये रेल्वे येणे हे कोकणी माणसाचे स्वप्न होते आणि ते स्वप्न केव्हाच पूर्ण होणार नाही असे काहींचे मत होते पण ते स्वप्न पूर्ण झालेले आहे. करोडो रुपये खर्च करून कोकणामध्ये रेल्वे आली आणि रोज 40-50 गाड्या तेथून धावत आहेत. कोकण रेल्वे प्रमाणेच कोकणातील सागरी महामार्ग हेही कोकणवासियांचे एक स्वप्न आहे. सन्माननीय श्री.अंतुले हे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी या सागरी महामार्गाची सुरूवात केली होती आणि आज जवळ जवळ तो महामार्ग पूर्ण

..... बीबी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुळकर्णी ....

होण्याच्या मार्गावर आहे. या महामार्गामुळे कोकणातील पर्यटनाला निश्चितपणे चालना मिळणार आहे. गोव्याची लोकसंख्या 9 लाख आहे, त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात त्यांची संख्या सुमारे 12 लाखावर आहे आणि देशातील पर्यटक जमेस धरता जवळपास 18 लाख पर्यटक गोव्यामध्ये निरनिराळ्या कार्यक्रम आणि उत्सवांच्या निमित्ताने येत असतात. आता सिंधुदुर्ग जिल्हा देखील पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जे गोव्यामध्ये नाही ते सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. तेव्हा या सागरी महामार्गावरील दोन पूल होणे महत्त्वाचे आहे. त्यातील नाटे-टेकापूर हा खाडीवरील पूलाचे भूमीपूजन व्हायचे राहिले आहे. तेथील सुमारे 38 कि.मी.चा रस्ता करावयाचा आहे आणि त्यासाठी एकंदर 78 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तेव्हा ही 78 कोटीची तरतूद केली तर हा सागरी महामार्ग कोकणातून गोव्यामध्ये आणि त्यापुढेही जाईल. म्हणूनच या सागरी महामार्गासाठी देखील तरतूद आपण करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महाराज, या सरकारने सत्तेत येण्यापूर्वी मोफत वीज देण्याचे आश्वासन दिले होते. मी आमच्या मित्रांना सांगू इच्छितो की, आश्वासने ही पाळण्यासाठीच दिली जातात असे आमचे मत आहे, विश्वास आहे. तेव्हा दिलेली आश्वासने पाळली पाहिजेत हे आम्हाला आपल्याकडून समजावून घ्यायचे असेल तर त्यात काहीच अर्थ राहणार नाही असे मला वाटते. कारण 27 लाख तरूणांना नोकऱ्या देण्याचे, 40 लाख लोकांना मोफत घरे देण्याचे आश्वासन तुम्हीच दिलेले होते. ....

(यानंतर श्री. जागडे .... सीसी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुळकर्णी .....

झुणका भाकर केंद्र आपण गावागावात देणार होता ना ? आता त्या वादात मी जाऊ इच्छित नाही. सभापती महोदय, या शासनाने शेतक-यांना मोफत वीज देण्याचे धोरण जाहीर केले. त्याच्या मागे महत्वाचे कारण होते. राज्यातील 11 जिल्ह्यात आणि 73 तालुक्यात त्यावेळी भीषण दुष्काळाची परिस्थिती होती. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील गरीब शेतक-यांना मोफत वीज देण्याचे धोरण शासनाने केले आहे. त्यावेळी वीजमंडळाने एक पैसाही न देण्याचे ठरविले होते. म्हणून मागील अर्थसंकल्पात यासाठी शासनाने 750 कोटी रुपयाची तरतूद केली आहे. त्याप्रमाणे शेतक-यांना मोफत वीज देण्याचे धोरण जाहीर केले. त्यावेळी आमचे नेते मा. शरदरावजी पवार यांनी लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणूकीच्या वेळी जाहीरपणाने सांगितले होते की, शरद पवार हे शेतकरी आहेत, परंतु त्यांना मोफत वीज देता कामा नये. ज्यांची वीज बील भरण्याची ताकद आहे, जे श्रीमंत शेतकरी आहेत, त्यांना फुकट वीज देता कामा नये. जे अल्प भूधारक शेतकरी आहेत, गरीब शेतकरी आहेत, त्यांना मात्र मोफत वीज देण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे शासनाने तसे धोरण जाहीर केले होते. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा एमएसईबीचा आहे. 10 जून 2004 ला याचे बायफरगेशन व्हावयाला पाहिजे. मध्यवर्ती सरकारने या बाबतच्या कायद्यात 2003 साली सुधारणा केली आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी एमएसईबीचे बायफरगेशन करण्यात येणार आहे. निर्मिती कंपनी परिरक्षण कंपनी, वितरण कंपनी अशा चार कंपन्या निर्माण होणार आहेत. या कंपन्या तयार करीत असताना तेथील जो कर्मचारी आहे, तो अडचणीत येता कामा नये. त्यांना कामावरुन काढून टाकता कामा नये. तसे करण्यात आले तर माझा त्याला वैयक्तिकरित्या विरोध राहणार आहे. म्हणून या वीज मंडळाचे बायफरगेशन करीत असताना वीज मंडळाने कर्मचा-यांचे हित पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, कोकण विकास कार्यक्रमांतर्गत बंधारे आणि जेटी बांधण्याचे काम शासनाने करावयाचे ठरविले आहे. त्यासाठी 300 कोटीचे पॅकेज कोकणाला देण्यात आले आहे. कोकणातील मच्छिमारांना शासनाने मदत करण्याचे ठरविले आहे. कर्नल सुधीर सावंत हे रत्नागिरी आणि मालवण येथे जाऊन त्यांनी मच्छिमारांना चेक वाटले आहेत. म्हणून या बाबत मी शासनाने अभिनंदन करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुळकर्णी....

सभापती महोदय, कापूस एकाधिकार योजनेला 1972 साली सुरुवात झाली होती. नागपूर सेशनमध्ये या बाबतचा कायदा आता अस्तित्वात आहे काय ? असा प्रश्न निर्माण झाला होता. त्याप्रमाणे आज तर कायद्याने कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. असे असतानाही शेतक-यांना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली होती. काल माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी असे सांगितले होते की, विदर्भातील तसेच मराठवाड्यातील साडेंबारा हजार गावे दुष्काळग्रस्त आहेत.

(यानंतर श्री. सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

विदर्भातील जवळपास 10 हजार गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असतांना सुध्दा कापसाचे पिक कधी नव्हे इतके अमर्याद आले आहे. शासनाला कापूस एकाधिकार योजनेमध्ये 3200 कोटी रुपयांचा तोटा होत आहे. माझी शासनाला विनंती आहे की, आपण शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने मदत केली पाहिजे. केंद्राची आधारभूत किंमत 1700 रुपये क्विंटल असतांना राज्यामध्ये चढया भावाने कापूस खरेदी करण्याची स्पर्धा लागली. यामध्ये शिवसेना भाजपने 2100 रुपये भाव देऊ असे जाहीर केल्यानंतर आमच्या सरकारने 2300 रुपये भाव देण्याचे जाहीर केले. त्यानंतर शिवसेना भाजपने 2500 रुपये भाव देण्याचे जाहीर केल्यानंतर आमच्या सरकारने 2700 रुपये भाव देऊ असे जाहीर केले. या स्पर्धेमध्ये या योजनेचा बोऱ्या वाजला आहे. तेव्हा ही योजना चालू ठेवायची असेल किंवा बंद करावयाची असेल तर त्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. परंतु शासनाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता आपली भूमिका ठरविली पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालयांच्या बाबतीत माजी आरोग्य मंत्री श्री. दिग्विजय खानविलकर आणि माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी राज्यात लातूर, औरंगाबाद, अकोला याठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये काढली. परंतु कोकणातून इतके वर्षे आम्ही मागणी करीत असतांना कोकणात वैद्यकीय महाविद्यालये कां देत नाही? आमच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयात एकही वैद्यकीय महाविद्यालय नाही. आमच्याकडे शिकणारी मुले नाहीत काय, आमच्याकडे हुशार विद्यार्थी नाहीत काय, आमच्याकडे विद्यार्थ्यांच्या जागा कमी आहेत काय? तेव्हा कोकणामध्ये सुध्दा वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने जाहीर केले पाहिजे.

सभापती महोदय, दुसऱ्या एका महत्वाच्या प्रश्नामध्ये सर्वांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, बी.टी. देशमुख यांनीच अनुशेषाच्या संदर्भात बोलण्याची आवश्यकता आहे काय? भौगोलिक अनुशेषाच्या संदर्भात घटनेतील कलम 371(2) च्या तरतुदीनुसार माननीय राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशाबाबत शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. पाटबंधारे खालील 2751 कोटी रुपयांचा अनुशेष 4685 कोटी रुपयांपर्यंत गेला. आज आपण बजेट अलोकेशन केल्यानंतर कामांचे नियोजन करीत असतांना त्यावर पैसे कशा प्रकारे खर्च करावेत याबाबत चर्चा केली पाहिजे. हे करीत असतांना आपण असे ठरविले पाहिजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

की, पाटबंधारे किंवा अन्य सेक्टरमध्ये असलेला अनुशेष या पुढील पाच वर्षात शिल्लक रहाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. अशाप्रकारे राज्यामध्ये नवीन इतिहास निर्माण करण्याची जबाबदारी लोकशाही आघाडी सरकारने घेतली तर या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये कोणताही अनुशेष शिल्लक रहाणार नाही असे अभिवचन आम्हाला दिले पाहिजे. नाही तर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली. त्याप्रमाणे खालच्या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुध्दा आम्हाला जर सहकार्य करीत नसाल, आम्हाला आर्थिक ताकद देणार नसाल तर मुंबईसह स्वतंत्र कोकण झाला पाहिजे अशाप्रकारची भूमिका आम्हाला घ्यावी लागेल असे सांगितले. तेव्हा अशा पध्दतीने राज्यामध्ये स्वतंत्र विदर्भ आणि स्वतंत्र मुंबईसह कोकण अशा मागण्या करण्याची स्पर्धा लागेल....

डॉ. दीपक सावंत : विधानसभेत काय झाले ते इथे सांगण्याची आवश्यकता आहे काय?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी वर्तमानपत्रात छापून आले ते सांगितले आहे. तेव्हा स्वतंत्र विदर्भ आणि स्वतंत्र मुंबईसह कोकणची मागणी पुढे येऊ द्यावयाची नसेलतर अनुशेषाचा प्रश्न आपण गांभीर्याने घेतला पाहिजे. अनुशेषाचा प्रश्न सुटला नाही तर लोकांची मने दुभंगतील. आणि मग एकमेकांमध्ये असंतोष निर्माण झाला तर काय होईल हे मी आपणास सांगत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा हा मुंबईच्या झोपडपट्टीबाबत आहे. याबाबतीत मी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार बोलत होतो. मुंबईच्या विकासासाठी आतापर्यंत कोणत्याही शासनाने म्हणजे केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने जेवढे सहकार्य करण्याची भूमिका घेतली नव्हती, ती भूमिका अत्यंत आक्रमकपणे या लोकशाही आघाडी शासनाने घेतलेली आहे. 1985 मध्ये स्व.राजीव गांधी पंतप्रधान असताना, ते काँग्रेसच्या शताब्दीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुंबईला आले होते. तेव्हा त्यांनी धारावी झोपडपट्टीच्या विकासासाठी 100 कोटी रुपये दिले होते. त्यानंतर आतापर्यंत मुंबईच्या विकासासाठी खर्च केला जात नव्हता. मला आठवते की, जेव्हा स्व.वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते, नवलकरसाहेब, आपल्यालाही माहिती असेल. तेव्हा मुंबईमध्ये झोपडपट्टया कुठे होत्या ? तर तेव्हा धारावी या भागापुरती झोपडपट्टी मर्यादित होती. त्यावेळी त्यांच्या शासनाचे धोरण होते की, कोणत्याही प्रकारे मुंबईत झोपडपट्टी वाढता कामा नये आणि जर येथे झोपडपट्टी वाढली तर त्या भागातील पोलीस स्टेशनच्या सब इन्स्पेक्टरला आणि त्या वॉर्डमधील वॉर्ड ऑफीसरला जबाबदार धरले जात होते. त्यामुळे येथे झोपडपट्टी वाढत नव्हती आणि आज शासनाचे जे धोरण आहे, ते तेव्हा नव्हते. तसेच कै.इंदिरा गांधी पंतप्रधान असताना, पाच हजार कोटी रुपये पाणी, नळ इ.सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दिले होते. नंतरच्या काळात 1995 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता दिली. त्यांना घरे देण्याचा कार्यक्रम जाहीर केला. युती शासनाच्या काळामध्ये 40 लाख लोकांना घरे देण्याचा कार्यक्रम केला गेला. त्याचा परिणाम असा झाला की, या मुंबई शहरात काही मिळाले नाही तरी चालेल, पण घर फुकट मिळते. त्यावेळी 40 लाख लोकांना घरे देण्याचा कार्यक्रम जाहीर केल्यामुळे या मुंबई शहरात परप्रांतीयांचे लोंढे आले, जवळजवळ 15 लाख लोक मुंबईमध्ये आले. आपण योजना करतो पण त्याचे परिणाम काय होतील हे पहात नाही. आज मुंबई शहरात झोपडपट्टयांचा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे आणि संपूर्ण देशाला आणि राज्याला त्याला तोंड द्यावे लागत आहे. दि.1-1-95 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता देण्याचे जाहीर केले . . . .

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरु करुन 45 मिनिटे झालेली आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी दोन मिनिटांमध्ये भाषण संपवितो. आता 2000 पर्यंत झोपडपट्टयांना मान्यता दिली आहे . . . .

. . . .2 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (खाली बसून) : तुम्ही मुदत वाढवून देता, त्यामुळे लोंढे वाढतात.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : तुमच्याच काळामध्ये दि.1-1-1995 मध्ये कायदा केला. गेल्या निवडणुकीमध्ये आम्ही 2000 पर्यंतच्या झोपडपट्टीवासियांना पक्की घरे देण्याचा वायदा केला नाही तर त्यांची जी घरे आहेत, तेथे त्यांना सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न दोन्ही पक्षाकडून केला जाईल. अशा प्रकारची भूमिका दोन्ही पक्षांनी घेतली. आज मुंबईच्या विकासासाठी करोडो रुपयांच्या योजना जाहीर केल्या आहेत. जवळजवळ 35 हजार कोटीचा विकासाचा आराखडा राज्य शासनाने तयार केलेला आहे आणि तो विकास निरनिराळया मार्गाने म्हणजे बांद्रा ते वरळी मार्ग, तसेच हॉनबाय सर्कल ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयापर्यंतचा मार्ग, तसेच न्हावा शेवा रस्ता करण्याचे ठरविलेले आहे. तेव्हा निरनिराळया मार्गाने मुंबईचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. यापूर्वी एम.यु.टी.पी.प्रकल्पासाठी रस्त्यांचे वाईडींग केले होते का ? या रस्त्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे झुमकन ठाण्याला जातात. पूर्वी ते अशा प्रकारे गेले होते का ? पण आज हे काम लोकशाही आघाडीच्या माध्यमातून झालेले आहे. शासनाने या राज्यातील निरनिराळया जनतेचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली आहे. म्हणून मी लोकशाही आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. तसेच माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील आणि माननीय वित्त राज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांचेही अभिनंदन करतो. सभापती महोदय, मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

उपसभापती : एकूण 17 सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी नावे दिलेली आहे. कामकाज होईपर्यन्त म्हणजे रात्रो 8-00 वाजेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005-2006 चा अर्थसंकल्प सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी मांडला. ते 1 तास 58 मिनिटे आपले भाषण वाचत होते. हे भाषण वाजता वाचता, त्यांना दम लागला म्हणून तीनवेळा त्यांना पाणी प्यावे लागले. नुसते भाषण वाचतांना त्यांना इतका दम लागला...त्यामध्ये पाणीच होते. अन्य काही घेतले, असा माझा त्यांच्यावर आरोप नाही. ते असे काही करणार नाहीत, कारण त्याचे महत्त्व त्यांना कळते, असे मी मानतो. त्यांना 1 तास 58 मिनिटे अर्थसंकल्पाचे भाषण वाचावयास वेळ लागला, एवढा मोठा अर्थसंकल्प त्यांनी मांडला. मला असे वाटले की, हा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे कल्याण करणारा हा असावा, नाही तर एवढे मोठे भाषण मी माझ्या संसदीय इतिहासामध्ये कधी ऐकले नाही.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

महाराष्ट्रामध्ये अर्थसंकल्पाचे भाषण सर्वसाधरणपणे एक तासामध्ये वाचून संपते,नंतर त्यावर चर्चा होते. या अर्थसंकल्पामध्ये एकूण 113 शिर्षके मांडलेली आहेत. मला वाटले की, सगळी शिर्षके उत्पादित स्वरुपाची असतील, या सगळ्या शिर्षकाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला काही ना काही आपण दिले असेल, अशी माझी कल्पना होती. पण त्यापैकी 57 शिर्षके ही ज्याला मेडन ओव्हर्स म्हणतात तशी आहेत. त्यामधून एकही रन निघाला नाही, त्यातून काही निष्पन्न होणार नाही. त्यामधून फक्त शब्दांचे फुलोरे उधळलेले आहेत. याबाबत महाराष्ट्रातील स्पष्टीकरण द्यावे. हे सगळे सांगत असतांना 57 मुद्दे मांडलेले आहेत की, त्यामधून लोकांना गुमराह कसे करायचे, त्याकरिता चांगली भाषा कशी वापरायची हेच त्यामध्ये दिसते. मला वाटते, अर्थमंत्री महोदयांनी खालच्या सभागृहामध्ये शेरशायरी करून दाखविली. आमची अपेक्षा होती की, मा. अर्थ राज्यमंत्री या ठिकाणी एखादे काव्य सांगून हास्याची कारंजी फलवतील. सभागृहामध्ये एकप्रकारे टेन्शनचे वातावरण निर्माण झाले होते ते यामुळे दूर होईल. थोडेसे सभागृहामध्ये काव्य सांगून हास्य निर्माण होईल आणि सभागृहाला दिलासा मिळेल, अशी कल्पना होती, पण तसे घडले नाही. त्यांनी बरोबर दोन तास भाषण करून एकदा श्वास घेतला आणि ते खाली बसले. नंतर सन्माननीय सदस्यांना बॅगा मिळाल्यानंतर ते आपापल्या घरी निघून गेले. कितीजणांनी बॅग उघडून पाहिली हा नंतरचा प्रश्न आहे. पण बॅग भरुन संपूर्ण अर्थसंकल्प आमच्या ताब्यामध्ये दिला,ही गोष्ट तितकीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू.....

निर्विवाद आहे,त्याबद्दल मी अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. खालच्या सदनामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा चालू असल्यामुळे त्या ठिकाणी अर्थमंत्रीमहोदय बसले असतील. अर्थराज्यमंत्री महोदय या ठिकाणी बसलेले आहेत, त्यामुळे त्यांच्यासमोर मला आज हा विषय मांडावा लागतो. या वर्षामध्ये आपण महसुली उत्पन्न जवळपास 50,430 कोटी रुपये एवढे अपेक्षित केलेले आहे, प्रत्यक्षात किती उत्पन्न येईल वर्ष संपल्यानंतर कळेल. हे आकडे जाहीर करण्यासाठी असतात. वर्ष संपल्यानंतर आपण काय जाहीर केले होते आणि उत्पन्न किती आले, लोकांना त्यामधील काय दिले, याबाबत मागे कोणी हिशोब मांडत नाही. यामध्ये म्हटलेले आहे की, योजनेतर खर्चाची वाढ नियंत्रणात ठेवण्यात आली आहे आणि वेतन, सेवानिवृत्ती वेतन, व्याज प्रदान यावरील खर्च राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या 81 टक्क्यावरुन आता 67 टक्क्यावर आणण्यापर्यन्त यशस्वी व्हाल, अशाप्रकारची आपल्याला अपेक्षा आहे. महसुली उत्पन्न वाढले, की स्वाभाविकपणे हा खर्च वाढण्याची शक्यता असते. पण आपल्याला एवढा आत्मविश्वास आहे, आपली शासनावर मांड, पकड एवढी मजबूत आहे 81 टक्क्यावरुन हा खर्च 67 टक्क्यापर्यन्त खाली आणू असा आत्मविश्वास सन्माननीय अर्थमंत्र्यानी व्यक्त केलेला आहे. अर्थसंकल्पबाह्य कर्ज उभारण्याचा प्रसंग या शासनावर यापुढे येणार नाही.,असे खूप मोठे छान वाक्य फेकलेले आहे. भविष्य काळामध्ये अर्थसंकल्पाच्या बाहेर जाऊन कोणतेही कर्ज महाराष्ट्र शासनाला घ्यावे लागणार नाही, असा त्यांनी विश्वास निर्माण केलेला आहे. जे गुंतवणुकदार आहेत त्यांचा विश्वास निर्माण करण्यासाठी ,त्यांनी परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याची क्षमता शासनामध्ये आहे, असे आत्मविश्वासाने शासन म्हणते.

यानंतर कु.थोरात.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नोंद

श्री. मधुकर सरपोतदार....

लोकप्रतिनिधींच्या बाबतीत मी सुरुवातीलाच बोललो. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे दोन तास भाषण ऐकून लोकप्रतिनिधींना असे वाटले की, बरे झाले, या वर्षी आपल्याला काही समस्या नाही. भरपूर अर्थ उपलब्ध आहे. या अर्थाच्या सहाय्याने महाराष्ट्र राज्याचे कल्याण होईल. आपल्या समोर कुठचे प्रश्नच उपस्थित राहाणार नाहीत. अशा प्रकारच्या गुलाबी भाषेत, गुलाब फुलाच्या सहवासात सन्माननीय अर्थ राज्यमंत्री सुटामध्ये येथे येऊन घामाघुम जरी झाले तरी आमच्या राज्याबद्दल त्यांनी अतिशय आत्मविश्वासने सांगितलेले आहे. आम्हालाही बरे वाटले. होते काय की, गेल्या वर्षी अर्थ राज्यमंत्री श्री. दिलीप देशमुख होते. त्याच्या आधी श्रीमती वसुधाताई देशमुख अर्थ राज्यमंत्री होत्या. या वर्षी डॉ. सूनील देशमुख आले. देशमुख कॉन्ग्रेमधून येतात आणि पाटील राष्ट्रवादी कॉन्ग्रेसमधून येतात. देशमुख आणि पाटील अशी ही मांडणी अर्थसंकल्पाची मांडली जाते. आता त्याच्यात त्या दोघांमध्ये एकवाक्यता किती आहे? मला माहीत नाही. मी त्याच्या संदर्भात काही बोलणार नाही. कारण दोघे एकत्र बसून सगळा राज्यकारभार करतात. 2005-2006 या वर्षा करिता योजना आयोगाने अकरा हजार कोटी रुपयाची वार्षिक योजना मंजूर केली आहे. असे अर्थमंत्री म्हणतात. गेल्या वर्षी ही वार्षिक योजना सन 2004-2005 मध्ये 19983.90 कोटी रुपयाची होती. प्रत्यक्षात खर्च किती केला? काल श्री. नितीन गडकरी साहेब याठिकाणी बोलले.तुम्ही योजना जाहीर करतांना ती जवळ जवळ 20 हजार कोटी रुपयाची जाहीर केली. आणि प्रत्यक्षात खर्च करतांना ती दहा हजार कोटी रुपयात गुडाळली. मग हे शब्दाचे बुडबुडे जनतेसमोर कशासाठी टाकायचे? आपल्यात जर कुवत नाही, तर जो बोजा आपण उचलू शकत नाही, तो बोजा आम्ही घेऊ शकतो असे दाखविण्यामागे उद्देश काय? हा माझा त्याच्या पाठिमागचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. जर शासनाने 20 हजार कोटी रुपयाची योजना जाहीर केली होती तर प्रत्यक्षात ती दहा हजार कोटी रुपयावर कां भागविली?त्याला कट कां लावला याचे उत्तर जर महाराष्ट्र शासनातर्फे दिले गेले तर मी त्यांचा आभारी राहीन. शासकीय उपक्रमांची पुनर्रचना करणे. शासकीय उपक्रमांचे सामाजिक महत्व कमी झाले आहे असे शासनाचे म्हणणे आहे. शासकीय उपक्रमांचे सामाजिक महत्व कमी झालेले आहे, म्हणजे जवळ जवळ संपले आहे, म्हणून आणखी एका महामंडळाची स्थापना करण्यात येत आहे. अन्य जी काही महामंडळे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

आहेत त्यापैकी किती बरखास्त करणार? किती महामंडळातील कर्मचा-यांना बसून पगार द्यावा लागतो.? किती ठिकाणचे कर्मचारी काही काम नसतांना पगार घेतात? आणि हा सगळा अनुभव पाठिशी असतांना आणखी एका सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना महामंडळाची स्थापना करण्यात येत आहे अशा प्रकारचा उल्लेख आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणात होता. चलनवाढीचा दर विचारात घेतला तर यावेळी तो 6.60 टक्के इतका आहे, असे आपण म्हणता. गेल्या वेळी तो 5.5 टक्के होता. तो 6.60 टक्क्यापर्यंत वाढण्याचे तुम्हाला अपेक्षित आहे. सभापती महोदया, आता मी बजेटच्या भाषणातील एक-एका मुद्दाकडे वळतो.आरोग्या विषयी बोलायचे झाले तर या महाराष्ट्राची संपूर्ण जनता अनारोग्याने ग्रासलेली आहे. आणि आरोग्य खाते आमच्या महाराष्ट्रात आहे. हजारो कोटी रुपये त्या विभागावर खर्च होतात. पण महाराष्ट्राच्या आरोग्याची आज काय परिस्थिती आहे? टी.व्ही. वर निरनिराळे उपक्रम दाखविण्यात येतात. त्याच्यामध्ये आमच्या महाराष्ट्रामध्ये बालके कशी कुपोषणाने बळी पडतात हेही दाखविण्यात येतात. सांगली सारख्या शहरात आज गॅस्ट्रोची साथ आहे. आळंदी देहू सारख्या ठिकाणी यात्रेकरु आलेले आहेत. त्या ठिकाणी काविळीची साथ आलेली आहे. आरोग्या बद्दल आपण ज्यावेळी गप्पा मरतो त्यावेळी डॉ. अभय बंग यांनी शासनाकडे अहवाल सादर केला आहे. त्यांच्या अहवालाप्रमाणे 8 लाख कुपोषित बालके आहेत. शासनाचा आकडा मात्र 1 लाख आणि 8 हजार इतका आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात कुपोषित बालकेच नाहीत आणि जी एक लाख बालके कुपोषित आहेत त्यांची आम्ही काळजी घेतो अशा प्रकारचे चित्र आपण अर्थसंकल्पामध्ये मांडले आहे. त्याच्याबद्दल मी काय बोलू, याधील सत्य काय ते आपण आम्हाला सांगावे. सगळीकडे "सत्यमेव जयते" असे लिहिलेले असते. डॉ. अभय बंग यांची समिती शासनानेच नेमली होती. त्यांनी दिलेल्या रिपोर्टमध्ये 8 लाख कुपोषित बालके आहेत, असे ते म्हणतात. आणि शासनाचा आकडा मात्र 1 लाख 8 हजाराच्या पुढे जात नाही. मग या दोन्ही आकडयापैकी सत्य आकडा कोणत?डॉ. अभय बंग म्हतात ते सत्य आहे की, तुमचा शासकीय अहवाल आमच्या समोर आला आहे तो सत्य आहे.?

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड ....

श्री. मधुकर सरपोतदार .....

म्हणून आमची मागणी आहे की, तो अहवाल त्वरित या सदनासमोर मांडावा म्हणजे वस्तुस्थिती काय आहे हे कळेल. हा सूर्य आणि हा जयद्रथ असे करता येईल आणि याची जास्त तपासणी करण्याची आवश्यकता भासणार नाही. महाराष्ट्रामध्ये आपण ज्यावेळी आरोग्य खात्याची चर्चा करतो त्यावेळी बोगस डॉक्टर्स, बोगस अप्रमाणित औषधे, डॉक्टर्स व कर्मचारी यांचा तुटवडा, भ्रष्टाचार यांनी पूर्णपणे पोखरलेले हे खाते आहे. या खात्याचे शुध्दिकरण व सबलीकरण करण्याची क्षमता या शासनात आहे काय ? असा माझा प्रश्न आहे. ती क्षमता जर असेल तर आपण सांगावे की, आम्ही सहा महिन्यामध्ये या संपूर्ण खात्यावरील जे तुमचे आरोप आहेत ते सर्व बाजूला करुन या खात्याला आम्ही कार्यक्षम करुन देऊ आणि आम्ही जनतेला बांधील राहू. जनतेच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारी राहणार नाहीत अशा प्रकारची भूमिका आपण त्यावेळी मांडावी. प्रगत राज्य म्हणून आपली स्वत:ची पाठ थोपटून घेणाऱ्या शासनाने कुपोषित बालके, अर्धपोटी आदिवासी, मागासवर्गीय, दारिद्रय रेषेखालील कुटुंबे यांच्यासाठी या अर्थसंकल्पात किती तरतूद केली आहे हे सांगितले तर खूप बरे होईल. त्याबद्दल मी आभारी राहीन. आपण आकडे दिले परंतु जे मागासवर्गीय आहेत, कुपोषित बालके आहेत, जे आजारी आहेत या सगळयांसाठी या अर्थसंकल्पात एकूण किती तरतूद आहे ? माझ्याकडे जी माहिती आहे ती मी जरुर मांडणार आहे. पण या सगळया गोष्टींची माहिती आपण आपल्या उत्तराच्या भाषणात दिली तर फार चांगले होईल. म्हणजे हे शासन साखर सम्राटांसाठी किती निधी देते याची आपल्याला तुलना करता येईल. या ठिकाणी या शासनाचे शिक्षण सम्राट बसलेले आहेत. या ठिकाणी सगळे साखर सम्राट आहेत. या ठिकाणी उद्योग सम्राट आहेत. सगळे सम्राट तुमच्या दोन्ही पक्षात बसलेले आहेत. हे सम्राटांचे पक्ष आहेत असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. अशा सम्राटांच्या या राज्यामध्ये आज गरीब जनता कोठे आहे, आज त्यांच्याकडे कोण लक्ष देतो, त्यांना किती निधी देणार आहे हे पाहणे आवश्यक आहे. सम्राटांना निधी देत असताना हजारो कोटींचा उल्लेख होतो आणि या गरिबांना निधी देत असताना कोठे 1 कोटी 38 लाख रुपये, 2 कोटी 50 लाख रुपये असा उल्लेख होतो. हा फरक का ? आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झालेली आहेत. या 58 वर्षात जे जे राज्यकर्ते होते, ज्यांनी राज्य चालविले त्यांची मूलभूत जबाबदारी होती. घटनेने जनतेला जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार .....

मूलभूत अधिकार दिलेले आहेत त्या अधिकाराप्रमाणे त्यांना सगळया सुविधा उपलब्ध करुन देणे हे शासनाचे काम आहे. शासनाने ते काम कधी केले नाही त्यामुळे प्रत्येक वेळी या ठिकाणी कुपोषित बालकांवर चर्चा होते. या ठिकाणी शिक्षणावर चर्चा होते. या ठिकाणी शिक्षणावर किती खर्च होतो आणि शिक्षणाची परिस्थिती काय आहे ? या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री बसलेले आहेत. दोन दिवसापूर्वी या ठिकाणी चर्चा झाली. आपणच अशी तक्रार केली की, एवढे सगळे शिक्षक आहेत आणि त्यांच्यावर एवढे अनुदान खर्च होते पण इयत्ता पाचवी, सहावी, सातवीमध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांना स्वत:चे नाव लिहिता येत नाही, ते एक दोन ओळी वाचू शकत नाहीत. अशी सर्व शिक्षणाची परिस्थिती आहे. याला जबाबदार कोण ? त्या दिवशी या ठिकाणी आम्ही तुमची भूमिका उचलून धरली होती. एवढया सगळया शिक्षकांना वेतन देता, त्यांच्या सगळया प्रश्नांसाठी आपण झगडता. तसे झगडले पाहिजे. त्याबद्दल मी शिक्षकांचे अभिनंदन करतो. त्यांच्यासाठी त्यांनी जागरुक राहणे हे त्यांचे कामच आहे. ते काम त्यांनी जरुर करावे पण त्याचबरोबर कर्तव्य नावाची काही भावना आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. जे शिक्षण देण्यासाठी आपण पैसे घेतो त्याचा मोबदला म्हणून आपण विद्यार्थ्यांना किती शिक्षण देतो हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांवर आपण कोणते संस्कार करतो हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, यानंतरचा अतिशय महत्वाचा मुद्दा हा अनुशेषाचा आहे. या अनुशेषाबद्दल मी जास्त भाष्य करणार नाही. कारण अगोदर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यावर बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यावर बोलतील. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे अनुशेषाच्या एका विषयावर बोलतील. माझ्या बाजूला सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख बसतात. ते सुध्दा हा विषय मांडणार आहेत. त्यामुळे या विषयाची पुनरावृत्ती करण्याची माझी इच्छा नाही. कारण तुम्ही जी आकडेवारी दिलेली आहे तीच आकडेवारी आम्ही वाचून दाखविणार. अन्याय होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. मी याबाबतीत एवढेच म्हणेन की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाला बगल देऊन अर्थ खाते फक्त पश्चिम महाराष्ट्राची पाठराखण करीत आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र या विभागांना विकासापासून वंचित ठेवण्याचे या आघाडी शासनाचे धोरण आहे. अशा प्रकारची भावना आम्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार .....

लोकप्रतिनिधींच्या मनात, जनतेच्या मनात निर्माण झालेली आहे. ती जर चुकीची असेल तर ते बरोबर नाही असे सिध्द करण्याची जबाबदारी शासनावर आहे. आपण ज्यावेळी उत्तराचे भाषण कराल त्यावेळी तुम्ही हे सिध्द करुन दाखवावे की, तुम्ही जे म्हणता ते बरोबर नाही, उलट आम्ही ज्या ठिकाणी अनुशेषाचा प्रश्न आहे तेथील सगळया जनतेला पूर्ण न्याय दिलेला आहे आणि माननीय राज्यपालांचे जे आदेश आहेत त्याचे आम्ही अनुपालन केले आहे अशा प्रकारची जर भूमिका आपण मांडली तर मी आपल्याला धन्यवाद देईन.

सभापती महोदया, आरोग्य खात्याचा आणखी एक प्रश्न आहे. आपल्याकडे जीवनदायी आरोग्य योजना आहे. आपण ही जीवनदायी आरोग्य योजना संपूर्ण महाराष्ट्रासाठी राबवितो. त्या योजनेसाठी केवळ 7 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

या 7 कोटी रुपयांमध्ये किती लोकांना जीवनदान देणार आहात असा माझा प्रश्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे 25 ते 30 पेक्षा जास्त लोकांना या योजनेतून जीवनदान मिळू शकत नाही. महाराष्ट्रातील या गरीब लोकांचे चित्र भयानक आहे. लोक आजारी पडत आहेत, त्यांना उपचार मिळत नाहीत. ते लोक मुंबईला रुग्णालयामध्ये येतात. मुंबईमध्ये एखाद्यावर जर मोठी शस्त्रक्रिया करावयाची असेल तर किमान 2 लाख रुपये खर्च येतो. परंतु जे खरोखर गरीब व गरजू लोक आहेत त्यांच्यासाठी असलेल्या जीवनदायी योजनेसाठी केवळ 7 कोटी रुपये तरतूद केली आहे. याचे मला आश्चर्य वाटते. शस्त्रक्रियेवर त्याच्यापेक्षाही जास्त खर्च होतो याची आपल्याला कल्पना आहे. तुम्ही या गरीब लोकांची अशी टिंगल टवाळी का करता असा माझा प्रश्न आहे. तुम्ही तरतूद केली नसती तर तुमची इच्छा नाही असे दिसले असते. परंतु इच्छा असताना 7 कोटी इतकी कमी तरतूद करणे कधीही उचित नाही. वास्तविक ही तरतूद 700 कोटी इतकी असावयास पाहिजे होती तरच लोकांना दिलासा मिळेल. निदान 70 कोटी तरी पाहिजे होती, तितकीही तरतूद केलेली नाही याचे मला जरुर दु:ख होते. मा.अर्थराज्यमंत्री महोदय, आपण आपल्या भाषणामध्ये अनेक घोषणा केल्या आहेत. या घोषणांबाबत मी आता बोलतो. आपण पहिली अशी एक घोषणा केली आहे की, "भारतातील पहिल्या महिला डॉक्टर कै.आनंदीबाई गोपाळ जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनांक 26 फेब्रुवारी हा दिवस राज्यामध्ये महिला आरोग्य दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे." यादिवशी 50 हजार रुपयांचे पारितोषिक देणार आहे. शासन महिलांबद्दल आदर दाखवित आहे. देशातील हया पहिल्या महिला डॉक्टर होत्या. देशामध्ये पहिल्यांदा ज्यांनी डॉक्टरेट मिळविली आहे. त्यांचे स्मारक होण्यासाठी मला कल्याणहून काही लोकांची पत्रे आली आहेत. सभागृहामध्ये तुम्ही जाहीर केले आहे, त्यासाठी 50 लाखाचे पारितोषिक जाहीर केले आहे. परंतु त्यांचे स्मारक उभे करण्यासाठी एखादा छोटा भूखंड द्या ना ? त्याठिकाणी हया बाईंचे स्मारक होईल अशी एखादी योजना शासन का आखत नाही ? शासनाला ते अशक्य आहे का ? असे पत्रातून विचारले आहे. मी त्यांना सूचना केली की, कल्याणच्या परिसरामध्ये स्मारकासाठी भूखंड मिळविणे कठीण आहे. जर कोठे भूखंड असल्यास तुम्ही मला सुचवावे. मी त्यासंबंधी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

मा.मुख्यमंत्र्यांना पत्र लिहितो आणि स्मारक होण्याची मागणी करतो. हा भूखंड मिळाल्यास पुढच्या वेळी कै.आनंदीबाई जोशी यांचे स्मारक होण्याची योजना आखता येईल. तेव्हा कै.आनंदीबाई जोशी यांचे स्मारक व्हावे अशी मी विनम्र सूचना करतो.

सर्व शिक्षण मोहिम शासन चालवित आहे. या योजनेचा बोजवारा उडाला आहे. या योजनेचा वापर कसा होतो आणि तिचे फलित काय आहे ? या योजनेसाठी केंद्राकडून किती निधी मिळतो ते स्पष्टपणे सांगितले तर बरे होईल. केंद्र सरकारच्या ज्या योजना येतात त्यांच्यासाठी राज्यशासनाकडून मॅचिंग ग्रँटची तरतूद करुन त्या योजनेची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी करता काय ? कारण केंद्राकडून काय येते याची मला माहिती आहे. मी लोकसभेमध्ये काम केल्यामुळे मला ते माहीत आहे. मी अनेकवेळा महाराष्ट्र शासनाला सांगितलेले आहे की, राज्यशासनाने मॅचिंग ग्रँट न दिल्यामुळे परिणामी तुम्हाला केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळू शकत नाही. जर केंद्र शासनाकडून मदत मिळवावयाची असेल तर मॅचिंग ग्रँटची तरतूद करुन त्यांची मदत मिळवून घेणे ही फार मोठी जबाबदारी आहे. आपण ती पार पाडाल असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदया, नियमित शाळेत जाणारे विद्यार्थी व विद्यार्थींनी अद्याप अक्षरशत्रू राहिल्या आहेत. आज हया वस्ती शाळांची परिस्थिती काय आहे ? शासन वस्ती शाळा चालवित आहे याबद्दल समाधान आहे. परंतु प्रत्यक्षात या शाळांचे रिझल्ट्स काय आहेत ? या शाळांमध्ये जी मुले येतात त्यांच्यावर काही संस्कार होत होतात का ? त्याठिकाणी काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांना जो मोबदला दिला जातो त्याच्यातून आपल्याला काही रिटर्नस मिळतात का ? हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

सभापती महोदया, यानंतर मी शालेय पोषण आहार योजनेबद्दल बोलू इच्छितो. शालेय पोषण आहार योजना हा महाराष्ट्रातील एक खूप मोठा विनोद आहे. या योजनेखाली विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न दिले जाते. परंतु या योजनेचे गांभीर्य कोणी समजून घेत नाही. भ्रष्टाचारामुळे लोक सेवाधर्म विसरुन गेले आहेत. या राज्यामध्ये केवळ भ्रष्टाचाराचे उदंड पीक येत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.

याठिकाणी शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. या पोषण आहार योजनेची महाराष्ट्राची स्थिती काय आहे याची आपल्याला जास्त कल्पना आहे. या मुलांना खिचडीच्या माध्यमातून कशाप्रकारे अन्न दिले जाते, कशी खिचडी शिजविली जाते आणि तिचे वाटप कसे केले जाते याची आपल्याला कल्पना आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : मा.सदस्यांना आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री.मधुकर सरपोतदार : आपण मला एक तास वेळ दिलात तर मी एक तासात माझे भाषण संपवीन, आपण मला 45 मिनिटांचा वेळ दिला तर मी 45 मिनिटांमध्ये माझे भाषण संपवीन.

तालिका सभापती : मा.सदस्यांनी पाच मिनिटांत आपले भाषण संपवावे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : या शासनाने महिला आर्थिक विकास मंडळ काढले. तालिका सभापती महोदया, आपण सत्ताधारी पक्षातील आहात म्हणून मी आपणास विचारु इच्छितो की, आपल्या पक्षाने किती महिलांना निवडणुकीत तिकिटे दिली आणि किती महिलांना निवडून आणले ? राज्यातील नाशिक, नंदूरबार, ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यातील महिलांसाठी स्वयंअर्थसहाय्यता गट स्थापन कराण्यासाठी 1 कोटी 38 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. किती महिलांचा बचट गट निर्माण करणार आहात ? त्यासाठी केवळ 1 कोटी 38 लाख रु. तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद फार कमी आहे.

आदिवासी मुलींची शाळेतील गळती रोखण्यासाठी 30 कोटी रु. ची तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये 4 लाख शिक्षण घेणा-या आदिवासी मुली आहेत. हिशेब केला तर प्रत्येक मुलीसाठी वर्षाला 750 रु. येतात. या 4 लाख मुली घरी रहातात, त्या शाळेत जात नाहीत, त्यांच्यासाठी प्रोत्साहन योजनेअंतर्गत वर्षाला केवळ 750 रु. दिले जातात. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारच्या योजना कशासाठी केल्या जातात ? गरीब आदिवासी जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी या योजना केल्या जातात काय ? आता प्रोत्साहनपर वर्षाला 750 रु. देणार असाल तर मुली शाळेत गेल्या नाहीत तरी बरे असे त्यांचा पालकांना साहजिकच वाटेल. त्या मुलींना महिना 50 रु. देखील मिळत नाहीत.

तालिका सभापती महोदया, राज्य शासनाने लहान मुलांमधील कुपोषण व बालमृत्यू या तीव्र समस्यांवर उपाय करण्यासाठी राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन औरंगाबाद येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. कुपोषण आणि बालमृत्यू ह्या समस्या आदिवासी जिल्ह्यामध्ये आहेत. औरंगाबाद हा आदिवासी जिल्हा नाही. तरी देखील या मिशनचे कार्यालय औरंगाबाद येथे ठेवलेले आहे. बालमृत्यू आणि कुपोषण यावर उपाय करण्यासाठी आपण राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन केलेत. परंतु यासाठी आपण किती आर्थिक तरतूद करणार आहात हा माझा प्रश्न आहे ? हे शासन नुसत्या घोषणा करीत आहे. नुसत्या घोषणा करुन चालणार नाही. या योजनेसाठी भरीव अशी आर्थिक तरतूर करावी अशी माझी या निमित्ताने शासनाला सूचना आहे. या सरकारची कार्यक्षमता आणि आर्थिक क्षमता वाढलेली आहे त्यामुळे अनेक निर्णय हे सरकार घेऊ शकते. म्हणून महिला तसेच बालकांच्या संदर्भात या सरकारने जास्तीत जास्त आर्थिक तरतूद करायला पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या अर्थसंकल्पाचे समर्थन केलेले आहे. त्याबद्दल मी त्यांना दोष देत नाही. पण पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात नांदेडमधील परिस्थिती मी प्रत्यक्ष पाहिली आहे. केवळ नांदेडच नाही तर अनेक ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, पिण्याच्या पाण्यासाठी लहान मुले आणि महिलांना दोन-दोन कि.मी. अंतरावर पायपीट करावी लागते. मग तेथील महिला असे सांगतात की, पिण्याच्या पाण्यासाठीच दिवसाचा बराचसा वेळ घालवावा लागतो, त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामावर जाता येत नाही आणि परिणामी रोजंदारीही मिळत नाही. मग कुटुंबाचे पालनपोषण कसे करणार ? असे प्रश्न त्या महिला जेव्हा लोकप्रतिनिधींपुढे मांडतात त्यावेळी अत्यंत कीव येते. मग हे शासन कशासाठी घोषण करते ? आज ज्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे तेथे टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे सांगितले जाते. परंतु मी ठामपणे हे सांगू इच्छितो की, पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे सत्ताधा-यांनी रॅकेट तयार केलेले आहे. एक टँकर अर्धा-अर्धा करुन दोन ठिकाणी वाटला जातो आणि दोन ठिकाणी दोन टँकर दाखवून त्याची बिले घेतली जातात. ख-या अर्थाने पिण्याच्या पाण्यासाठी जे लोक वंचित आहेत त्यांना मदत करण्यासाठी कोणी पुढे येत नाही. परंतु आपले खिसे कसे भरले जातील हे मात्र पाहिले जाते. काही ठिकाणी टँकरची हजेरी घेतली जाते. म्हणजे ज्या ठिकाणी टँकर गेला असेल तेथे ती हजेरी दाखवून शासनाकडून पैसे घेतले जातात. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की, टँकर गावामध्ये जात नाही, मात्र हजेरी लावली जाते आणि पैसे घेतले जातात. तेव्हा हा अवैध जाणारा पैसा शासनामध्ये क्षमता असेल तर निश्चितपणे थांबविता येईल आणि राज्यातील जनतेला चांगल्या प्रकारे पाणी मिळू शकेल असा मला विश्वास वाटतो. या अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये एक मजेशीर शब्द आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलेखनाची नाही

श्री.मधुकर सरपोतदार..

"हांगणदारी" असा शब्द वापरण्यात आलेला आहे. हा शब्द मलाच माहिती नाही. आपल्याला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाली. आम्ही आमच्या ग्रामीण भागातील गावात छोटी छोटी शौचालये बांधू शकत नाही एवढी शोकांतिका आपली आहे. आपण या सभागृहात कोटयावधी रुपयांच्या गप्पा मारतो. मुंबई शहरातील भूखंड बिल्डर्स लोकांना विकून कोटयावधी रुपये लाटले जात आहेत. शासन आणि बिल्डर्स यांची हात मिळवणी झालेली आहे. मुंबई शहराची वाट लावण्याचे काम सद्या चाललेले आहे. मुंबई शहरात शाळेसाठी आरक्षित असलेले भूखंड, बगीच्यासाठी आरक्षित असलेले भूखंड, खेळासाठी आरक्षित असलेले भूखंड आहेत. परंतु या आरक्षित असलेल्या भूखंडावरील आरक्षण उठवून ते भूखंड बिल्डर्स लोकांना विकले जात आहेत. त्या भूखंडावर गगनचुंबी, टोलेजंग इमारती उभ्या होत आहे. शासनाने एखाद्या बिल्डरला हाताशी धरले तर 40 हजार गावात शौचालये बांधून होतील. एका खेडयांमध्ये किती शौचालयांची गरज आहे ? किती शौचालये बांधली पाहिजे ? यासंबंधीचा सगळा हिशोब काढला पाहिजे. एकदा महाराष्ट्रातील सर्व खेडे गावात शौचालये बांधावयाची अशी शासनाचे मनाशी इच्छा धरली तर तर ती गोष्ट शासनास मुळीच अशक्य नाही. शासनाची तशी इच्छा नाही म्हणून खेडया गावांमध्ये शौचालये बांधली गेलेली नाहीत. शौचालये बांधण्यासाठी आपण लाभार्थ्यास 500 रुपये देण्याचे ठरविले आहे. माझा राज्यकर्त्यांना प्रश्न आहे की, 500 रुपयात शौचालये बांधावयाची म्हणजे त्या लाभार्थ्याने नक्की काय काम करावयाचे ? शौचालये उभारली जातील परंतु तेथे जो मैला तयार होईल त्याचा निचरा करण्यासाठी शासनाने काय व्यवस्था केलेली आहे ? शौचालये बांधण्यापूर्वी जी प्राथमिक तयारी करावयास पाहिजे तशी तयारी केलेली नाही. शासनाने निर्मल ग्राम पुरस्कार योजना जाहीर केलेली आहे. खेडयांमध्ये रस्ते तयार नाहीत, रस्ते साफ नाहीत, रस्ते हे मुख्य रस्त्याला जोडले गेलेले नाहीत, त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी ग्राम पुरस्कार आपण द्यावयास निघाला आहात. आधी ग्राम निर्मल करा, मग पुरस्कार द्या. सभापती महोदया, वीज निर्मितीचा एक महत्वाचा प्रश्न आहे. गॅसवर आधारित उरण विस्तारित प्रकल्प,तळेगांव विद्युत प्रकल्प व कोळशावर आधारित खापरखेडा विस्तारीकरण प्रकल्प उभारण्याचे शासनाने प्रस्तावित केलेले आहे. परंतु हे प्रकल्प सुरु होऊन त्या प्रकल्पापासून कधी वीज निर्मिती होईल ? राज्यातील अंधारातील लोक प्रकाशात कधी येतील याचा आम्ही शोध घेत आहोत. सिंगल फेज योजना कार्यान्वीत करण्यासाठी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

किती खर्च अपेक्षित आहे? ही योजना संपूर्णपणे कार्यान्वीत करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ? आपण यासाठी फक्त 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सिंगल फेज योजना एक मोठे ढोंग आहे अशी आमची कल्पना आहे. सिंगल फेज योजना आणून लोकांना वीज वापरण्यावर तुम्ही बंधन आणत आहात. याचा अर्थ ठराविक क्षमतेच्या पलिकडे आपण वीज वापरु शकत नाही. याचा मोठा परिणाम हा खेडे गावांमध्ये होणार आहे. राज्यातील खेडी ही अंधारात जातील. अक्षय योजना यापेक्षा जास्त चांगली आहे. ती योजना परिणामकारक राबविली तर निश्चितच त्याचा फायदा होऊ शकेल. "मोफत वीज योजना " अशी घोषणा शासनाने केली. मोफत वीज द्या म्हणून तुम्हाला कोणी सांगितले होते ? माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूकीच्या तीन महिन्यापूर्वी फक्त एक घोषण संभाजीनगर येथे केली. त्यांनी नुसता एक गुगली बॉल टाकल्याबरोबर सर्व राज्यकर्ते नाचावयास लागले. माननीय मुख्यमंत्र्यांना वाटले की, धरणीकंप झाला की काय ? मोफत वीज देतो अशी त्यांनी घोषणा केली तर आपली सत्ता येणार नाही असे वाटू लागल्यामुळे अतिशय घाईगर्दीने कोणत्याही परिणामाची पर्वा न करता शेतक-यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला. शासनाने घेतलेल्या निर्णयापासून परत मागे जाता येणार नाही. शेतक-यांना मोफत वीज देऊ असे शासनाने जाहीर केले.त्याप्रमाणे शेतक-यांना मोफत दिली पाहिजे. यासंदर्भात जे काही परिणाम होतील त्याची पूर्णपणे जबाबदारी ही शासनाने घेतली पाहिजे. निर्णय घेण्यापूर्वी परिणामाचा विचार करावयाचा असतो. निर्णय घेतल्यानंतर परिणामांचा विचार करुन काही उपयोग होणार नाही. वीज अनुदानासाठी या अर्थसंकल्पात फक्त 750 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या तरतुदीमध्ये किती शेतक-यांना वीज मोफत देणार आहात यासंबंधीची आकडेवारी सभागृहात दिली तर फार चांगले होईल असे मला वाटते. या वीज कंपनीचे होल्डींगमध्ये रुपांतर करण्याचा आणखी एक डाव शासनाने टाकला आहे. या वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्याचा शासनाचा विचार आहे. आज वीज कंपन्या शासनाच्या मालकीच्या आहेत. हा सार्वजनिक उपक्रम खाजगी उपक्रम होणार आहे. शासकीय कंपनी असल्यामुळे भ्रष्टाचार प्रचंड वाढतो. खाजगीकरणामुळे भ्रष्टाचार कमी होईल परंतु उद्योजकांचा मोठया प्रमाणात फायदा होईल. या संपूर्ण गोष्टीचा त्रास ग्राहकांना होईल अशी माझ्या मनात भीती आहे. सभापती महोदय, शासकीय दूध योजनेच्या संदर्भात मी बोलणार आहे. शासकीय दूध योजना अतिशय महत्वाची---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

आहे.शासकीय दूध योजनेचा विचार केला तर महानंदा डेअरीला तुम्ही संपूर्ण कारभार देणार आहात. महानंदा डेअरीतील अधिकारी श्री. तळेकर हे संपूर्ण देशात गाजता आहेत. श्री. तळेकर यांनी 5 हजार कोटी रुपयांची संपत्ती गोळा केली आहे, बंगले, फ्लॅट, इतर काही प्रॉपर्टी गोळा केलेली आहे त्याबाबतची सर्व माहिती बाहेर येत आहे.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

महानंदामध्ये सर्वेसर्वा श्री. शिवाजी तळेकर होते ते आज जेलची हवा खात आहेत आणि त्यांना साथ देणारे लोक मात्र मंत्रालयात बसलेले आहेत. महानंदामध्ये श्री. तळेकर यांनी पूर्ण सहकारीकरण केले आणि एवढी मोठी मालमत्ता जमा केली...

मेजर श्री. सुधीर सावंत : मा.सदस्य श्री. सरपोतदार आपली परवानगी असेल तर मी बोलू इच्छितो ...

श्री. मधुकर सरपोतदार : आपण हरकतीच्या मुद्यावर बोलणार असाल तर मी खाली बसतो.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सदस्यांना वेगळे नियम लावले जात आहेत काय ? यापूर्वी मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी बोलत होते त्यावेळी त्यांना अडथळे निर्माण केले जात होते. तसेच हरकतीचे मुद्दे उपस्थित केले जात होते. आता मा.सदस्य श्री. सावंत यांनी बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यांना बोलू दिले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये अशी पध्दत आहे की, कोणत्याही सदस्यास बोलावयाचे झाले तर प्रथमत: त्याला सभापतींची परवानगी घ्यावी लागते. त्यांनी परवानगी दिली तरच बोलता येते. मा.सदस्य श्री. सावंत यांनी आपली परवानगी न घेतल्यामुळे त्यांना खाली बसावे लागले. आता अर्थ राज्यमंत्री बोलत होते. त्यांची मला कीव येते. त्यांना सभागृहाचे नियम माहीत नाहीत काय ? मंत्रीमहोदयांनी या सभागृहाची प्रथा,परंपरा,पध्दती यांचा नीट अभ्यास करावा.

मेजर श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रथा,परंपरा याबाबत मुद्दा मांडला. सदस्य भाषण करीत होते म्हणून मी त्यांना बोलू काय असे विचारले.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभापतींच्या परवानगी शिवाय कोणत्याही सदस्यास बोलता येणार नाही. मी आपणांस परवानगी दिली म्हणून आपण बोलला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड ..

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदया यानंतर मला एकाधिकार कापूस खरेदी योजनेसंबंधी बोलावयाचे आहे.जाहीर नाम्यात रु.2700 प्रति क्विंटल इतका कापसाला देऊ हे जाहीर करतांना कोणते निकष लावले होते.? युती शासनाच्या काळात रु.2500 प्रति क्विंटल भाव मिळावा म्हणून आपणच आंदोलन छेडले होते ना? हे आपल्याला आता आठवते काय ? कदाचित आपण आता ते विसरुन गेला असाल. या योजनेमुळे शासकीय तिजोरीवर भार पडतो याची राज्यकर्त्यांना केव्हा जाणीव झाली ? धरसोडीच्या व बेभरवशाच्या घोषणांमुळे 550 शेतक-यांनी आत्महत्या केल्या व आता सत्ता मिळाल्यावर आपल्याला शहाणपण सुचले काय ? कापसाचे पीक न घेता सोयाबीनचे पीक घ्यावे असे माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सुचवले आहे.हजारो शेतकरी कापूस पिकवणारे असून शासनाच्या भरवशावर त्यांनी कापूस पिकवला आहे असे असतांना आज त्यांच्यावर आत्महत्या करण्याचा प्रसंग येतो . It's not a good governance एवढेच मला त्या निमित्ताने म्हणावयाचे आहे.त्याबाबतीत शासनाने अधिक जागरुक राहण्याची आवश्यकता आहे.पाया भूत सोयी, गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा, आर्थिक विकास व कार्यतत्पर सेवा इत्यादीसबंधी अर्थसंकल्पात उल्लेख केला आहे तसेच वान्द्रे वरळी जलसेतू बांधण्यात येणार आहे मला असे विचारावयाचे आहे की ,हा जलसेतू केव्हा तयार होणार आहे ? 462 कि.मी.रस्ते, 41उड्डाणपुल, 66 भुयारी मार्ग,300 किलोमिटर्स लांबीचे फुटपाथ बांधले जाणार आहेत.फुटपाथच्या बाबतीत मला एवढेच म्हणावयाचे आहे की मुंबईतील फुटपाथ जे अस्तित्वात आहेत ते प्रथम मोकळे करण्यात यावे लोकांना मोकळा श्वास घेऊन या फुटपाथवरुन चालण्याची संधी मिळू द्यावी व त्या ठिकाणी राहणा-या लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे..सगळे फुटपाथ मोकळे केल्यानंतर व मुंबई स्वच्छ केल्यानंतर 300 किलोमिटर्स लांबीचे फुटपाथ बांधण्याच्या गप्पा शासनाने कराव्यात. तोपर्यन्त या बाबतीत शासनाने बोलता कामा नये. मुंबई साठी 1000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु या एक हजार रुपयामध्ये काय काय करता येईल हे मला माहीत नाही. परंतु एक हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मी त्याचे स्वागत करतो.आज एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे भविष्य काळात आणखी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे. वर्सोवा - अंधेरी घाटकोपर लाईट रेल्वे प्रकल्पासाठी 1500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु हे पैसे केव्हा मिळणार

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ...

आहेत? हा मोठा प्रश्न आहे. मुंबई मेट्रो प्रकल्प, शिवडी - न्हावा जलसेतू प्रकप, पश्चिम द्रूतगती मार्ग केन्द्र शासनाच्या मदतीने उभारले जातील अशी घोषणा करण्यात आलेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत या दृष्टीकोकनातून या घोषणा करण्यातयेत आहेत काय ? की खरोखर शासनाला जनतेबद्द ल प्रेम वाटते म्हणून या घोषणा करण्यात येत आहेत ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिले तर बरे होईल..डॉ.कोटणीस, स्व. गोविंदभाई श्रॉफ नटसम्राट बालगंधव यांची स्मारके उभारण्यात येतील असा अर्थसंकल्पाच्या भाषणात उल्लेख करण्यात आला आहे.परंतु त्यासाठी काय तरतूद केली आहे ? जागेची काही व्यवस्था केलेली आहे काय ? जर ती केलेली असेल तर या तिन्ही स्मारका च्या बाबतीत किती तरतूद करण्यात आली आहे याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयानी खुलासा करावा. सभापती महोदया, यानंतर मी पोलीस दलाच्या बाबतीत एक मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. पोलीस दल सक्षम करण्यासाठी 184 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पोलीस दलासाठी जेवढया सोयी करता येतील तेवढया जरुर कराव्यात परंतु त्याचवेळी पोलीस दलावर शासनाचा एक प्रकारे वचक असण्याची आवश्यकता आहे परंतु आज हा वचक असल्याचे दिसत नाही. एका बाजूला गुंड लोकांकडून खंडण्या वसूल करीत आहेत दुस-या बाजूला पोलीस सुध्दा या गुंडाच्या नावाख्ंाली लोकांकडून खंडण्या वसूल करीत आहेत.या संदर्भात मुंबई शहरात काय चालले आहे ते तपासून पहा. ही तपासणी केलयानंतर खंडण्या वसूल करण्यासाठी पोलीस काय काय करीत आहोत हे आपल्याला दिसून येईल. पोलिसांसाठी गृह निर्माण योजना शासन राबवत आहे. ही चांगली गोषट आहे परंतु आज अनेक पोलिसांना राहण्यासाठी घरे नाहीत तेव्हा त्यांना राहण्यासाठी चांगली घरे द्यावीत , ही घरे त्यांच्या डयूटीच्या भागाच्या जवळ द्यावीत.त्यांची चांगली सोय करण्यात यावी .त्याचबरोबर त्यांच्या वाहनाची सुध्दा सोय करण्यात यावी.त्यांच्या मुलांना शाळेमध्ये प्रवेश मिळत नाही अशी आज परिस्थिती आहे.तेव्हा पोलिसांकडे अधिक लक्ष देण्याची शासनाची जबाबदारी आहे. भ्रष्टाचाराने आंकठ बुडालेल्या पोलीस दलात सुधारणा व नैतिक बळ कसे निर्माण करणार ? बॉम्ब स्फोटातील आरोपी डॉ.मतीनच्या जबानीमुळे चार पोलीस अधिका-यांच्या विरुध्द गुन्हा नोंदवून त्यांना पोलीस कस्टडीची हवा खायला

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार...

पाठविणा-या सी.आय.डी.अधिका-यांना कोणते पदक देऊन गौरवणार आहात ? जोपर्यन्त दाऊदचे मित्र सर्वत्र मुक्त संचार करीत आहेत तोपर्यन्त सर्वत्र असेच स्फोट होणार आहेत. हे मला अतिशय विनम्रपणे येथे सांगावयाचे आहे.सभापती महोदया, एका गोष्टीचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपविणार आहे.मूल्य वर्धित कर लागू करण्यात येणार आहे ही चांगली गोष्ट आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.हा कर लावणे आवश्यक आहे परंतु तो लावत आसतांना व्यापा-यांच्या ज्या काही तक्रारी आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे.या कराच्या संदर्भात प्रथम वर्ष तोटयाच्या 100 टक्के परतावा मिळणार आहे. दुस-या वर्षी तोटयाच्या 75 टक्के परातावा मिळणार आहे तिस-या वर्षी 50 टक्के परतावा मिळणार आहे त्यामुळे महाराष्ट्र शासनाचे काहीही नुकसान होणार नाही.फकत तीन वर्षात शासन यंत्रणा सक्षम करण्याच्या संदर्भात यश आले पाहिजे.आपण या घोडयावर बसलेला आहात परंतु आपली मांड किती मजबूत आहे त्याप्रमाणे घोडा धावणार आहे. मध्यंतरी डॉ. गावित यांच्या संदर्भात श्री.अण्णा हजारे यांनी रिमार्क्स पास केले होते.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

घोड्यावर तुमची मांड मजबूत नसल्यामुळे तो उधळला आणि त्यामुळेच तुमच्यावर सावंत आयोगाकडून आणि वेळोवेळी कोर्टाकडून देखील स्ट्रीक्चर्स पास झाली. सावंत आयोगातील शेऱ्यांबद्दल मी आता काही बोलत नाही. सावंत आयोगाच्या अहवालावर जेव्हा या सभागृहात चर्चा होईल त्यावेळी मी त्यासंबंधात बोलणारच आहे. परंतु आपण आपल्या अधिकाऱ्यांवर चांगला कंट्रोल ठेवा. हे अधिकारी तुम्हाला नेहमीच मिसगाईड करीत असतात हे आपण लक्षात घ्या इतकेच मला आपल्याला सांगावयाचे आहे. त्याचप्रमाणे पेट्रोल, डिझेलवर हा मूल्यवर्धित कर आपण का लावत नाही ? या विषयावर आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवानी बोलणार असल्याने मी त्यावर देखील जास्त बोलत नाही. मात्र मूल्यवर्धित करामध्ये पेट्रोल-डिझेलचाही आपण समावेश करावा अशी माझी आपणास या निमित्ताने सूचना आहे. आपणास यातून जो काही तोटा होईल त्याची भरपाई केंद्र सरकार आपल्याला करून देणार आहे. तेव्हा ज्या व्यापाऱ्यांचा या कर पध्दतीला विरोध आहे त्यांच्या प्रातिनिधिक संघटनांशी आपण संपर्क साधून त्यांना भविष्याचा वेध घेण्यास प्रवृत्त आपण करावे. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता घेतल्यानंतरच व्हॅटची अमलबजावणी राज्यामध्ये करण्यात येत आहे त्यामुळे या कराची व्यवस्थितरित्या अमलबजावणी करा आणि जे या बाबतीत नाराज आहेत त्यांच्याशी संपर्क साधून, त्यांना विश्वासात घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना जास्त परिणामकारकरित्या अमलात आणा अशी मी आपल्याला विनंती करतो आणि अध्यक्ष महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

****

.... एनएन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी राज्याच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पावर बोलत असताना या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी या ठिकाणी युती सरकारने जे कर्ज काढले होते त्यावर आपले विचार मांडले आहेत. मी येथे युती सरकारचे समर्थन करणार नाही. परंतु सहा वर्षापूर्वी माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी या राज्याचा अर्थसंकल्प सादर केला आणि त्यावेळेस त्यांनी श्वेतपत्रिका देखील दिली होती व तिच्या माध्यमातून या राज्यावर यापुढे एकही रुपयाचे कर्ज वाढणार नाही आणि असलेले कर्ज देखील आम्ही कमी करू असे आश्वासन दिले होते. परंतु खेदाने मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, राज्यावरील हे कर्ज कमी न होता उलट वाढलेले आहे. गेल्या सहा वर्षामध्ये हे कर्ज 10 पटीने वाढलेले आहे. श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून जाहीर केले होते तेव्हा मोठा गाजावाजा करण्यात आला होता. टप्प्याटप्प्याने अभ्यासपूर्ण भाषण करून आणि अभ्यासपूर्ण अशी श्वेतपत्रिका माननीय अर्थमंत्र्यांनी त्यावेळी जाहीर केली होती. परंतु दुर्दैवाने एकाही रुपयाने कर्जफेड झालेली नाही किंबहुना राज्यावरील कर्जामध्ये वाढ झालेली आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख हे माझे चांगले मित्र आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, जागतिक बँकेकडून पैसे आणा. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय अर्थमंत्री मध्यंतरी अमेरिकेमध्ये गेले होते आणि त्यांनी त्या ठिकाणी जागतिक बँकेकडून कर्ज आणण्याचा, पैसे आणण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने जागतिक बँकेने आपल्या राज्याला कर्ज नाकारलेले आहे. जागतिक बँकेने सांगितले की, या राज्याला आम्ही आता कर्ज देऊ शकत नाही. त्यासाठी केंद्र सरकारने हमी दिलेली होती किंवा काय याची मला माहिती नाही पण मला वाटते माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांचेसह एक शिष्टमंडळ सरकारने अमेरिकेमध्ये पाठवावे आणि जे माननीय अर्थमंत्र्यांना जमले नाही ते काम त्यांचेवर सोपविल्यास सन्माननीय गुरूनाथजी कुळकर्णी जागतिक बँकेकडून 4 टक्के दराने या राज्याला कर्ज आणून देतील आणि त्यातून आपले राज्य सुजलाम सुफलाम निश्चितपणे होऊ शकेल असे मला वाटते. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जागतिक बँकेचे जे नियम आहेत... मला वाटते माननीय अर्थमंत्री अभ्यासू आहेत आणि त्यांनी अमेरिकेमध्ये शिक्षण घेतलेले आहे. मी स्वत: त्यांचेबरोबर चर्चा केली आहे तेव्हा त्यांनीच

....एनएन 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

मला सांगितले आहे की, जागतिक बँक आता आपल्याला पैसे देऊ शकत नाही. अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये चर्चा होत असते तेव्हा त्या चर्चेकडे राज्यातील जनतेचेही लक्ष असते. जनता ही चर्चा ऐकत असते की, आपल्या हितासाठीच येथे चर्चा चालली आहे. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, येथे सांगितली गेलेली आकडेवारी चुकीची आहे. त्यावेळच्या परिस्थितीमध्ये काढलेले कर्ज आणि त्यावरील व्याजदर आणि आताचे व्याजदर यामध्ये मोठा फरक निश्चित आहे. ....

(यानंतर श्री.जागडे ....ओओ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

त्यावेळी व्याजाचा दर 20 टक्के होता. तो आता कमी कमी झाला आहे. टप्प्याटप्प्याने व्याजाचा दर कमी झाला आहे. तशी नोंद आर्थिक जगामध्ये झाली आहे. मी या ठिकाणी निश्चितपणाने सांगेन की, या राज्याला देखील कमी व्याजाने कर्ज मिळाले पाहिजे. अल्प दराने कर्ज मिळण्याची सोय आपल्या देशातच आहे. म्हणून जास्त व्याजाचे कर्ज कमी करण्यासाठी अल्प दराने कर्ज घेण्याची आवश्यकता आहे. तसा प्रयत्न शासनाने करण्याची गरज आहे. या देशातील बँका तसेच पतपुरवठा करणा-या संस्था आज कमी व्याजाने कर्ज देत आहेत, त्यांच्याकडून कमी व्याजाने कर्ज घेऊन जास्त व्याजाचा बोजा हे शासन कमी करु शकते. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने तसा प्रयत्न केला आहे. त्यांनी 14 टक्क्याने कर्ज घेतले होते. ते आता साडेसात आणि नऊ टक्क्यावर आले आहेत. अशा प्रकारचे धोरण शासनाने राबविले पाहिजे.

सभापती महोदय एक एप्रिलपासून मुल्यवर्धीत करप्रणाली सुरु होणार आहे. मच्छिमार संस्थांच्या बोटीना सवलतीच्या दराने डिझेल मिळणार आहे काय ? तसेच सेल्स टॅक्स माफ होणार आहे काय ? हे पाहण्याचा प्रयत्न मी अर्थसंकल्पात केला असता मला कोठेही तशी नोंद झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मच्छिमार संस्थांच्या बोटीना सवलतीच्या दराने आता डिझेल मिळणार आहे काय ? असा माझा या ठिकाणी वित्तमंत्र्यांना सवाल आहे. यापूर्वी ज्यावेळी आपण वॅट सुरु करणार होतो त्यावेळी त्यावेळचे अर्थमंत्री आणि आताचे अर्थमंत्री यांनी असे सांगितले होते की, ज्यावेळी मुल्यवर्धीत करप्रणाली सुरु होईल, तेव्हा ही सवलत जाणार आहे. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, मच्छिमारांना ही जी सवलत दिली आहे, ती राहिली पाहिजे. त्यांच्या बोटीना सवलतीच्या दराने डिझेल मिळाले पाहिजे. त्यांचा सेल्स टॅक्स माफ झाला पाहिजे. तसेच आज आपण त्यांना डिझेलचा जो कोटा दिला आहे, त्यामध्ये देखील वाढ केली पाहिजे.

सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात पूरवणी मागण्यांना उत्तर देत असताना या राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी या सभागृहात जाहीर केले की, राज्यातील विना अनुदान तत्वावरील शाळा ह्या टप्प्याटप्प्याने अनुदानावर येतील. त्यासाठी लागणारी तरतूद येणा-या अर्थसंकल्पात केली जाईल. त्यावेळी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन असे विचारले होते की, शासनाचे हे धोरण कायम राहणार आहे काय ? त्यावेळी मा. उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नेहमीच्याच पध्दतीमध्ये शासनाचे हे धोरण कायम राहील असे सांगितले होते. त्यांनी पुढे असेही सांगितले होते की, येत्या पाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

वर्षात एकही शाळा अनुदानावर राहणार नाही. परंतु त्या बाबतची कोणतीही नोंद या अर्थसंकल्पात मला दिसून आली नाही. विना अनुदानावरील शाळा अनुदानावर येण्यासाठी शासनाने या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही. सभापती महोदय, विना अनुदान तत्वावर ज्या ज्या भागात शाळा देण्यात आलेल्या आहेत, त्या भागात अनुदानावरील शाळा देखील आहेत. आता त्या भागात विना अनुदान तत्वावर शाळा देण्यात आली नसती तर अनुदानीत शाळेतच विद्यार्थी गेले असते. नंतर त्या शाळेला वाढीव तुकडीला मान्यताही मिळाली असती. विना अनुदान तत्वावरील शाळा त्या भागात दिल्यामुळे शिक्षकांची संख्याही कमी झाली आहे. तसेच याचा आर्थिक बोजा या शासनावर पडणार आहे. सभापती महोदय, आता कंत्राटी पध्दतीने शिक्षक आणि ग्रामसेवक नेमण्यात येतात. तसेच या ठिकाणी करण्यात आले पाहिजे. विना अनुदान तत्वावरील शाळा अनुदानावर आणण्याचे आश्वासन त्यावेळी या राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री यांनी दिले होते.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेवरील उप प्रश्नांना उत्तर देतांना आश्वासन दिले होते ते सुध्दा या अर्थसंकल्पामध्ये पाळलेले दिसत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या सभागृहात कोकणाची उत्तम रितीने ठोस बाजू मांडली. मुंबईजवळील घारापूरी बेटावर अनेक परदेशी पर्यटक जातात. जवळ जवळ दिवसाला तीन हजार परदेशी पर्यटक गेट वे ऑफ इंडिया येथून घारापूरीपर्यंत लाँचने जातात. त्या घारापूरी बेटावर दिवाबत्तीची सोय नाही अशी पाच वर्षे सातत्याने मागणी करीत आहे. त्या ठिकाणी लाईटची व्यवस्था होण्यासाठी समुद्राखालून केबल टाकण्यासाठी 3 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे अनेक पर्यटन क्षेत्रांचा विकास करीत आहे. परंतु घारापूरी येथील लेणी बघण्यासाठी मुंबईहून पर्यटक येतात त्यांच्यासाठी आपण लाईटची सोय कां करीत नाही असा माझा प्रश्न आहे? मध्यंतरी जे.एन.पी.टी. कडून समुद्र मार्गे पोल टाकण्याचे काम सुरु करण्यात आले. परंतु पुराण वस्तू संशोधन खात्याने पोल टाकायला बंदी घातली. तेव्हा 3 कोटी रुपयांची तरतूद करुन त्याठिकाणी केबलिंग करण्याची आवश्यकता आहे.

माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितलेली बाब बरोबर आहे. कोकणासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करुन सुध्दा ती रक्कम खर्च होत नाही. अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते परंतु केलेली तरतूद केव्हाही संपणार नाही याची सुध्दा काळजी घेतली जाते. तेव्हा कोकणातील सर्व किल्ल्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. आज मुरुड-जंजिरा, अलिबागचा किल्ला, खांदेरी-उंदेरी या किल्ल्यांची काय परिस्थिती आहे? त्याठिक्राणी गेलेल्या पर्यटकांना चांगली सेवा मिळत नाही. स्थानिक जनतेने त्यामध्ये पुढाकार घेतला तर पुराण वस्तू संशोधन विभाग आडवे येते. त्यामुळे ईकडचा दगड तिकडे सुध्दा ठेवायला परवानगी नाही अशी परिस्थिती आहे. आणि म्हणून शासकीय पातळीवर पुराण वस्तू संशोधन विभागाच्या सहकार्याने कोकणातील सर्व किल्ल्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे काम या अर्थसंकल्पामध्ये झाले पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, जिल्हा परिषदांना पाटबंधारे खात्याकडून पाणी पट्टीच्या सेसची रक्कम मिळत नाही. जलसंपदा विभागाकडून रायगड जिल्हा परिषदेला 30 कोटी रुपयांचा सेस अजून मिळालेला नाही. जल संपदा खाते आपले पाणी एम.आय.डी.सी. ला विकते, आणि एम.आय.डी.सी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

ते पाणी इंडस्ट्रीला विकते. या व्यवहारामध्ये एम.आय.डी. सी. ला पैसे मिळतात त्यातून जिल्हा परिषदेला सेस देण्याची कायद्यात तरतूद आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्हा परिषदांची आकडेवारी माझ्याकडे नाही परंतु आमच्या रायगड जिल्हा परिषदेला या मधील 30 कोटी रुपये राज्य शासनाकडून मिळाले पाहिजेत. राज्य सरकारने ते पैसे वसूल केले असल्यामुळे त्यांच्याकडे जमा आहेत. परंतु आम्हाला ते पैसे मिळाले नाहीत ते देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. सभापती महोदय, परवा वर्तमानपत्रामध्ये गोव्याच्या संपूर्ण किनारपट्टीवर तेलाचा तवंग पसरल्याचे वाचले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

आपल्या महाराष्ट्र राज्याला 750 कि.मी.ची किनारपट्टी लाभलेली आहे. पण आज या किनारपट्टीवर ओपन समुद्रामध्ये विदाऊट रोडलाईन बार्जेस्ची वाहतूक होत आहे. रोडलाईनचे बार्जेस चालविण्याची कायद्यात तरतूद आहे. पण मुंबई बंदरामध्ये रोड लाईन नसलेल्या बार्जेस चालविण्याचा उपक्रम केला जात आहे. समुद्रामध्ये रोड लाईन बार्जेसची वाहतूक झाली तर त्यामुळे धोके कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून यादृष्टीकोनातून यासंबंधीच्या कायद्याची 100 टक्के अंमलबजावणी कशी होईल याची राज्य शासनाने दखल घेतली पाहिजे. नाहीतर जर उद्या रोडलाईन नसलेले बार्जेस चालविण्याची परवानगी दिली तर गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे. रोडलाईन बार्जेस बी.पी.टी.च्या कक्षेत येतात, तेथे त्यांची नोंद झाली पाहिजे आणि नोंद झालेल्या बार्जेसनांच समुद्रामध्ये वाहतूक करण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. जेणेकरुन समुद्रामध्ये सुरक्षित आणि चांगल्या प्रकारे,सुलभ वाहतूक होऊ शकेल. सभापती महोदय, या शासनाने बंदरांचा विकास करण्याचे धोरण जाहीर केले आहे. सात बंदरे विकसित करण्याची घोषणा शासनाने केली पण प्रत्यक्षात मोठया प्रमाणात बंदरांचे काम झाले नाही. याबाबतीत शासनाने ठरविले पाहिजे की, एकदा एका बंदराच्या कामासाठी शासनाने परवानगी दिल्यानंतर किती कालावधीमध्ये ते बंदर पूर्ण करावयाचे आहे ? आज असे होत आहे की, बंदराच्या कामाची परवानगी घेतली जाते, प्रोजेक्ट मंजूर करुन घेतला जातो पण त्यादृष्टीने त्याची अजिबात अंमलबजावणी होत नाही. म्हणून याठिकाणी ज्या बंदरांची कामे जाहीर केली आहेत, ते काम ज्या कंपन्यांना दिले आहे, त्यांना तुम्ही कालावधी ठरवून दिला पाहिजे. पण आज अशी स्थिती आहे की, पाच-सहा वर्षे झाली तरी अजून तेथे दगड सुध्दा टाकलेला नाही. आम्ही वर्ततानपत्रामध्ये वाचले की, कोकणासाठी पाच हजार कोटीची, आठ हजार कोटीची गुंतवणूक करण्यात येत आहे. हे वाचल्यानंतर आता कोकणचा विकास होईल असे मला वाटले. पण प्रत्यक्षात याबाबतीत कोणतीही गोष्ट झालेली नाही. यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर केले पाहिजे की, बंदरांच्या कामासाठी परवानगी दिल्यानंतर अमुक कालावधीमध्ये म्हणजे दोन वर्षात, तीन वर्षात, चार वर्षात त्याचे काम पूर्ण होईल याची संबंधितां कडून खात्री करुन घेतली पाहिजे आणि तसे जे करणार नाहीत, ज्यांनी कामाच्या बाबतीत केवळ परवानगी घेतली आहे, त्यांची परवानगी रद्द केली पाहिजे. निवडणुकीच्या निमित्ताने आघाडी शासनाने कोळी समाजाला जातीचे दाखले देऊ असे जाहीर केले होते. पण निवडणुकीच्या

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

निमित्ताने प्रत्येक वेळेला कोळी समाजाला दाखले देण्याच्या अनुषंगाने खेळवले जाते. पण प्रत्यक्षत किनारपट्टीवरील कोळी समाजाला दाखले देण्यापासून वंचित ठेवले आहे. याठिकाणी सांगावयास दु:ख होते की, एका तालुक्यातील 10 गावातील दाखले योग्य आहेत असे सांगितले जाते आणि बाजूच्या दुस-या गावातील दाखले योग्य नाही म्हणजे पनवेल तालुक्यातील केळवणे गावातील दाखले चालतात, पण न्हावा-शेवामधील दाखले चालत नाहीत. हे असे का ? केंद्र शासनाचा निर्णय काय आहे ? हे मला माहिती नाही. पण राज्य शासनाचे याबाबतीत ठोस धोरण कोणते आहे ? भूमिका काय आहे ? हे येथे स्पष्ट झाले पाहिजे आणि कोळी समाजाला न्याय मिळाला पाहिजे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे चालू...

मागासलेला कोळी समाज आहे. आपण ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये, जिल्हापरिषदेच्या निवडणुकीमध्ये राखीव मतदार संघ दिलेले आहेत, परंतु आपण कोळी समाजाला मागासलेपणाच्या संदर्भातील दाखला मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये पनवेल, अलिबाग मुरुड येथे नगरपालिका आहेत, तेथे त्यांना कोणत्याही सवलती मिळत नाहीत. सभापती महोदया, आपण मुरुड येथील आहात, परंतु त्या मुरुड येथील कोळी समाजाला जातीचा दाखला न दिल्यामुळे राखीव मतदार संघामध्ये त्यांना निवडणूक लढविता आलेली नाही. इतकेच नाही तर आज कोणत्याच पक्षाला त्या भागातील पोट निवडणुकीमधील राखीव जागेसाठी उमेदवार मिळत नाहीत. शासनाने या कोळी समाजाला जातीचा दाखला देण्याच्या संदर्भात स्पष्टपणाने सांगितले पाहिजे. शासनाची आता अडचण दूर झाली असावी, कारण ते संबंधित मंत्री मंत्रिमंडळामध्ये नाहीत...

अनेक सन्माननीय सदस्य : त्यांचे काय नाव आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : श्री.पिचड साहेबांचा यांचा त्यास विरोध असायचा.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यंनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय मंत्री श्री.पुरके साहेब स्वत: असे दाखले देण्याच्या बाजूचे आहेत, की नाहीत याची मला माहिती नाही. कोळी समाजाला जातीचे दाखले हे मिळाले पाहिजेत. त्यांचा तो अधिकार आहे. हे कोळी बांधव या अधिकारापासून वंचित होतात, त्यांना ग्रामपंचायतीच्या, जिल्हापरिषदेपर्यन्तच्या राखीव जागेवर निवडणूक लढविता येत नाही. कोळी बांधवांना जातीचे दाखले मिळाले तर आमच्यावर अन्याय होईल अशाप्रकारची श्री.पिचड साहेबांची भावना होती. याबाबत कोळी समाजाला दाखले देण्याचे धोरण स्पष्ट झाले पाहिजे, एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आपण मघाशी सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांना उद्देशून "कर्नल सुधीर सावंत", असे त्यांचे नाव उच्चारले. परंतु प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये त्यांच्या नावासमोर "मेजर" असे छापलेले आहे.

तालिका सभापती : ते कर्नल आहेत.

श्री.दिवाकर रावते : प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये त्यांचा नावासमोर 'मेजर' असे छापलेले आहे.

तालिका सभापती : त्याबाबत सुधारणा होईल.

श्री.दिवाकर रावते : प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये मा.सदस्य श्री.सुधीर सावंत यांच्या नावासमोर "मेजर" असे छापलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सन्माननीय सदस्यांच्या नावासमोर "मेजर" असा उल्लेख छापलेला आहे आणि आपण त्यांना कर्नल असे संबोधल्याबाबत मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांनी सैन्यामध्ील नोकरी सोडली, त्यानंतर त्यांनी लोकसभेची निवडणूक लढले. ज्यावेळेस कारगिलचे युध्द झाले त्यावेळेस ते स्वत: त्या युध्दामध्ये दाखल होऊन लढले. त्यानंतर त्यांना "कर्नल" अशी पदवी दिली गेलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : एकदा ते 'मेजर' म्हणून निवृत्त झाल्यानंतर पुन: 'कर्नल' म्हणून कशी काय पदवी मिळू शकते ?

तालिका सभापती : ही माहिती घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : ते कारगिलच्या युध्दामध्ये लढलेच नव्हते, अशी माझी माहिती आहे.

-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मागच्या वर्षीचा अर्थसंकल्प मांडतांना मा.अर्थमंत्री महोदयांनी 19983 कोटीची तरतूद करुन वेगवेगळया योजना या सभागृहात सादर केल्या. त्या योजनांवर प्रत्यक्षात 10670 कोटी रुपये खर्च झाले आणि जवळपास 9,313 कोटी रुपयाचा कट लावण्यात आला. सभापती महोदया, या वर्षीचे अंदाजपत्रक त्यापेक्षा 9 हजार कोटींनी कमी मांडण्यात आलेले आहे. म्हणजे मागच्यावर्षी 1900 कोटी रुपयाचे बजेट सादर केले आणि 9 हजार कोटीचा कट लावण्यात आला. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की. मागच्यावर्षी विधानसभेच्या निवडणुका होत्या, त्यामुळे सरकारने वारेमाप आश्वासने महाराष्ट्रातील जनतेला देऊन त्यांच्यासमोर मृगजळ निर्माण केले.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

मृगजल महाराष्ट्राच्या जनतेसमोर उभे केले. त्या मृगजलामागे महाराष्ट्रातील जनता धावली. रामायणामध्ये प्रभू रामचंद्रांनाही त्या मृगजलाने असेच फसविले होते.त्याच पध्दतीने या राज्यामध्ये या सरकाने जनतेला फसविले. ज्या ज्या घोषणा केल्या त्या घोषणा पूर्ण झाल्या नाहीत. या वर्षी 11 कोटी रुपयाने बजेट मागे नेले. सभापती महोदया, ज्या राज्याचे बजेट अशा पध्दतीने मागे जाते ते राज्यही मागे जात असते आणि म्हणून महाराष्ट्राला तुम्हाला मागे न्यावयाचे आहे काय? सन 2002-2003 पासून अशा पध्दतीने बजेट वाढवत वाढवत 19 हजार कोटी रुपया पर्यंत नेले. आणि याच वर्षी एकदम नऊ हजार कोटी रुपयाने कमी करुन 11 हजार कोटी रुपयाचे बजेट या ठिकाणी मांडले. बजेट तर मांडले परंतु या बजेटमध्ये 11 हजार कोटी रुपयाच्या योजना निश्चित केल्या. पण त्या योजनेपैकी 8416 कोटी रुपयाचाच नियतव्यय या बजेटमध्ये दाखविला आहे. माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या मुद्याचा मी पुन्हा उल्लेख करु इच्छितो.जे 2583 कोटी रुपये शिल्लक राहणार आहेत. डॉ. देशमुख साहेब ते पैसे आपण कुठे खर्च करणार आहात?. माननीय श्री. नितीन गडकरींनी जो प्रश्न या ठिकाणी विचारला तोच प्रश्न मी पुन्हा आपल्याला या ठिकाणी विचारणार आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, उत्तर महाराष्ट्र, कोकण या विभागांचा जो अनुशेष आहे, त्या अनुशेषाच्या पोटी फक्त 1900 कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. उर्वरित साडे चार हजार कोटी रुपये यापैकी 1900 कोटी रुपये देणार आहात. उर्वरित पैशाचे आपण काय करणार आहात? आणि म्हणून हे जे दोन हजार कोटी रुपये शिल्लक राहाणार आहेत ते मागास विभागाला देणार आहात काय? हे उत्तराच्या भाषणात सांगितले तर बरे होईल. माननीय राज्यपालांनी निर्देश दिले. त्यासंदर्भात मागच्या अधिवेशनामध्ये नागपूर अधिवेशनामध्ये त्याच्या आधीच्या बजेट अधिवेशनामध्ये मागच्या विनियोजन बिलाच्या वेळी सुध्दा या सभागृहाने त्या विनियोजन बिलाला काही दुरुस्त्या दिल्या होत्या.. त्या दुरुस्त्या दिल्या नंतर काय हल्ला झाला ते सभापती महोदय,आपल्याला माहीत आहे. माननीय राज्यपालांनी निर्देश देऊनसुध्दा हे सरकार राज्यपालांचेही ऐकत नाही. रज्य घटनेचेही ऐकत नाही. कै. यशवंतराव चव्हाणांचे वाक्य मला आठवले. ज्या वेळेला संयुक्त महाराष्ट्र या ठिक्राणी झाला. विदर्भातील जनता महाराष्ट्रात आली. त्यावेळी माननीय कै. यशवंतराव चव्हाणांनी पहिले बजेट या सभागृहात मांडले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

होते. त्या बजेटमध्ये त्यांनी पहिले वाक्य असे लिहिले होते की, "हे संपूर्ण राज्य समोर ठेवून समाजवादाचा पहिला पाळणा जर कुठे हलणार असेल तर तो या देशात, या महाराष्ट्रात पहिल्यांदा हलेल." पण सभापती महोदय, काय घडले? विदर्भातील जनता तुमच्यात सामील झाली. परंतु विदर्भातील जनतेला, मराठवाडयाती जनतेला, उत्तर महाराष्ट्रातील जनतेला आणि कोकणातील जनतेला सतत पाने पुसण्यात आली. त्यांना आपण न्याय दिला नाही, हे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. या महाराष्ट्रातील 60 टक्के जनता ग्रामीण भागात राहते. सभापती महोदय, मी हे बजेटचे पुस्तक चार वेळा वाचले. माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी संगितले की, या बजेटच्या भाषणामध्ये 57 मुद्दे असे आहेत की, ज्यात कुठे काहीही तरतूद नाही. मी हे बजेटच्या भाषणाचे पुस्तक तीन वेळा वाचले. या पुस्तकात डॉ. देशमुख साहेब आपण विदर्भातील आहात. आमचे मित्र आहात. पण त्या पुस्तकात मला शेतकरी कुठेही दिसला नाही. शेतकरी दिसला तो या शेतक-याला उध्वस्त करण्याचे धोरण तुम्ही यामध्ये टाकलेले आहेत. कापूस एकाधिकार योजनेचा विषयी आमचे मित्र श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडला. या योजनेच्या रुपाने "हड्डी गळयात अटकते" तशी परिस्थिती झालेली आहे. हे खरे आहे. पण या पुस्ताकात कापूस एकाधिकार योजनेचा आपण जो उल्लेख केलेला आहे. ही योजना 1972 साली सुरु झाली. आपण सांगितले. वीस वर्षा पासून सुरु आहे. वीस वर्षापासून नाही. 1972 साली या सभागृहात माननीय यशवंतराव मोहिते यांनी ही योजना आणली. कारण त्या काळात कापूस उत्पादक शेतक-यांची लूट व्यापा-यांकडून होत होती. व्यापा-याच्या दावणीतून शेतकरी बाहेर काढला पाहिजे.या राज्यातील सहकारी संस्था वाढल्या पाहिजेत. या राज्यातील खरेदी विक्री संघ असतील, या राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या असतील, या राज्यातील बँका असतील त्या सक्षम झाल्या पाहिजेत. नुसता कापूस उत्पादक शेतकरी एवढाच उद्देश या योजनेचा नव्हता तर या सर्व संस्था सक्षम झाल्या पाहिजेत. कापसापासून कपडया पर्यंतच्या प्रक्रियेचा मालक शेतकरी झाला पाहिजे. इतके मोठे उदिष्ठ या योजनेचे होते.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

परंतु आता या योजनेला 30-32 वर्षे झालेली आहेत. या योजनेचे काय झाले ? ही योजना जिनिंग प्रेसिंगपर्यन्त गेली. कृषि उत्पन्न बाजार समित्या जगल्या. खरेदी-विक्री संघ जगले. बँका जगल्या. वसुली झाली परंतु कापूस उत्पादक शेतकरी सक्षम होऊ शकला नाही. आपण सांगितले आहे की, ना नफा ना तोटा या तत्वावर पुढच्या काळामध्ये ही योजना राबविण्याचा आमचा विचार आहे. ज्यावेळी ही योजना आली त्यावेळी श्री. यशवंतराव मोहिते यांनी सांगितले होते की, नफा झाला तर तो शेतकऱ्यांचा आणि तोटा आला तर तो सरकारचा असेल. परंतु या तत्वाप्रमाणे हे शासन चालले नाही. ही योजना तोटयात आहे असे सांगितले गेले. तोटा आला म्हणून ही योजना आता आम्हाला चालविणे कठीण झालेले आहे असे वक्तव्य झाले. दुष्काळात इतका कापूस कसा पिकतो याबाबतचा साक्षात्कार सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना झाला. विदर्भामध्ये 9 हजार गावांमध्ये दुष्काळ आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु दुष्काळ आहे म्हणून कापूस पिकत नाही हे खरे नाही. कापूस जास्त का पिकला ? मराठवाडा असेल, उत्तर महाराष्ट्र असेल, विदर्भ असेल त्या ठिकाणी आता बाजारामध्ये नवीन नवीन बियाणे येत आहे. नवीन नवीन टेक्निक येत आहे. बी.टी.कॉटन सारखा कापूस एकरी 20 ते 22 क्विंटलपर्यन्त येतो. शेतकरी बी.टी.कॉटन कापूस घ्यावयास लागले. हा बी. टी. कॉटन कापूस सर्व शेतकरी पिकवित नाही. खेडयात राहणारा, निसर्गाच्या भरवशावर शेती करणारा शेतकरी बी. टी. कॉटन लावत नाही. या वर्षी किमान 20 टक्के शेतकऱ्यांनी बी. टी. कॉटन कापूस लावला असेल आणि त्यामुळे त्यांचे उत्पन्न तिप्पट वाढले. त्यामुळे एकाधिकार कापूस खरेदी योजनेमध्ये इतक्या कापसाची वाढ झाली. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी परवा सांगितले की, एका बाजूला दुष्काळ आहे असे म्हणता आणि दुसऱ्या बाजूला राज्यामध्ये कापसाचे ऐतिहासिक पीक आले आहे असे चित्र दिसते. दुष्काळ आहे हे खरे आहे परंतु बी.टी.कॉटनमुळे कापसाचे उत्पादन वाढले. उत्तर महाराष्ट्रामध्ये कापसाचे उत्पादन वाढले. मराठवाडयामध्ये कापसाचे उत्पादन वाढले. काही प्रमाणात विदर्भामध्ये कापसाचे उत्पादन वाढले. याचा अर्थ कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस पेरणी करणे सोडून द्यावे असे नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी हा जावईशोध कोठून लावला हे माहीत नाही. सभापती महोदया, मी या ठिकाणी 1987 ते 1980 या काळातील उल्लेख करीन. आजचे जे माननीय अर्थमंत्री आहेत त्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

वडील श्री. राजारामबापू पाटील त्यावेळी या सभागृहामध्ये होते. ते खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे कैवारी होते. त्यांनी राज्यात शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्याचा प्रयत्न केला. 1978 ते 1980 या काळात मी विधानसभेत सदस्य होतो. त्यावेळी श्री. राजारामबापू पाटील यांचे काम मी पाहिलेले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील यांचे काम मी गेली तीन वर्षे पाहात आहे. सन्माननीय श्री. जयंत पाटील हे अतिशय बुध्दिमान आहेत. परंतु सन्माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी जो अर्थसंकल्प या ठिकाणी मांडलेला आहे त्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिबिंब दिसत नाही. यामध्ये खेडयात राहणाऱ्या लोकांच्या विकासाचे प्रतिबिंब दिसत नाही. हा अर्थसंकल्प पाहून श्री. राजारामबापू पाटील यांना काय वाटले असेल याचा विचार माननीय श्री. जयंत पाटील यांनी केला पाहिजे. या ठिकाणी निर्लज्जपणे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना असे सांगितले जाते, त्यांना या अर्थसंकल्पात असा सल्ला दिला आहे की, "कापसाला पर्यायी पिकांची निवड करण्यास प्रोत्साहन देण्याची वेळ आली आहे. कापूस उत्पादन होणाऱ्या प्रदेशामधील जमीन व हवामान सोयाबीन सारख्या तेल बीया पिकांच्या उत्पादनासाठी अधिक अनुकूल आहेत. म्हणूनच, कापसाला पर्यायी पिकांसाठी राज्य कृषि विभागाकडून प्रोत्साहन योजना तयार करण्यात येत आहेत." माननीय अर्थ राज्यमंत्री श्री. देशमुख साहेब, आपण विदर्भातील आहात. आपण कापूस पिकविणाऱ्या भागातील आहात. असे कितीही नुकसान झाले तरी विदर्भातील माती अशी आहे की, त्या मातीमध्ये विदर्भामध्ये जन्माला आलेला माणूस असेल त्याचे कापसाशी भावनिक आणि आर्थिक नाते जोडले गेलेले आहे. तुम्ही त्याला कितीही आमीष दाखविले तरी तुम्ही त्याला कापूस पिकविण्यापासून परावृत्त करु शकणार नाही. कारण कापूस हे विदर्भातील नगदी पीक आहे. वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड असे या कापसामुळेच म्हटले जाते. त्या शेतकऱ्याला कापसापासून दुसऱ्या पिकाकडे नेण्याचा प्रयत्न करणार असाल तर ते उचित होणार नाही. तुम्हाला जर एकाधिकार कापूस खरेदी योजना राबवावयाची नसेल तर त्याला पर्यायी योजना द्यावी. त्या शेतकऱ्यांचे संरक्षक म्हणून तुम्ही मार्केटमध्ये उभे राहिले पाहिजे. कापूस एकाधिकार योजनेला पर्यायी योजना तयार करा. शेतकऱ्याला जास्तीचा भाव देऊ नका. बाजारातील जो चढउतार असतो त्या चढउताराप्रमाणे कापसाची खरेदी करा. त्या शेतकऱ्याचे संरक्षक म्हणून शासनाने बाजारामध्ये उभे राहिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

अशा प्रकारची आमिषे दाखवून शेतकऱ्यांना कापूस पिकापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करु नका अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये मी जे शेतीसंबंधी वाचले त्यामध्ये मागच्यावेळी ज्या लघुपाटबंधारे योजना, ज्या पाटबंधारे योजना चालू आहेत त्याच योजना यामध्ये चालू ठेवलेल्या आहेत. नवीन प्रकल्पासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडूरंग फुंडकर...

महाराष्ट्रातील शेती सिंचनाखाली आली पाहिजे. या महाराष्ट्रामध्ये गेल्या 50 वर्षामध्ये अनेक मोठे प्रकल्प उभे राहिले. देशाचा विचार केला तर सगळयात जास्त महाराष्ट्रामध्ये प्रकल्प उभे राहिले. परंतु देशाच्या तुलनेमध्ये सिंचन 15 टक्क्याच्या पुढे गेले नाही ही शोकांतिका आहे. इतक्या कमी सिंचनामुळे महाराष्ट्राची जमीन भिजणार नाही. महाराष्ट्रातील शेतक-यांना निसर्गावर अवलंबून शेती करावी लागणार आहे. आपण मागील काळातील लघुपाटबंधारेच्या योजना चालविल्या आहेत. तुम्ही शेतक-यांना पाणी देणार नाही, शेतक-यांच्या कापसाला भाव देणार नाही, शेतक-यांच्या ज्वारीसाठी खरेदी केंद्र सुरु करणार नाही, त्याच्या शेतीमालाला योग्य भाव देणार नाही. आजही ज्वारी उत्पादक शेतक-यांच्या मालाला केवळ 300 ते 350 रुपये प्रति क्विंटल इतका भाव दिला जात आहे. तुम्ही शेतक-यांना वीज देणार नाही, वीज दिली तर लोड शेडिंग चालू आहे. लोड शेडिंगचे धिंडवडे निघाले आहेत हे संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. आज शेती असेल तर तिला पाणी नाही, पाणी असेल तर वीज नाही, वीज असेल तर लोडशेडिंग आहे. या लोडशेडिंगमुळे तो रब्बीचा हंगाम घेऊ शकत नाही. हया शेतक-यांसाठी विजेची व्यवस्था नाही, पाण्याची व्यवस्था नाही, सिंचनाची व्यवस्था नाही, मार्केटिंगची व्यवस्था नाही, मालाला योग्य भाव देत नाही अशा परिस्थितीत हा शेतकरी जगत आहे ही एक बाजू झाली. दुस-या बाजुला हया शेतक-यांच्या खेडयांची काय अवस्था आहे ? मा.अर्थराज्य मंत्रिमहोदय, तुम्ही या खेडयाबद्दल भाषणाच्या पुस्तकात काय लिहिले आहे ? खेडयांची काय अवस्था आहे ? आज खेडयाला वीज पाहिजे, अंगणवाडया पाहिजेत, प्राथमिक शाळा पाहिजेत, शिक्षणाची सोय झाली पाहिजे, पिण्याचे पाणी पाहिजे या 4-5 गरजा त्यांना पुरविल्या तर खेडयातील माणसे तुम्हाला धन्यवाद देतील. परंतु या देशाला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाली. या काळात ग्रामीण जनतेला तुम्ही साधे पिण्याचे पाणी देऊ शकला नाहीत. या 58 वर्षांमध्ये देशात कोणाचे राज्य होते, या राज्यात कोणाचे राज्य होते हे पहावे. 58 वर्षांपैकी 5 वर्षे युतीची सोडली तर उर्वरित 53 वर्षे काँग्रेसने राज्य केले आहे. या काळामध्ये तुम्ही साधे पिण्याचे पाणी देऊ शकला नाहीत. आज विदर्भातील 9 हजार खेडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने त्याठिकाणी टँकर्स सुरु केले आहेत. हे टँकर्सवाले अर्धा टँकर भरतात आणि अर्धा रिकामा करतात आणि एका दिवसामध्ये किती

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडूरंग फुंडकर...

फे-या मारतात ? एक दिवस फेरी मारतो आणि पाच दिवस पाच फे-यांची नोंद करतात. त्या टँकरमधून गावातील विहिरीमध्ये पाणी आणून टाकले जाते. पण जर त्या त्या गावामध्ये नळयोजना असेल आणि तेथील विहिर खोल करण्याची मागणी केली तर तेथील बीडीओ किंवा तहसीलदार आम्ही ते करणार नाही असे सांगतात. याचे कारण त्या टँकरमधून त्यांना मलिदा मिळतो. आज अ वर्ग, ब वर्ग, क वर्ग व ड वर्ग नगरपालिकांच्या हद्दीमध्ये पिण्याच्या पाण्याची स्थिती भयानक झाली आहे. मी खामगाव शहरातून निवडून येतो. 1 लाख लोकवस्ती असलेल्या या शहराला 15-15 दिवस पाणी मिळत नाही. शासनाने या शहरामध्ये 20 टँकर्स सुरु केले आहेत. या खामगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे फार विद्वान आहेत. त्यांनी टँकर्सचे योग्य नियोजन केलेले नाही. हे अधिकारी मनाला येईल तेव्हा सुट्टीवर जातात, नगरसेवकांना विचारत नाहीत, आलेल्या लोकांना विचारत नाहीत. हे अधिकारी 14-14 दिवस कॅश बुकवर सहया करीत नाही. इतके ते मस्तवाल झाले आहेत. खामगाव शहरातील लोक पाण्यासाठी टाहो फोडत आहेत. अशाप्रकारे अधिकारी असतील तर त्याबाबत शासनाची काय भूमिका राहणार आहे ? गेल्या तीन महिन्यापासून या शहराची पिण्याच्या पाण्याची ही स्थिती आहे. जनावरांची स्थिती याहीपेक्षा जास्त वाईट आहे. मी परवा ब-हाणपूरला कामानिमित्त गेलो होतो. माझ्या गावातील एक शेतकरी तेथे आला असता मी त्याला विचारले की तू येथे कशासाठी आला ? त्याने मला सांगितले की, भाऊसाहेब काय करणार ? जनावरांना सोडण्यासाठी आलो आहे. जनावरांना पाणी नाही, चारा नाही, पोटच्या पोरांसारखे जनावरांना जपले परंतु त्यांचे हाल बघवत नसल्यामुळे त्यांना या सातपुडयाच्या डोंगरात सोडण्यासाठी आलो आहे. या जनावरांना चारा नाही, पाणी नाही अशी स्थिती आहे.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...

हे अधिकारी मस्तावलेले आहेत. सीईओ कोणाचे ऐकत नाही. हेसरकार पाण्यासाठी, टँकरसाठी पैसे देते. परंतु सीईओ मात्र हे सरकार कसे बदनाम होईल याचा प्रयत्न करीत असतो. अशा प्रकारच्या सीईओवर कारवाई करायला पाहिजे. बीडीओ, तहसिलदार यांच्यावरही कारवाई केली पाहिजे. पंचायत समिती तर्फे बीडीओला पाण्याच्या टँकरसाठी निवेदन दिले तर बीडीओकडून तो प्रस्ताव तहसिलदाराकडे जातो आणि तहसिलदार त्यावर 15-15 दिवस सही करीत नाही. परिणामी गावाला पाणी मिळत नाही. राज्यामध्ये रोजगार हमी योजनेची कामेही सुरु नाहीत. सभापती महोदय, शेवटचे दोन मुद्दे मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. अनेक गावांना पिण्याचे पाणी नाही, रस्ते नाहीत. शाळांची तर फार दयनीय अवस्था आहे. हे शासन शाळांवर हजारो कोटी रुपये खर्च करते. पण हे पैसे कुठे खर्च होतात ते मात्र दिसत नाही. ग्रामीण भागातील शाळांसाठी जादा तुकड्यांना मान्यता दिलेली आहे. परंतु प्रश्न असा आहे की, या तुकड्या आपण कुठे बसविणार आहात ? तालिका सभापती महोदया, मी ग्रामीण भागामध्ये फिरणारा कार्यकर्ता आहे. शाळांची अवस्था काय आहे हे मी आपणास सांगतो. मी एका गावात गेलो होतो. तेथे शाळेच्या मागून रस्ता होता. मला तहान लागली होती म्हणून मी त्या घरासारख्या दिसणा-या ठिकाणी गाडी उभी केली आणि ड्रायव्हरला पाणी मिळते का ते बघून येण्यास सांगितले. ड्रायव्हरने सांगितले की, ते घर नाही, ती शाळा आहे. मी त्या शाळेचे आणि गावाचे नावही मा. मंत्रीमहोदयांना देईन. मी गाडीतून उतरुन त्या घरासारख्या दिसणा-या शाळेजवळ गेलो. शाळेतील मास्तर बाहेर आले. मी त्यांना म्हटले, "गुरुजी मला तहान लागली आहे. थोडे पाणी पाजा." मी त्या शाळेच्या व्हरांड्यात उभा होतो. तो व्हरांडा एका बाजूला कललेला होता. मी त्याबाबत मास्तरांना विचारणा केली. त्यांनी सांगितले की, छापराचे खांब जमिनीखाली तुटलेले आहेत. म्हणून ते बांधून ठेवलेले आहेत. म्हणजे आमच्या ग्रामीण भागातील मुले तुटलेले छपर असलेल्या शाळेत, जी शाळा केंव्हाही कोसळून प्राणहानी होऊ शकते, अशा शाळेमध्ये जीव मुठीत घेऊन शिक्षण घेतात आणि अशा परिस्थितीकडे हे शासन कोणत्याही प्रकारचे लक्ष देत नाही. नंतर मी त्या मास्तरांना शाळा कोणत्या इयत्ते पर्यन्त आहे असा प्रश्न विचारला. मास्तारांनी शाळा 4थी पर्यन्त आहे असे सांगितले. प्रत्येक वर्गातील मुले कुठे बसविता आणि त्यांना कसे शिकविता, असा प्रश्न मी त्यांना केला. त्यांनी मला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...

खोलीत नेऊन पाहिलीची, दुसरीची, तिसरीची आणि चौथीची मुले दाखविली. या एकाच खोलीत चार वर्गाचे विद्यार्थी बसत असतील तर त्यांना कशा प्रकारे शिकविले जाते असा प्रश्न मी शिक्षकांना केला. शिक्षकांनी सांगितले की, जेव्हा पहिली-दुसरीच्या मुलांना शिकविले जाते त्यावेळी तिसरी-चौथीच्या मुलांची तोंडे बंद असतात आणि जेव्हा तिसरी-चौथीच्या मुलांना शिकविले जाते त्यावेळी पहिली-दुसरीच्या मुलांची तोंडे बंद असतात. या शाळेवर विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी किती शिक्षक आहेत ? असा प्रश्न मी त्या शिक्षकाला केला. त्या शिक्षकाने सांगितले की, या शाळेमध्ये दोन शिक्षक आहेत. आता ते रजेवर आहेत. त्या शिक्षकांनी पुढे असेही सांगितले की, जेव्हा ते रजेवर असतात त्यावेळी मी कामावर असतो आणि मी जेव्हा रजेवर असतो त्यावेळी ते कामावर असतात. तालिका सभापती महोदया, ग्रामीण भागातील शाळांची अशा प्रकारे अवस्था आहे. शाळांची स्थिती दयनीय आहे, शाळेतील शिक्षक सुटीवर असतात. ते कधी शाळेत येतात तर कधी येत नाहीत. याचा परिणाम असा झालेला आहे की, आज ग्रामीण भागातील शाळेमध्ये 8व्या इयत्तेमध्ये जाणा-या मुलाला आपले नाव देखील लिहिता येत नाही.

कुपोषणाच्या संदर्भात मी थोडक्यात विचार मांडणार आहे. मागील अधिवेशनामध्ये मा.सदस्य श्री. जगदीश गुप्ता आणि मी मेळघाट आणि धारणी येथील आदिवासी बालकांच्या कुपोषणाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी मा. मुख्यमंत्र्यांनी एक समिती नेमण्याचे आश्वासन दिले होते. परंतु ती समिती नेमली नाही. त्या ऐवजी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य मिशन स्थापन केले. या मिशनच्या संदर्भात अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्य शासनाने लहान मुलांमधील कुपोषण व बालमृत्यू या तीव्र समस्यांवर उपाय करण्यासाठी राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन औरंगाबाद येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. 0 ते 6 वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पुढील पाच वर्षे हे मिशन कार्य करेल. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता तसेच एका वर्षाखालील बालकांचे आरोग्य व पोषण यावर मिशनचे विशेष लक्ष राहील. या मिशनवर महाराष्ट्र शासनाचे सचिव दर्जाचे वरिष्ठ अधिकारी प्रमुख राहतील. या मिशनतर्फे, राज्यातील सर्व शहरे व गावांमध्ये व्यापक प्रसिध्दी मोहीम हाती घेऊन माता व बालकांच्या आरोग्य व पोषणाचे महत्व जाणून समाजाने महिला व बालकांची अधिकाधिक जबाबदारी स्वीकारावी हे या मिशनचे अंतिम ध्येय राहील."

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

हे मिशन राबविण्यासाठी शासनाने किती तरतूद ठेवलेली आहे याचा या सदनात खुलासा करणे आवश्यक आहे. मेळघाटमधील आदिवासींचे बालमृत्यू थांबले पाहिजे, तेथील कुपोषण थांबले पाहिजे अशा प्रकारची आम्ही मागणी केली होती. तेथील आदिवासी मातांचे संगोपन झाले पाहिजे, माता गर्भवती असताना तिचे बालक सुदृढ व्हावे यासाठी विशेष मोहीम हाती घेतली पाहिजे होती. यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होता. परंतु यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही ही खेदाची गोष्ट आहे. हे मिशन फक्त प्रचाराचे काम करणार आहे. या प्रचारातून कुपोषण थांबू शकणार नाही. कुपोषणाच्या बाबतीत डॉ. अभय बंग समितीने अहवाल शासनास अहवाल सादर केलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, डॉ. अभय बंग समितीचा पहिला अहवाल या सभागृहाला सादर झालेला आहे. या समितीचा दुसरा अहवाल तयार आहे. तो अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. परंतु तो अहवाल अजून सभागृहाच्या पटलावर ठेवला गेलेला नाही. तो दुसरा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा अशी माझी मागणी आहे.डॉ. अभय बंग समितीने आपल्या अहवालात शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींप्रमाणे आदिवासी विभागातील कुपोषण थांबविण्याची व्यवस्था शासनाकडून केली जाणार आहे काय ? यासाठी किती तरतूद शासनाकडून केली जाणार आहे यासंबंधीचा देखील खुलासा या ठिकाणी केला गेला पाहिजे. या राज्यात शाहू, फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नावे प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी घेतली जातात. माननीय अर्थमंत्र्यांचे भाषण ऐकताना यांची नावे घेतली जातात. माननीय मुख्यमंत्री कधी कधी बोलतात की, शाहू, फुले,डॉ.आंबेडकराच्या मार्गाने हे राज्य चालले आहे. या सदनात परवा एक प्रश्न उपस्थित झाला. राज्यातील ओ.बी.सी. चे विद्यार्थी आहेत ते विद्यार्थी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयात जात असतील तर त्यांची शिष्यवृत्ती बंद करण्यात आलेली आहे. तो विद्यार्थी अनुदानीत महाविद्यालयात गेला तर त्यास शिष्यवृत्ती मिळणार आहे. विना अनुदानीत शाळेत केला तर मात्र त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. हा भेदभाव या वर्षापासून शासनाने सुरु केलेला आहे. यासंबंधी मी माहिती घेतली आहे. 51 टक्के समाज हा रिझर्व्हेशनमधील आहे.51 टक्के समाजातील विद्यार्थ्यांची शासन व्यवस्था करीत आहे. परंतु ओ.बी.सी. समाजातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करुन अन्याय करीत आहे. ओ.बी.सी. समाजावरील अन्याय शासनाने दूर केला पाहिजे. या ---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

संदर्भात लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली होती, ती राखून ठेवण्यात आलेली आहे. माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, यासाठी 52 कोटी रुपयांची गरज लागेल. या शासनाचा हजारो कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. एवढया मोठया अर्थसंकल्पात ओ.बी.सी. समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यास काय हरकत आहे. ज्यावेळी सभागृहात विनियोजन विधेयक मांडण्यात येईल त्यावेळी या समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करावी अशा प्रकारची घोषणा शासनाने करावी अशी मी या ठिकाणी मागणी करतो. मी शेतक-यांच्या संरक्षणाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करणार आहे.शेतक-यांना कापूस एकाधिकारी योजनेच्या माध्यमातून संरक्षण देणार नाही. गारपीटग्रस्त शेतक-यांना तुम्ही मदत देऊ शकत नाही, शेतक-यांनी दुबार,तिबार पेरणी केली असली तरी त्यास कोणत्याही प्रकारचे संरक्षण आपल्याकडून दिले जाऊ शकत नाही. शासनाने राज्यातील शेतक-यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे 550 शेतक-यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. मी अर्थसंकल्पीय भाषणाचे पुस्तक मी चार वेळा वाचले. परंतु संपूर्ण भाषण वाचल्यानंतर असे आढळून आले की, शेतक-यांनी केलेल्या आत्महत्त्येचा बाबतीत कुठल्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांच्या बाबतीत एका अक्षराचा सुध्दा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आलेला नाही. प्रगती पथावर असलेल्या महाराष्ट्र राज्यात 550 शेतकरी आत्महत्त्या करतात ही शासनास अशोभनीय गोष्ट आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत उत्तर दिले की, आत्महत्त्या केलेल्या 48 शेतक-यांना आम्ही मदत केलेली आहे. इतर शेतक-यांच्या बाबतीत काय करणार आहात ? आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे काय ? शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे त्यांनी आत्महत्तेचा मार्ग स्वीकारला आहे. त्यांचे कुटुंब उध्वस्त झालेले आहे. आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांचे पंचनामे होऊन सिध्द झालेले आहे. अशा शेतक-यांच्या कुटुंबियांना शासन मदत करणार आहे की नाही याचा खुलासा देखील या ठिकाणी करण्यात आला पाहिजे. संपूर्ण राज्यात 550 शेतक-यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत त्यातील 80 टक्के शेतकरी हे विदर्भातील आहेत असे मी अर्थ राज्यमंत्री श्री. सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो. तुमच्या जिल्हयातील काही शेतकरी आहेत, माननीय मंत्री श्री. पुरके यांच्या जिल्हयातील काही शेतकरी आहेत. आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

या अधिवेशनात शासन काही ठोस अशी घोषणा करील काय ? राज्यातील शेतक-यांना तुम्ही नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत करीत नाही, गारपीटग्रस्त शेतक-यांना तुम्ही मदत करीत नाही, शेतक-यांनी दुबार,तिबार पेरणी केली असेल त्यांना मदत केली जात नाही. शेतक-यांची शेती पुरात वाहून गेली अशा शेतक-यांना तुम्ही मदत करीत नाही. रब्बी पिकासाठी पीक विमा योजना तुम्ही या राज्यात लागू केली आहे. रब्बी पिकाचा विम्याचा हप्ताच तुम्ही भरलेला आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, या राज्यातील शेतक-यांना संरक्षण द्यावयाचे असेल तर सर्व पिकासाठी पीक विमा योजना लागू करण्यात आली पाहिजे. त्यासाठी या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केली पाहिजे अशा प्रकारची मागणी करतो आणि एकच सांगू इच्छितो की,....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, हे राज्य शेतक-यांनी आणलेले राज्य आहे. शेतक-यांसाठी चालविले जाणारे राज्य आहे. परंतु प्रत्यक्षात राज्य चालविताना मात्र शेतक-यांचा विसर पडलेला दिसतो. शेतक-यांच्या नावाने कुंकू लावून राज्य करीत आहात. कापसाला 2700 रु. भाव जाहीर केला पण प्रत्यक्षात तो दिला नाही. शेतक-यांना वाट्टेल तशी आश्वासने दिलीत परंतु ती या शासनाने पूर्ण केली नाहीत. शेतक-यांच्या नांवाने कुंकू लावायचे आणि संसार मात्र भांडवलदारांशी करावयाचा असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करावा एवढी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री. प्रमोद नवलकर : मेजर श्री.सुधीर सावंत आपण मेजर आहात की मायनर आहात.

कर्नल श्री. सुधीर सावंत : शेक्सपिअर म्हणाला होता What is there in a name ? मी जेव्हा सैन्यात होतो तेव्हा मेजर होतो आता कर्नल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2005-06 या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात दिनांक 21 मार्च, 2005 रोजी सादर झाला असून या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. राज्याचे अर्थमंत्री ना. श्री.जयंत पाटील आणि अर्थराज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी न्यायाचा,नितीचा आणि नव्या आर्थिक समीकरणांचा अर्थसंकल्प सादर करुन राज्याला शरदाच्या चांदण्यात न्हाऊ घातले आहे. गतवर्षी राज्याच्या अर्थमंत्र्यांनी सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प सादर केला होता आणि राज्यातील प्रत्येक घटकाला दिलासा दिला होता. यंदाचा अर्थसंकल्प समाजातील सर्व वंचित घटकांना समोर ठेवून महाराष्ट्राला गतवैभवाकडे घेऊन जाणारा अर्थसंकल्प आहे म्हणून मी या अर्थसंकल्पाचे मनापासून स्वागत करते. विरोधाला विरोध म्हणून या अर्थसंकल्पाकडे न पाहता सर्वांनी त्यातील सकारात्मक बाबी लक्षात घेतल्याच पाहिजेत असे मला वाटते. या अर्थसंकल्पामध्ये मराठी चित्रपटांसाठी अर्थसहाय्य हा विषय आहे. कालच या विषयाच्या बाबतीत मा. सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी लक्षवेधी सूचना दिली होती. मला असे सांगावेसे वाटते की, या अर्थसंकल्पामध्ये सर्व मराठी चित्रपट निर्मितीसाठी 20 लाख रुपयांचे अनुदान देण्याची योजना आहे. पूर्वी हे अनुदान 5 लाख व नंतर 15 लाख रुपये होते. मराठी चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने चित्रपट निर्मिती उद्योसाठी सहाय्य केले आहे. 3 लाख रुपये उत्कृष्ट तंत्रनिर्मितीसाठी देण्याचे ठरविण्यात आलेले आहे. राज्याच्या राजधानीत मराठी चित्रपटांना सिनेमागृहे उपलब्ध होत नाहीत. चित्रपटगृहाचे भाडे अव्वाच्या सव्वा आकारण्यातयेते. त्यामुळे शासनाने चित्रपट उद्योगासाठी दिलेल्या सवलती व अर्थसहाय्य यांचा व्हावा तसा उपयोग होत नाही.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

ज्याप्रमाणे नाटकांसाठी रविन्द्र नाटय मंदीर बांधलेले आहे.त्याप्रमाणे मराठी चित्रपट उद्योगाला सहाय्यभूत ठरण्यासाठी शासनाने मुंबई,उपनगरात किंवा नवी मुंबईमध्ये खास मराठी चित्रपटांसाठी सिनेमा थिएटर्स बांधावी.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी या अर्थसंकल्पात महत्वाकांक्षी योजना जाहीर केलेली आहे.ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना त्यांच्या भूखंडावर घर बांधण्यासाठी 40 हजार रुपयापर्यन्त सहाय्य देण्याचे घोषित केले आहे.ही योजना म्हाडा मार्फत राबविण्यात येणार आहे. ही योजना शेवटच्या घटकापर्यन्त पोहोचावी व या योजनेचे लाभ दारिद्रय रेषेखालील सर्व व्यक्तींना व्हावा व कागदपत्रांची पूर्तता करतांना जे निकष लावण्यात आलेले आहेत त्यामध्ये शिथिलता आणावी असे मला वाटते.त्याचबरोबर 40 हजाराचे सहाय्य खूपच कमी आहे त्यात वाढ करावी असे मला सांगावेसे वाटते.सभापती महोदया, राज्यातील आदिवासीसाठी एक हजार कोटी रुपये देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासीसाठी एक हजार कोटी रुपयापेक्षा जादा निधीची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी भागातील कूपोषण व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे, आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करणे, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास, आदिवासी पाडयांना पिण्याचे शुध्द पाणी,बारमाही रस्ते,आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा, नवीन अंगणवाडया, आश्रमशाळा यावर अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे.आदिवासीतील गुणवत्ताधारक दहा विद्यार्थ्यांना दरवर्षी उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठविण्याची योजना सरकारने जाहीर केली आहे याबद्दल सरकारचे मी अभिनंदन करते.आदिवासी भागातील 586 पाडे व गावे बारमाही रस्त्याने जोडणे, 923 गावांना पिण्याचे शुध्द आणि पुरेसे पाणी देणे, आदिवासी मुलांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, मुलांचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी आश्रमशाळा व वसतिगृहे स्थापन करणे, कुपोषण ,बालमृत्यू, अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे, वैयक्तिक आरोग्य व पर्यावरण विषयक स्वच्छता या योजनासाठी भरीव तरतूद केली आहे. तसेच आदिवासी मुलांना शाळेत जाण्यासाठी 30 कोटीची भरीव प्रोत्साहन भत्ता जाहीर केल्यामुळे मी शासनाने अभिनंदन करते. परंतु जोपर्यन्त आपण आदिवासी भागातील तरुणांना आणि आदिवासी बंधूना रोजगाराची सुविधा

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करुन देत नाही तोपर्यन्त दारिद्रय व कुपोषण दूर होणार नाही याची शासनाने नोंद घ्यावी असे मला वाटते.सभापती महोदया, या अर्थसंकल्पात मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. घर खरेदीसाठी एक लाख रुपयापर्यन्तच्या गृहकर्जावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे तसेच दहा लाख रुपयापर्यन्त मुद्रांक शुल्क 50 टक्यांनी कमी होणार आहे.शैक्षणिक कर्जावरील मुदांक शुल्क माफ केले आहे. मुबई हे देशातील वित्तीय व भांडवली बाजाराचे केन्द्र आहे.याबद्दल मी शासनाला एक सूचना करु इच्छिते.मुंबई सारख्या मोठया शहरांमध्ये झोपडीची किंमत एक दोन लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे घर खरेदी मुद्रांक शुल्काची एक लाख रुपयाची मर्यादा दोन लाख किंवा तीन लाख करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहें. आरोग्य विषयक जीवनदायी योजना,कुटूंबकल्याण कार्यक्रम ,सावित्रीबाई फुले कल्याण योजना इत्यादी योजना शासनाने कायम ठेवून शासनाने राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना जी 2003-4 मध्ये चालू करण्यात आली होती ती योजनासुध्दा चालू ठेवून त्यासाठी 7 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मधाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि काल सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. जितेन्द्र आव्हाड यांनी या योजनेबाबत बोलतांना सांगितले की, सात कोटी रुपयांची तरतूद अतिशय कमी आहे.एखादे ऑपरेशन जरी करावयाचे असले तरी त्यापूर्वी ज्या निरनिराळया टेस्ट कराव्या लागतात त्यासाठी 50 हजार रुपये खर्च होत असतो तेव्हा शासन ही योजना राबवत आहे त्यासाठी पुरेसा निधी नाही तेव्हा हा निधी वाढवून द्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

अध्यक्ष महाराज, या वर्षी नव्याने 2838 नवीन अंगणवाड्यांना मान्यता देण्यात आली आहे आणि त्यासाठी 33.76 कोटी रुपये देण्यात आले आहेत. या अंगणवाड्यांमध्ये काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना त्यांचे मानधन वाढवून उच्च प्रतीचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. त्या प्रशिक्षणामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन या मुख्य विषयाचाही समावेश केला गेला पाहिजे. अध्यक्ष महाराज, आदिवासी भागात कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे काम मी प्रत्यक्ष तेथे जाऊन पाहिले आहे, पाहणी केली आहे. त्यावेळी माझ्या असे लक्षात आले आहे की, त्यांना आरोग्य, शिक्षण, अंधश्रद्धा, कुटुंब नियंत्रण आदी बाबींचे जास्त ज्ञान नसते. खरे तर या अंगणवाडी सेविकाच आदिवासी भागामध्ये जास्त काम करीत असतात. जेव्हा तेथील मुले आजारी पडतात तेव्हा त्या मुलांना दवाखान्यामध्ये त्या घेऊन जातात. वास्तविक अंधश्रद्धांमुळे किंवा इतरही अन्य कारणांमुळे आदिवासी मातापिता आपल्या मुलांना दवाखान्यामध्ये नेण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे अंगणवाडी सेविका त्या ठिकाणी अतिशय चांगले काम करीत आहेत. तेव्हा या अंगणवाडी सेविकांना मी आता उल्लेख केल्याप्रमाणे आरोग्य, शिक्षण, अंधश्रद्धा, कुटुंब नियंत्रण इ. विषयीचे जास्तीत जास्त ज्ञान करून दिले पाहिजे त्यादृष्टीने त्यांना प्रशिक्षण दिले गेले, ज्ञान असले तर ते या दृष्टीने अधिक चांगले काम तेथे करू शकतील. तेव्हा त्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षित करून त्यांच्या मानधनामध्ये देखील भरीव वाढ करून देऊन त्यांना पूर्णपणे सेवेत सामावून घेतले गेले पाहिजे अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. अध्यक्ष महाराज, मुंबई-पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांच्या गैरसोयी दूर करण्याकरिता शासनाने या मोठ्या शहरांमध्ये अल्पदरामध्ये पाळणाघरे उपलब्ध करून दिली पाहिजेत. मुंबईतील नोकरी करणाऱ्या ज्या आमच्या भगिनी आहेत त्यांची रोजची तारेवरची कसरत आम्ही पाहतो. सकाळी लवकर उठून डबा वगैरे करून, नवरा-मुलांचे सर्व आटोपून देऊन त्यांना ट्रेन पकडावयाची असते. आपल्याला माहितीच आहे की, ट्रेन मधून जाणाऱ्या या महिलांची आज काय परिस्थिती आहे. मागे मी या संदर्भात आवाजही उठविला होता की, आपली जी मुख्य रेल्वे स्टेशन्स आहेत, उदा. पुणे, मुंबई, कल्याण, डोंबिवली अशी जी मोठमोठी शहरे आहेत अशा ठिकाणी रेल्वे स्टेशनजवळ शासनाने पाळणाघरे उपलब्ध करून दिली तर... कारण नोकरी करणाऱ्या सर्वच महिलांचे काही इतके उत्पन्न असत नाही की त्या खाजगी पाळणाघरांचे सेवा उपलब्ध करून घेऊ शकतील., म्हणून मी या निमित्ताने शासनाला विनंती करते

..... 2झेड 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, या महिलांची ही मोठी गैरसोय दूर करण्यासाठी रेल्वे स्टेशनजवळ..जसे युती सरकारने इ ुणका भाकर केंद्रांची योजना सुरू केली त्या धर्तीवर पाळणाघरे उपलब्ध करून दिली त्यामुळे महिलांनाही दिलासा मिळू शकेल असे मला वाटते. त्याचबरोबर अध्यक्ष महाराज, राज्यातील एसटी स्टँडस्, रेल्वे स्टेशन, विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये येथील उपहारगृहांचे वाटप करताना 50 टक्के वाटप महिलांसाठी राखीव ठेवण्यात यावे. या पन्नास टक्क्यांचे वाटप करताना महिलांच्या उन्नतीसाठी स्थापन झालेल्या सेवाभावी संस्था आणि गरजू महिलांचा विचार केला जावा. अध्यक्ष महाराज, मुंबई शहर - राज्यालाच नव्हे तर देशाला मोठा महसूल देणाऱ्या मुंबईला केंद्र सरकारकडून तसेच राज्याकडूनही भरीव मदत देण्यात येणार आहे. केंद्र सरकार पाठोपाठ ती राज्य सरकारचीही लाडकी झाली आहे. अर्थसंकल्पामध्ये मुंबईसाठी 1000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईसाठी पाच महिन्यात साडेतीन लाख झोपडपट्टीवासियांना घरे, दोन वर्षात नवीन 101 उपनगरी गाड्या, 432 कि.मी.चे रस्ते,41 उड्डाणपूल, 66 भुयारी मार्ग, गोराईचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास, पूर्व पश्चिम किनाऱ्यावर जलवाहतुकीच्या योजना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यात येणार आहे. शासनाने शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पैसा कमी पडू देता कामा नये याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच लवकरात लवकर स्मारकाचे काम पूर्ण केले पाहिजे.

स्वामिनी प्रकल्प - पणन व्यवस्थापन शास्त्रांच्या तत्त्वांचा अंगिकार करून बचत गटांच्या उत्पादनांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ मिळवून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य भाग आहे. राज्यातील बचत गटांनी तयार केलेल्या पदार्थांना चांगल्या दर्जाचे वेष्टन, बाजारपेठ यासाठी शासनाने पाच कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. पण मघाशी या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी सांगितले की, आदिवासी महिलांचे जे बचत गट आहेत त्यासाठी आपण 1.38 कोटीची तरतूद केली आहे आज आपल्याला त्या महिलांना खऱ्या अर्थाने जर सक्षम करावयाचे असेल तर या तरतुदीमध्ये वाढ केली पाहिजे. कारण आज आपण एकीकडे सांगतो की, आम्ही महिलांचे सक्षमीकरण करतो आहोत, त्यांना 33 टक्के आरक्षण देतो आहोत, तर या ज्या आमच्या आदिवासी महिला भगिनी आहेत त्यांच्यासाठीसुद्धा यामध्ये जास्तीत जास्त तरतूद केली पाहिजे. ..

(यानंतर श्री.जागडे ....3ए 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

आज ग्रामीण आणि शहरी भागात महिला बचतगट सुरु झाले आहेत. त्या बचतगटांना प्रोत्साहन देण्यासाठी व स्वतंत्र बचतगटांचे महत्व पटविण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या धर्तीवर बचतगट अभियान सुरु करुन त्यात सहभागी होणा-या उत्कृष्ट बचतगटांना पारितोषिक देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे. त्याशिवाय राज्यात बचतगटाच्या ज्या काही पतसंस्था निर्माण झालेल्या आहेत त्यांना सुध्दा शासनाने अर्थसहाय्य देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे. काही महिलांनी अतिशय मेहनत घेऊन बचतगटाच्या पतसंस्था निर्माण केल्या आहेत. ग्रामीण भागातील महिलाना कसे पटवावे लागते, हे माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांना याची कल्पना आहे. ग्रामीण भागातील महिलांना एकत्र करुन त्यांच्या बचतगटाच्या पतसंस्था निर्माण झाल्या आहेत, त्यांना शासनाने प्रोत्साहन देण्याची गरज आहे, मदत करण्याची गरज आहे. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी बचतगट हे प्रभावी माध्यम असल्याने शासनाने या बचतगट योजनेकडे गांभिर्याने पाहावे, असे मला वाटते. राज्यातील महिलांच्या बचत गटांच्या माध्यमातून उत्पादीत झालेल्या मालाला योग्य ती बाजारपेठ मिळावी म्हणून प्रत्येक जिल्हा या उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी एक शासकीय विक्री केंद्र स्थापन करण्यात यावे, असे मला वाटते. सभापती महोदया, या ठिकाणी नुसतीच आर्थिक मदत देऊन चालणार नाही, तर महिलांचे हे बचत गट सक्षम झाले पाहिजेत.

सभापती महोदया, राज्यात प्रथमच मुल्यवर्धीत करप्रणाली लागू झाली असून तंबाखू, साखर व रॉकेल वगळता इतर सर्व वस्तूंना साडेबारा टक्के या एकाच प्रणालीत दर लागणार आहे. अप्रत्यक्ष दराचे उच्च दर, कराची असमानता आणि कर वसूलीची अकार्यक्षम व्यवस्था या सारख्या मोठ्या अडचणी पूर्वीच्या करप्रणालीत होत्या. परंतु या नव्या करप्रणालीमुळे या अडचणी दूर झाल्या असून राज्याची अर्थव्यवस्था यामुळे भक्कम होणार आहे. राज्याने 200 पेक्षा अधिक वस्तूंवर एक समान विक्रीकर लागू केला आहे. 1999-2000 साली वेतन खर्च 81 टक्के होता. गेल्या पाच वर्षात तो 70 टक्क्यांवर आणण्यात आला आणि चालू वर्षी तो 60 टक्क्यावर आणण्यात येणार आहे. यावरुन राज्यकोषीय तुटीचे प्रमाण कमी होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

सभापती महोदय, राज्याला समृध्दीच्या वाटेवर नेण्याची तसेच सर्व क्षेत्रातील राज्याची आघाडी कायम राखण्याची क्षमता या अर्थसंकल्पात आहे. परंतु या अर्थसंकल्पात राज्यात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यात स्थानिकांना तसेच भूमीपुत्राना राखीव जागा ठेवल्याचा उल्लेख नाही. शिक्षणाच्या सुविधा वाढल्या, त्यामुळे अनेक तरुण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

पदव्या तसेच पदविका घेऊन बाहेर पडले आहेत. परंतु ते आज रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. शासनाने त्यांच्यासाठीही काही करणे आवश्यक आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, नोक-यांत तसेच स्थानिकांना प्राधान्य द्यावे किंवा राखीव प्रमाण ठेवावे. राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनात आमुलाग्र बदल करण्याचा सरकारच्या प्रयत्नांना यश मिळाले म्हणून 1994-95 नंतर प्रथमच महसूल उत्पन्न 265 कोटी रुपयांनी शिलकी झाले आहे. राज्याच्या 11 कोटी रुपयांच्या वार्षिक योजनेसाठी लागणा-या साधनसामुग्रीची पूर्ण तरतूद या अर्थसंकल्पात आहे. म्हणून शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करुन मी माझे दोन शब्द संपविते.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सभागृहामध्ये अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर बोलण्याची एक पध्दत असते म्हणून केवळ मी बोलतो. हा एक औपचारिकपणा आहे. याचे कारण म्हणजे माझ्या बोलण्याची, माझ्या भाषणाची, मी याठिकाणी जे बोलतो आहे त्याची कुणी गंभीरपणे दखल घेत नाही. हा माझा गेल्या काही वर्षापासून आतापर्यंतचा अनुभव आहे. हा अर्थसंकल्प खूप मोठा आहे. मात्र तो वाचल्यानंतर मला राहून राहून माननीय श्री. वसंतदादांची आठवण येते. याच सभागृहामध्ये माननीय श्री. वसंतदादा हे मुख्यमंत्री होते. ज्या वेळेला मुंबईचा लचका तोडण्यासाठी जुनी गिधाडे आभाळामध्ये पुन्हा घिरट्या घालायला लागली त्या वेळेला दादांनी चाबूक उगारला आणि सांगितले की, "याद राखा, मुंबईकडे कुणी वाकडया नजरेने पाहील त्याला मी क्षमा करणार नाही" आणि मग मुंबई वाचली. त्सुनामीसारख्या लाटा पुन्हा पुन्हा मुंबईवर येत आहेत. या अर्थसंकल्पामध्ये मुंबईचे खूप कौतुक करण्यात आले आहे. मुंबईला खूप काही दिलेले आहे. मुंबईचा बराच उल्लेख केला आहे. मुंबईला कमीत कमी 1 हजार कोटी रुपये देणार, तो निधी नंतर कमी पडू देणार नाही. यामध्ये असे म्हटले आहे, "मुंबईचे महत्व ओळखून केंद्र शासनाने प्रथमच मुंबईच्या विकासासाठी ठोस मदत करण्याचे जाहीर केले आहे". प्रथमच असे काय घडले की, मुंबईसाठी भरपूर मदत आम्हाला केंद्र सरकार करणार आहे? अर्थ समजण्यासारखा आहे. ज्यावेळी एखाद्या वस्तीमध्ये किंवा चाळीमध्ये एखाद्या मुलीचे तिचे शेजारी खूप कौतुक करतात, त्या मागची नजर काही चांगली असते असे काही नाही. त्यामुळे मुंबईचे हे काही लाड झाले आहेत त्या मागे हेतू एकच आहे की, आतापर्यंत मुंबई स्वतंत्र करण्याचे जे जे प्रयत्न आम्ही हाणून पाडले तो प्रयत्न एका वेगळया पध्दतीने या ठिकाणी होत आहे. मुंबईचा दर्जा वाढवायचा, मुंबई हे वेगळे शहर करायचे, मुंबईचे महाराष्ट्राशी असलेले नाते तोडून टाकायचे, महाराष्ट्राला मुंबईशी असणारा आपलेपणा नष्ट करुन टाकायचा आणि आपोआप हे शहर अलग करुन केंद्राने आपल्या ताब्यात घ्यायचे हा पध्दतशीर प्रयत्न पुन्हा सुरु झालेला आहे. आताच नाहीतर गेल्या दोन-चार वर्षापासून हा प्रकार सुरु झालेला आहे. दिल्लीच्या अर्थमंत्र्यांनी जाहीर करुन टाकले की, मुंबई आम्ही वर्ल्ड ट्रेड सेंटर बनवायला मागत आहोत. वर्ल्ड ट्रेड सेंटर ऐकायला बरे वाटते. त्या वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये आपले आणि माझे स्थान काय रहाणार आहे? त्यावेळी महाराष्ट्राचे माजी राज्यपाल माननीय श्री. अलेक्झांडर यांनी लगेच सांगून टाकले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

की, मुंबई हे वर्ल्ड ट्रेड सेंटर झाल्याबरोबर त्या ठिकाणी निवासी जागा रहाणार नाहीत. फक्त धंदेवाईक जागा त्या ठिकाणी रहातील. हे एक स्वप्न आहे त्यांना ते प्रत्यक्षात उतरावयाचे आहे. त्यासाठी हा सर्व प्रयत्न चालला आहे. या ठिकाणी आपण सर्वांनी या सगळया भूल थापांना भुलण्याऐवजी आपण सगळयांनी एक झाले पाहिजे. माझी खात्री आहे की, आपल्यापैकी कुणालाही मुंबई शहर हे अलग करुन नको आहे. पण सतत तोच प्रयत्न चालला आहे. आपण रागावणार नसाल तर सांगतो की, गेल्या काही वर्षामध्ये आपल्या अध्यक्षा श्रीमती सोनियाजी यांनी पुढाकार घेतला आहे. सोनियाजींना देखील मुंबई स्वतंत्र हवी आहे. राजीव गांधीना देखील मुंबई अलग हवी होती. मुंबईवर राजीव गांधींचे प्रेम कशासाठी होते हे कदाचित आपल्याला माहीत नसेल. राजीव गांधींचा जन्म देखील मुंबईतच झालेला आहे. या सगळया गोष्टी ओघा ओघाने जरी असल्या तरी प्रत्येक पाऊल हे मुंबई स्वतंत्र करण्याच्या दिशेने पडत आहे. औद्योगिक नगरी करायची आणि ती महाराष्ट्रापासून अलग करायची. हा प्रकार आता सुरु झाला आहे, हळू हळू तो घडत आहे. सगळीकडे पूल होत आहेत...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय श्रीमती सोनियाजी गांधी या सदनाच्या सभासद नसल्यामुळे त्यांना या ठिकाणी खुलासा करता येणार नाही. त्यांच्यावर एकप्रकारे हा अन्याय होत असल्यामुळे त्यांच्या नावाचा उल्लेख करुन जे आरोप करण्यात आले आहेत ते कामकाजातून वगळण्यात यावेत अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदया, जे घडत आहे ते मी बोलत आहे. मी गेल्या आठवडयात बोललो होतो. या देशाचा कारभार श्रीमती सोनिया गांधी चालवीत आहेत, आपण कुठे चालविता? आपण 1995 पर्यंतच्या झोपडपट्टया ठरविल्या? तर मग 2000 सालापर्यंत कसे काय गेले? दोन्ही सभागृहांनी ठरविले होते...

तालिका सभापती (श्रीमती सुधा भावे) : माननीय सदस्य श्री. नवलकर साहेब या सभागृहामध्ये ज्या व्यक्ती सभासद नाहीत त्यांचे नाव घेऊन सभागृहात काही म्हटल्यानंतर त्यांना त्याचा खुलासा करता येणार नाही...

श्री. प्रमोद नवलकर : तर मग माननीय श्री. शरद पवार हे देखील सभागृहात नाहीत, माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग देखील सभागृहात नाहीत. या सभागृहाशी संबंधित असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर....

लोकसभेत ते बसलेले आहेत. अगदीच काय ते त्रयस्थ नाहीत. आणि घटनाक्रम असा आह की, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी 1995 च्या झोपडपट्टया अधिकृत ठरविल्या...

तालिका सभापती : तो हेत्वारोप होऊ शकतो...

श्री. प्रमोद नवलकर : हा हेत्वारोप नाही. मी घटनाक्रम आपल्याला सांगतो. या दोन्ही सभागृहांनी 1995 पर्यंतच्या झोपडपट्टयांना संरक्षण देण्याचे ठरविले.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर . . . .

पंतप्रधानांनी देखील त्यावर शिक्कामोर्तब केले. त्यासंबंधात कारवाई देखील सुरु झाली आणि जवळजवळ 60 हजार झोपडया सुध्दा पाडण्यात आल्या. मग कोणीतरी तीन-चार झोपडी दादा दिल्लीला जातात, सोनिया गांधींना भेटतात.. . . .

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, हे अत्यंत चुकीचे आहे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये लपविण्यासारखे काय आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, श्रीमती सोनिया गांधी यांनी कुठेही असे म्हटलेले नाही . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलत असतात.)

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, या सर्व जाहीर गोष्टी आहेत. यामध्ये लपविण्यासारखे काही नाही. ही वस्तुस्थिती आहे. सगळीकडे प्रसिध्द झालेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलत असतात.)

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, सोनिया गांधी यांनी असे केव्हा म्हटले ? आपण काहीही बोलणार आणि आम्ही ऐकून घेणार का ?

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, त्या काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आहेत, तेव्हा त्यांचे नाव घ्यावेच लागणार आहे. त्यांचे काही अधिकार आहेत . . . .

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकरसाहेब, यांनी याठिकाणी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्यावर थेट काही आक्षेप घेतलेले आहेत. 1995 च्या झोपडयांना 2000 पर्यंत मान्यता देण्याचे काम सोनिया गांधी यांच्या दबावाखाली केले असा त्यांचा याठिकाणी बोलण्याचा हेतू आहे. दोन्ही काँग्रेस म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष, आम्ही आमच्या जाहीरनाम्यामध्ये दि.1-1-1995 च्या झोपडपट्टयांना मान्यता देऊन, त्यांना सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत असे म्हटले होते आणि 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना सुविधा देण्याचा कार्यक्रम आम्ही निवडणुकीच्या अगोदर लोकांसमोर जाऊन जाहीर केला होता.मुंबई शहरात मोठया प्रमाणात झोपडया तोडण्याचे काम सुरु झाले, तेव्हा पहिल्या प्रथम माननीय कृषी मंत्री आणि राष्ट्रवादी

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री.शरद पवारसाहेब यांनी सांगितले होते की,झोपडपट्टया तोडत असताना हयुमन टोन असला पाहिजे. तुम्ही बुलडोझर घेऊन त्या झोपडया तोडणार असाल तर त्याला त्यांनी आक्षेप घेतला होता. तेव्हा श्रीमती सोनिया गांधी यांच्या दडपणाखाली हे सर्व जाहीर झालेले आहे . . . .

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, जर जाहीरनाम्यामध्ये लिहीले होते, तर 1995 नंतरच्या 16 हजार झोपडया का पाडल्या ? तुम्हाला जाहीरनाम्याची आता आठवण झाली. 1995 नंतरच्या झोपडपट्टया पाडल्या, तेव्हा तुमचा जाहीरनामा कुठे होता ? 1995-2000 . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

डॉ.सुनील देशमुख : 1995 नंतरच्या झोपडपट्टयांना . . . ..

श्री.विलास अवचट : सभापती महोदया, आपण सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांना बोलण्यासाठी परवानगी दिली आहे. आता माननीय मंत्री महोदय बोलू शकणार नाहीत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, मला या सभागृहाचे नियम माहिती आहेत. या सभागृहामध्ये हजर नसलेल्या लोकांची नावे घेऊ नयेत हेही मला माहिती आहे, पण कोणत्या संदर्भात ? आता कै.वसंतदादा पाटील यांचे नाव घेतले, माननीय श्री.शरद पवार यांचे नाव घेतले तर . . . .पण श्रीमती सोनिया गांधी या देशातील सामान्य व्यक्ती नाहीत. त्या सत्ताधारी पक्षाच्या अध्यक्षा आहेत. त्यांना मोठे अधिकार आहेत. त्यामुळे ज्यावेळेला निर्णय घेतले जातात, तेव्हा त्या निर्णयामध्ये त्यांच्या अधिकारामुळे त्यांचा फार मोठा सहभाग असतो ही वस्तुस्थिती आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आपण वस्तुस्थिती मांडत आहात, पण त्याचा कदाचित चुकीचा अर्थ लावला जाईल.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, यासाठी सांगू इच्छितो की, ...

डॉ.सुनील देशमुख : ही वस्तुस्थिती नाही. आमचा याला आक्षेप आहे. सन्माननीय सदस्य . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .3 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आपल्या बोलण्याचा चुकीचा अर्थ लावला जाऊ नये असे माझे म्हणणे आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदया, 1995 नंतरच्या झोपडपट्टया आपण पाडल्या आहेत की नाही ?

तालिका सभापती : त्या संदर्भात सुध्दा खुलासा केला गेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, हे चुकीचे आहे.

एक सन्माननीय सदस्य : मग त्यांना भेटावयास कशासाठी गेला होतात ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..(अडथळा)...

(एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतात.)

तालिका सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.... सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

...(अडथळा)....

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मंत्री महोदय आपण कृपया खाली बसावे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे, बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.मधुकर चव्हाण : माझाही हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती : मी आपल्याला नंतर बोलायला देते. पहिल्यांदा सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांचा हरकतीचा मुद्दा आहे तो त्यांनी मांडावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदया, मी पहिल्यांदाच सांगितले. सभागृहामध्ये या व्यक्ती सदस्य नसल्यामुळे त्या व्यक्तींच्या नावाचा उल्लेख येथे उल्लेख करु नये. हा नियम ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नवलकर साहेबांना मान्यच आहे. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना संरक्षण देण्याबाबत कायदा अस्तित्वात आहे. याबाबत वारंवार मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. जाहीरनाम्यामध्ये जो उल्लेख केलेला होता त्यापुढचा विचार केला जाईल, पण आम्ही डिसेंबर 1995 च्या झोपड्यांना संरक्षण देण्यास बांधिल आहोत, त्या पुढच्या झोपड्यांच्या संबंधात विधिमंडळामध्ये याबाबत सर्वानुमते विचार होईल, असे वारंवार मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

(मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकर बोलण्यासाठी उभे रहातात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा पूर्ण होऊ द्यावा.

श्री.उल्हास पवार : अशाप्रकारे वारंवार मा.मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. दुसरे असे की, शेवटी महानगरपालिकेच्या अखत्यारिमध्ये झोपड्या पाडणे, त्यांचे पुनर्वसन करणे या बाबी येतात. यासाठी पोलिसांचे संरक्षण देणे, हे शासनाचे काम आहे. तेवढे काम शासनाने केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

श्री.उल्हास पवार (पुढे चालू....

त्यामुळे सरकारने झोपड्या पाडल्या असे सतत जे बोलले जात आहे, ते बरोबर नाही. ही सर्व कारवाई महापालिकेने केलेली आहे.

..(अडथळा)...

डॉ.सुनील देशमुख : मुंबई महानगरपालिका ही कोणाच्या ताब्यात आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

तालिका सभापती : झोपडपट्यांच्याबाबत येथे स्पष्टीकरण केले गेलेले आहे. वारंवार मा.मुख्यमंत्र्यांनीदेखील स्पष्टीकरण केलेले आहे. त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो मा.श्रीमती सोनिया गांधींजींचा उल्लेख केलेला आहे, त्याचा विपरीत अर्थ होत असेल तर तो उल्लेख कामकाजातून काढून टाकला जाईल.

..(अडथळा)...

श्री.प्रमोद नवलकर : हे सभागृह आणि देशाचे सभागृह हे कारभारामध्ये एक आहे. दिल्लीच्या सभागृहातील कोणत्याही व्यक्ती असतील ते या सभागृहाचे सदस्य नाहीत म्हणून त्यांचे नाव घ्यायचे नाही असा निर्णय असेल तर मग आपल्याला पंतप्रधानांचे नाव घेता येणार नाही, श्री.अलेक्झेंडर यांचेही नाव आपल्याला घेता येणार नाही. अशी आमच्यावर बधने कधी येत नव्हती. ती संबंधित व्यक्ती आहे. ती थर्ड पार्टी नाही.

तालिका सभापती : त्यांना उद्देशून आपण जे सांगितले, त्यामधील अर्थ विपरीत होणार असेल तर तो उल्लेख रेकॉर्डमधून काढला जाईल.

. .. (अडथळा)....

(एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलत असतात.)

तालिका सभापती : मी या संबंधाने माझे रुलिंग दिलेले आहे. कृपया आपण सगळयांनी खाली बसावे.

श्री.मधुकर सरपातदार : आमच्यावर तो अन्याय आहे.

तालिका सभापती : त्याचा अर्थ विपरीत होणार असेल तर ते म्हणणे तपासून घेऊन रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येईल.

श्री.चंद्रकांत हांडोरे : दुसरे सन्माननीय सदस्यांनी स्लम लॉर्ड भेटले असे सांगितले, तेही बरोबर नाही. आम्ही, मा.श्री.गुरुदास कामत हे भेटले होते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

तालिका सभापती : दबाव, भेटणे जे काही सांगितले गेलेले आहे, ते तपासून घेतले जाईल. सन्माननीय सदन्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..(अडथळा)....

श्री.प्रमोद नवलकर : दाऊदचे नाव घेतले नाही...

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण यांचा हरकतीचा मुद्दा आहे, तो त्यांनी सांगावा. सन्माननीय सदस्य श्री.नवलकर साहेब, आपण कृपया खाली बसावे.

यानंतर कु.थोरात.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आता याठिकाणी असे संगितले की, श्रीमती सोनिया गांधींचा कुठल्याही प्रकारचा दबाव त्यांच्यावर आलेला नाही. सभापती महोदया वास्तविक पाहता श्री. नवलकर यांनी या ठिकाणी श्रीमती सोनिया गांधींच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा गैर उल्लेख केला, चुकीचा अरोप केला असे नाही. मुंबई शहरात हजारो बॅनर्स असे लागले होते की, मुंबई शहरातील 2000 सालच्या झोपडपट्टीवासियांना संरक्षण दिल्या बद्दल श्रीमती सोनिया गांधी यांचे हार्दिक अभिनंदन. हे बोर्ड कशासाठी लागले होते? दुसरा प्रश्न असा की, दुस-या दिवशी ज्यावेळेला माननीय सोनिया गांधींना भेटायला दोनचार जण गेले असतांना त्याठिकाणी त्यांची भेट झाली नाही. त्याठिकाणी माननीय मार्गारेट अल्वा होत्या त्यांच्याशी त्यांचे बोलणे झाले. त्याठिकाणी श्री. कृपाशंकर सिंह हेही होते. हे सर्व वर्तमानपत्रात आलेले आहे. त्यांच्यानंतर येथे आल्यानंतर आदेश बदलला गेला, हे तुम्ही मान्य कराल काय? बॅनर कशाला लावले?अभिनंदनाचे बॅनर कां लावले होते?

कर्नल सुधीर सावंत :सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. मधुकर चव्हाण : माझ्या हरकतीच्या मुद्यावर तुम्हाला बोलता येणार नाही. माझा हरकतीचा मुद्दा अजून संपलेला नाही. या सभागृहात श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी माननीय पंतप्रधानांचे नांव घेतले, माननीय शरद पवारांचे नांव घेतले. अर्थमंत्र्यांचे नांव घेतले. त्यावेळेला ते उल्लेख कसे करता येतात? फुले आंबेडकरांचे नांव घेतले ते कांय या सभागृहात होते काय? (अडथळा) चांगल्या अर्थाने नांव घेतलेले आहे. वाईट अर्थाने नाव अजिबात घेतलेले नाही.

तालिका सभापती : मी या ठिकाणी फक्त नावाच्या उल्लेखाच्या संदर्भात निर्णय दिलेला नाही.

श्री. मधुकर चव्हाण : मग झोपडपट्टया तोडण्याचे काम कोणाच्या आदेशामुळे थांबले?

(काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

तालिका सभापती :श्री. नवलकर साहेब केवळ नावांच्या उल्लेखाच्या संदर्भात मी निर्णय दिलेला नाही. आपल्या बोलण्याचा अर्थ जर हेत्वारोपासारखा होत असेल तर तो उल्लेख रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येईल हे माझे रुलिंग आहे. आपण आपले भाषण पुढे सुरु करावे.

कर्नल सुधीर सावंत :सभापती महोदया, आपण रुलिंग दिल्या नंतर त्याच्यावर हरकतीचा मुद्दा मांडण्यात आला त्याला माझी हरकत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आपल्याला हरकतीचा मुद्दा विचारावयाचा आहे काय?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी सुध्दा या आधी हरकतीचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितली होती. आपण मला परवानगी दिलेली नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.सुधीर सावंत यांना देखील हरकतीचा मुद्दा मांडता येणार नाही.

तालिका सभापती :सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी रुलिंग दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नवलकर यांच्या बोलण्याचा अर्थ हेत्वारोपासारखा होत असेल तर आपण तो उल्लेख रेकॉर्डमधून काढून टाकणार आहोत.

(काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभापतींनी रुलिंग दिल्यानंतर त्याच्यावर हरकतीचा मुद्दा मांडण्यात आला त्याला माझी हरकत आहे. म्हणून तो मुद्दा ही रेकॉर्डवरुन काढण्यात यावा.

तालिका सभापती : ठीक आहे. श्री. नवलकरसाहेब आपण आपले भाषण सुरु करावे.

श्री. प्रमोद नवलकर :अध्यक्ष महोदय, म्हणून मी श्रीमती सोनियाजींचे अभिनंदन करतो. (अडथळा) कशा बद्दल म्हणजे त्यांनी आम्हाला येथे बोलायला संधी दिली. सरकारवर टीका करायला सोनियाजींनी आम्हाला जी संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे अभिंनदन करतो. यापूर्वी देखील आम्ही त्यांचे अभिनंदन केलेले आहे, तेव्हा कुणी आक्षेप घेतला नाही. ठीक आहे. हे रेकॉर्डवर घ्या. श्रीमती सोनिया गांधीनी 1995 नंतर 2000 साला पर्यंतच्या झोपडयांना देखील दयात्मक बुध्दीने संरक्षण दिले, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. झोपडयावरुन बुल्डोझर फिरवायची शासनाची जी प्रक्रिया होती ती देखील एकाएकी, दिल्लीच्या एकावारीमध्ये थांबली, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. पण पुढे काय? (अडथळा) हा अर्थसंकल्पाचाच भाग आहे. तुम्ही येथे नव्हतात. मुंबईला तुम्ही एवढे मोठे दिलेत नां त्याबद्दल मी बोलतो.त्यानंतर सुध्दा आपण श्रीमती सोनिया गाधींच्या मार्गदर्शनाखाली शिस्तीने राज्यकारभार करीत आहात.त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. आता यामध्ये काही हेत्वारोप नाही ना? मग पुढे चला. सभापती महोदया, या सगळया गोष्टीला जी दुर्गंधी येते, त्याबद्दल मी मघाशी संगितले की, चाळीमधील एखाद्या मुलीवर कोणी एखादा जास्तीचे प्रेम करायला लागला, भेटवस्तू आणायला लागला, साडी द्यायला लागला तर मग तो हळूहळू त्या मुलीला घेऊन निघूनच जातो आणि तिच्याशी लग्न करतो.

यानंतर श्री. बरवड ....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर .....

या मुंबईवर जी नजर आहे ती अतिशय वाईट नजर आहे, ती अतिशय विकृत अशी नजर आहे. मी काय म्हणतो ते लक्षात घ्यावे. हा फक्त आमच्या पक्षाचा प्रश्न नाही. ज्या मार्गाने या मुंबईचे सतत राजकारण चाललेले आहे, मी आता मराठी, बिगरमराठी हा विषय या ठिकाणी काढत नाही. पण मुंबई वर्ल्ड ट्रेड सेंटर होणार आणि त्या ठिकाणी निवासी जागा राहणार नाही हे विधान ज्यावेळी केले गेले त्याचवेळी तुम्ही दादांसारखे बंड करुन उभे राहावयास पाहिजे होते. कोणी उभे राहिले नाही. मुंबईचे कौतुक करतात की, मुंबई हे औद्योगिक शहर होणार. या मुंबई शहरासाठी एक हजार कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्राने पण सांगितले की, तुम्हाला पाहिजे तेवढे पैसे मिळतील. हे कोणासाठी आणि कशासाठी ? मुंबईला तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये कशासाठी नेऊन ठेवले ? मुंबई ही इतकी उग्र, इतकी विद्रूप नगरी आहे की, ब्युटी पार्लरमध्ये नेऊन सुध्दा ती आता सुधारणार नाही, सुंदर होणार नाही. या अर्थसंकल्पात अनेक गोष्टी आहेत. सगळयांचा उल्लेख करणार नाही. उगीच श्रीमती सोनिया गांधींनी आज माझा बराच वेळ घेतला.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यन्त होती. आता सहा वाजून अकरा मिनिटे झालेली आहेत. सभागृहाच्या कामकाजाची वेळ आज किती वाजेपर्यन्त वाढवावयाची हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

काही सन्माननीय सदस्य : कामकाज संपेपर्यन्त सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवावी.

तालिका सभापती : कामकाज संपेपर्यन्त सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यास सगळयांची संमती आहे काय ? आपली संमती असेल त्याप्रमाणे वेळ वाढवू.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी 7.00 वाजेपर्यन्त वेळ वाढवावी अशी विनंती आहे. उद्या आणखी यावर चर्चा होणारच आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, ही चर्चा 7.00 वाजेपर्यन्त चालू ठेवावी. त्यानंतर अर्धा तास चर्चा घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, ही चर्चा 7.00 वाजेपर्यन्त चालू ठेवावी. त्यानंतर अर्धा तास चर्चा घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी उद्या सकाळी 10.30 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त विशेष बैठक घेण्याचे ठरविले आहे. आता माझ्याकडे बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांची जी यादी आहे त्यापैकी अजून 12 सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आज 8.00 वाजेपर्यन्त ही चर्चा करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : उद्या अर्थसंकल्पावरील चर्चेला जो वेळ आहे तो उत्तराच्या भाषणासाठी आहे.

तालिका सभापती : उद्या सकाळी अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी स्पेशल सिटींग आहे. नियमित बैठकीमधील वेळ हा उत्तराच्या भाषणासाठी असेल. आजच्या कामकाजाची वेळ किती वाजेपर्यन्त वाढवावयाची हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चा 7.00 वाजेपर्यन्त होऊ द्यावी. त्यानंतर अर्धा-तास चर्चा घ्यावी.

तालिका सभापती : आज तीन अर्धा-तास चर्चा आहेत. सभागृहाच्या कामकाजाची वेळ 7.30 वाजेपर्यन्त वाढवावी काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चा 7.00 वाजेपर्यन्त चालू ठेवावी. 7.00 ते 7.30 वाजेपर्यन्त तीन अर्धा-तास चर्चा आहेत त्या घ्याव्यात.

तालिका सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 7.30 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदया, मला एवढा वेळ नको.

तालिका सभापती : आता जी बेल वाजेल ती आपण आपले भाषण संपविण्याच्या संदर्भात असेल. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदया, श्रीमती सोनिया गांधी यांचा संदर्भ मागे सारुन मी पुढे जातो. मुंबईच्या संदर्भात ज्या गोष्टी आहेत त्याचा ओझरता उल्लेख मी करणार आहे. सभागृहाचा वेळ फार महत्वाचा आहे. सभापती महोदया, वांद्रे-वरळी या पुलाचे काय आहे हे मला माहीत नाही. आम्ही लहानपणापासून हे ऐकत आहोत. तो पूल आता सन 2007 साली पूर्ण होणार असे सांगितले जात आहे. परंतु तीन वर्षापूर्वी वरळीच्या हमरस्त्यावर त्या रस्त्यावरुन येणाऱ्या गाडया जाण्यासाठी पूल बांधला. त्यावर 18 लाख रुपये खर्च केले. दुसरे म्हणजे पश्चिम किनारी सागरी वाहतूक सुरु करणे हा विषय देखील गेली 20 वर्षे चाललेला आहे. त्या ठिकाणी वाहतूक सुरु झाली आणि कोणतीही वाहतूक फायद्यात झाली नसल्यामुळे सर्व वाहतुकी बंद पडल्या. आता एकही वाहतूक त्या ठिकाणी चालू नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर...

सभापती महोदय, झोपडयांबाबत निर्णय घेण्यात आला आहे तो कसा राबविणार हे माहीत नाही. मी आपल्याला सांगतो की, या झोपडयांचे पुनर्वसन मुंबई शहरामध्ये तुम्ही करणार नाही. हे मुंबई बाहेरचे लोक आहेत. नवी मुंबई आणि पनवेल येथे त्यांचे पुनर्वसन करणार आहे. मुंबई अबाधित ठेवून एक आंतरराष्ट्रीय केंद्र बनविणे हे या सगळयांचे स्वप्न आहे. दुर्दैवाने मा.श्री.शरद पवार यांनीही सांगितले होते की, आपण या नगरीला आंतरराष्ट्रीय केंद्र बनविले पाहिजे आणि त्याच्यातून कॅसिनो वगैरे चालले होते त्याच्यामागे हेतू तोच होता. एकदा मुंबईला आंतराष्ट्रीय महत्व प्राप्त झाल्यानंतर आम्ही राष्ट्रीय माणसे कोठे जाणार हे समजण्यासाठी मार्ग नाही. त्यामुळे आजच आपल्याला विरोध केला नाही किंवा सावधपणे जे दिले जाते ते स्वीकारले नाही तर फार अवघड होणार आहे. सभापती महोदया, मुंबई ही बदनाम नगरी आहे. केवळ विद्रुप नाही तर बदनाम आहे. आता हल्ली चालू आहे त्याला काय म्हणतात ते मला माहीत नाही, काही ठिकाणी छुपे कॅमेरे लावले जात आहेत. सध्या सगळे मंत्री देखील घाबरुन आहेत. बंगल्यात गेल्याबरोबर सगळया खोल्यांत फिरतात आणि कोठे कॅमेरा आहे का ते बघतात ? देखरेख करण्यासाठी आपण खास पोलीस आणि सीआयडी ठेवलेले आहेत असे मला कोणीतरी सांगितले. मग बंगल्यामध्ये छुपा कॅमेरा नसेल तरच आरामात तिकडे जातात. त्यांच्या ॲण्टी चेंबरमध्ये कॅमेरे बसविले आहेत असे कोणी तरी बोलले हे मला माहीत नाही. पण त्या कॅमे-यांची धास्ती घेतली आहे. ही दिल्लीची माणसे मुंबईची निवड का करतात ? या असल्या घाणेरडया विकृत गोष्टी करण्यासाठी मुंबईची निवड केली जाते हे बरे नाही. मुंबईचा इतिहास काय सांगतो ? मुंबईची प्रतिष्ठा काय सांगते ? मुंबईचे महत्व काय सांगतो ? लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोस्तव मुंबईत सुरु केला, ज्यांनी अखेरचा देह मुंबईमध्ये ठेवला. परंतु आता मुंबईची कीर्ती अशी घाणेरडी झालेली आहे की, कोणताही वाईट प्रकार, विकृत प्रकार करावयाचा असेल तर मुंबईला निवडतात. एक हॉटेल निवडतात, त्या हॉटेलमध्ये छुपा कॅमेरा लावला जातो, ती मुलगी तेथे राहते काय, रात्री 12 वाजता गि-हाईकाला बोलविते काय आणि आमचे सरकार त्याठिकाणी ढुंकून बघत सुध्दा नाही. त्या हॉटेलविरुध्द का कारवाई झाली नाही ? त्याठिकाणी छुपा कॅमेरा कोणी बसविला ? शेवटी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.प्रमोद नवलकर...

प्रायव्हसी नावाचा काहीतरी प्रकार आहे. सहजतेने घेण्यासारखी ही गोष्ट नाही. उद्या तुमच्या आमच्या बेडमध्ये आणि बाथरुममध्ये कॅमेरे येतील. विचारा त्या रजत शर्माला की तुला कोणी अधिकार दिला ? आणि आज तो पुन्हा स्टेटमेंट करतो की, ही जी गौप्यस्फोट करण्याची मालिका आहे ती आम्ही पुढे चालू ठेवणार आहोत. आज त्या रजत शर्माला अडवा, त्याला विचारा, त्याच्यावर खटला भरा. कारण हा धांगडधिंगा आपल्या शहरामध्ये, आपल्या संस्कृतीमध्ये बसणारा नाही. हे जे हॉटेल आहे तेथे दुर्दैवाने माझे मित्र आहेत. त्याठिकाणी महिन्यापूर्वी धाड पडली होती. त्या धाडीमध्ये वेश्या सापडल्या होत्या. त्यामध्ये दोन रशियन वेश्या होत्या. ही सगळी मुंबईची कीर्ती. त्या टोपेजवर धाड घातली तेव्हा आपला विश्वास बसणार नाही, त्या टोपेजवर टाकलेल्या धाडीच्या वेळी 315 मुली एका ठिकाणी सापडल्या होत्या. या 1 हजार कोटी रुपयामध्ये मुंबईचे चारित्र्य जतन करण्यासाठी एका रुपयाची तरी तरतूद ठेवली आहे काय ? सगळया विकृत गोष्टी या मुंबई शहरामध्ये घडत आहेत त्याच्यासाठी वेगळे बोलावे लागेल. त्याला प्रतिबंध करण्यासाठी काय केले आहे ? सभापती महोदया, आपण महिला आहात, या विषयाचे महत्व माझ्यापेक्षा आपल्याला जास्त कळते. परंतु स्त्रियांची किंमत, स्त्रियांचे मोल या शहरामध्ये, या राज्यामध्ये किती राहिले आहे ? याचा काही विचार केलेला आहे काय ? अर्थसंकल्पामध्ये याला स्थान कधीच नसते. याला पायबंद घालण्यासाठी तुम्ही एखादे पथक नेमले असते तर मी समजू शकलो असतो परंतु ते नाही. हा विषय फार मोठा आहे.

सभापती महोदया, राज्याच्या सांस्कृतिक खात्यात नेमके काय चालले आहे ते समजत नाही. कारण 2-2, 3-3 वर्षे पारितोषिके दिली जात नाहीत. आम्ही वर्तमानपत्रातून वाचतो की, फिल्म सिटी विकून टाकणार आहे. हे विकणार, ते विकणार आणि विकण्याचे निर्णय येथून होत नाहीत, ते परभारे होतात. आता ते श्रीमती सोनिया गांधी करतात असे मी म्हणत नाही. तुम्ही जो प्रॉपर्टीचा लिलाव मांडलेला आहे तो लिलाव श्रीमती सोनिया गांधी यांनी करण्यास सांगितला आहे असेही मी म्हणत नाही. तुम्ही विकृत राज्यकारभार करीत आहात तसा राज्यकारभार करावयास श्रीमती सोनिया गांधी यांनी सांगितला आहे असेही मी म्हणत नाही.

नंतर श्री.शिगम.....

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

मेजर सुधीर सावंत..

त्यामुळे त्याचा परिणाम पूर्ण जगात जे इव्हेस्टर आहे, त्यांच्यामधील आत्मविश्वास वाढविण्यामध्ये निश्चितपणे होणार आहे. त्याच प्रमाणे बजेट प्लॅन 11 हजार कोटीचा आहे आणि आर्थिक वाढ 13.08 टक्के या राज्यामध्ये या वर्षी निर्णायीत करण्यात आली आहे. जी.एस.डी.पी. मध्ये 7 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. यावेळी जो महसूल गोळा झालेला आहे तो बजेट एस्टीमेटपेक्षा जास्त झालेला आहे ही खरोखरच अत्यंत चांगली बाब आहे. 2005-2006 च्या अर्थसंकल्पात 50 हजार कोटीचे बजेट एस्टीमेट केलेले आहे म्हणून मी सरकारचे अभिनंदन करतो. या अर्थसंकल्पात सर्वात मोठी गोष्ट आहे ती म्हणजे फिस्कल रिस्पॉंसिबिलिटी बील या सभागृहात आणण्यात येत आहे.म्हणजे सरकार हे जबाबदारीने वागत आहे. सरकार हा खर्च जबाबदारीने करीत आहे. ज्या प्रमाणे पाप्युलीश स्कीम आणून वाटेल तसा अनिर्बंध असा निधीचा वापर केला जाणार नाही असा विश्वास दाखविण्याची यावेळेस गरज होती. सन्माननीय सदस्य श्री. नवलकरसाहेब म्हणाले की, मुंबई शहर हे बेचीराख होत आहे. त्यासाठी काय केले पाहिजे असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मी सांगू इच्छितो की, पूर्ण जगातील इव्हेस्टरचा विश्वास बसला पाहिजे अशा प्रकारचा या वर्षाचा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहात सादर केलेला आहे.मुंबईची जी गौरवशाली परंपरा पूर्ववत आणण्याचा या शासनाने प्रयत्न केलेला आहे.मुंबई शहर हे देशाचे आर्थिक कॅपीटल आहे असे म्हटले जाते. त्यादृष्टीने या शहरात सर्व प्रकारच्या विकासाच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा या शासनाचा प्रयत्न आहे. सर्वात एक महत्वाची गोष्ट म्हणजे केंद्र सरकारने 12 वा वित्त आयोगाचा अहवाल स्वीकारुन 36 हजार कोटी रुपये पुढच्या पाच वर्षात महाराष्ट्र राज्यास मिळणार आहेत. जवळपास दीड टक्का केंद्र शासनाचा महसूल महाराष्ट्र सरकारला मिळसणार आहे. या शासनाने युती शासनाकडून एक वारसा घेतलेला आहे. 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज डोक्यावर घेऊन या सरकारने राज्य चालविले आहे. यापुढे देखील तसेच राज्य चालविण्याचा प्रयत्न शासन करीत आहे.हे कर्ज 10 लाख कोटीच्या वर गेले नाही ही चांगली गोष्ट झाली आहे.40 हजार कोटीचे कर्ज ज्या लोकांनी या राज्यावर करुन ठेवले त्यांना या कर्जाच्या बाबतीत बोलण्याचा काहीही अधिकार नाही. राज्यावर जे कर्ज आहे ते फेडण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. ही एक अत्यंत चांगली गोष्ट आहे की, 12.70 टक्के व्याज दर होते ते कमी करुन 9.77 व्याजाचा दर आणला होता. आता तो व्याजाचा दर 9.33 टक्के एवढा आहे. राज्यावरइ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत..

1 लाख 10 हजार कोटीचे कर्ज आहे ते फेडण्यासाठी या तरतुदीचा फार मोठा उपयोग होईल. माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे की, कुठलेही राज्य 1 लाख 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज डोक्यावर घेऊन राज्य चालवू शकत नाही. त्यासाठी काही तरी धाडसी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.हे कर्ज कमी कसे करता येईल. यासाठी एक ट्रस्ट निर्माण करुन 3 हजार कोटी रुपये तरतूद करण्याचे प्रयोजन आहे. ही अतिशय स्वागतार्ह गोष्ट आहे.ही एक चांगली दिशा आहे.यातून जे काही साध्य होणार आहे यासंबंधीचा रोड मॅप आपल्याकडे नाही.दरवर्षी 3 हजार कोटी रुपये देऊन 1 कोटी 10 हजार रुपयांचे कर्ज फेडता येईल की नाही अशी भीती सर्वांच्या मनात आहे. याकडे मात्र गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.2000 या वर्षी नॉन प्लॅन एक्सपेंडीचर 81 टक्के होते. या वर्षापर्यंत नॉन प्लॅन एक्सपेंडीचरची रक्कम 67 टक्क्यांपर्यन्त आणली आहे ही देखील अभिनंदनीय बाब आहे. एक्सपेंडीचरच्या बाबतीतमध्ये माननीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाील एक कमिटी निर्माण केलेली आहे. राज्यात वेगवेगळया विभागांचा अनुशेष आहे त्या संदर्भात वेगवेगळया सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. पाटबंधारे विभागासाठी 1400 कोटी रुपयांची तरतूद करुन ही कमी असून ती मागासभागांना पुरेशी होणार नाही. या तरतुदीमध्ये वाढ होण्याची गरज आहे. बाजारातून बॉंड न घेता स्वत:च्या कर्तत्वावर ही तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे ही देखील गोष्ट अभिनंदनास पात्र आहे.3880 कोटी रुपये पाटबंधारे विभागाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी हवे आहेत.1400 कोटी रुपयांची तरतूद करुन तो अनुशेष भरुन निघणार नाही ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो...

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अनंत तरे)

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 18:30

मेजर श्री. सुधीर सावंत ..

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या बाबतीत मला तीन महत्वाच्या गोष्टी याठिकाणी मांडावयाच्या आहेत. हा अर्थसंकल्प राज्याला कोणत्या दिशेने घेवून जाणारा आहे हे पाहिले पाहिजे. हा अर्थसंकल्प जागतिक परिस्थितीला राष्ट्रीय परिस्थितीला आणि अर्थसंकल्पाला गृहीत धरुन सादर केला आहे काय हे महत्वाचे आहे. अर्थसंकल्पातील महत्वाच्या बाबींचा उल्लेख करताना आज जगामध्ये बीओटी तत्व लागू करण्यात आले आहे आणि जगामध्ये लिब्रलायझेशन आणि ग्लोबलायझेशन सुरु असताना या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र कसा पुढे जाणार आहे हे महत्वाचे आहे. उदा. कृषी मालाच्या निर्यातीसंबंधी जगामध्ये या विषयावर मोठी चर्चा चालू आहे. महाराष्ट्रात निर्माण होणा-या कृषी मालाला निर्यात करण्यासाठी राज्य शासनाचे काय धोरण आहे किंवा काय नियोजन आहे हे पाहणे आवश्यक आहे. केंद्र सरकारचे यासाठी स्वतंत्र असे वाणिज्य मंत्रालय आहे. परंतु राज्य सरकारमध्ये असे कोणतेही खाते नाही. व्यापा-यांशी चर्चा करुन महाराष्ट्रात तयार होणा-या मालाची परदेशात कशी निर्यात करता येईल अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था आणि यासाठी बजेटमध्ये कोणतीही तरतूद केलेली दिसत नाही. आज या क्षेत्रात तुलना करावयाची झाली तर ती चीनशी करावी लागेल. इतर देशांशी तुलना करावयाची झाली तर व्यापाराला महत्व देण्यात आलेले आहे. महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून तसे दिसत नाही. महाराष्ट्रामध्ये उत्पादित होणारा जो माल आहे त्याची विक्री परदेशात कशी करता येईल त्याबाबतचे नियोजन कसे करता येईल यादृष्टीने शासनाकडे कोणतेही उत्तर नाही. माल निर्यात करण्याच्या दृष्टीने कोणतेही धोरण नाही. राज्याला 720 कि.मी.लांबीचा तटवर्ती किनारा आहे. या किना-यापासून मच्छिमारबांधव वर्षाला सुमारे 1000 कोटी रुपयांची मासळी निर्यात करीत आहेत. परंतु या उद्योगासाठी 10 टक्के सुध्दा गुंतवणूक सरकारने केलेली नाही. 1000 कोटी रुपये महसूल मिळवून देणारा मच्छिमार आहे त्याचा उद्योग वाढविण्यासाठी तशा पध्दतीची गुंतवणूक झाल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्राच्या शेतक-याला, मच्छिमाराला आणि उद्योगपतीला ज्यांचा सहभाग आहे त्यांना जगाच्या स्पर्धेमध्ये येण्यासाठी शक्ती देण्याचे काम या बजेटमधून झालेले आहे असे मला वाटत नाही. या विषयावर चर्चा करीत असताना तटवर्ती किनारपट्टीबद्दल केंद्र शासनाची काय भूमिका आहे हा प्रश्न देखील महत्वाचा आहे आणि तो अनेक वर्षे प्रलंबित आहे. मच्छिमार बंदरे आहेत. तसेच या

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर श्री. सुधीर सावंत ..

किनारपट्टीचा पर्यटनासाठी सुध्दा उपयोग होणार आहे. बंदरांचा माल निर्यात करण्यासाठी उपयोग होणार आहे. याबद्दल राज्य सरकारचे काय धोरण आहे ते अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. लिब्रलायझेशनच्या आणि ग्लोबलायझेशनच्या जगामध्ये तटवर्ती किना-यासाठी लक्ष द्यावयास पाहिजे. कृर्षी मालाची निर्यात करीत असताना आंब्याची निर्यात करण्यासाठी कोणताच कार्यक्रम पणन खात्याने आखलेला दिसत नाही. मच्छिमारांसाठी बंदरांची आवश्यकता आहे. रत्नागिरी येथे मिरकरवाडा हे एकच बंदर आहे. कोकण विकास कार्यक्रमाखाली माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी बंदराचे भूमीपूजन केले होते. परंतु त्यासाठी बजेटमध्ये नंतर कोणतीच तरतूद करण्यात आलेली नाही. या बंदराचे डिझाईन तयार करुन ते केंद्र शासनाकडे पाठविणे आवश्यक होते. या गोष्टी झाल्या नाहीत. सिंधुदूर्ग जिल्हयात नालंगवाडी येथे 30 कोटी रुपयांचे बंदर आहे. तसेच विजयदुर्ग,दाभोळ ही बंदरे आहेत. परंतु या बंदरांच्या विकासासाठी काही केल्याशिवाय 1000 कोटी रुपयांचा महसूल देणा-या मच्छिमारांसाठी आपण काही करतो आणि त्यांना न्याय देतो असे म्हणता येणार नाही.

यानंतर श्री.गायकवाड ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ...

सभापती महोदय, तटवर्ती प्रांताच्या बाबतीत सांगावयाचे तर संपूर्ण जगात तटवर्ती प्रांत हे विकासाची केन्द्रे झालेली आहे.परंतु डहाणू पासून सिंधुदूर्ग जिल्हयातील रेड्डीपर्यन्तचा जो भाग आहे त्याला विकासाचे केन्द्र बनविण्यासाठी देश पातळीवरसुध्दा आणि महाराष्ट्रपातळीवरसुध्दा कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला नाही.चीनने जेव्हा आर्थिक उदारीकरण केले होते तेव्हा त्यांनी तटवर्ती प्रांतात प्रथम स्पेशल इकोनॉमी झोन्स उभे केले होते.भारतामध्ये स्पेशल इकोनॉमी झोन उभी करण्याची सर्वात उत्तम जागा मुंबई आणि गोव्याच्या मध्ये आहे.परंतु आजपर्यन्त त्याबाबतीत काहीही विचार झाला नाही. नवीन मुंबईमध्ये एक स्पेशल इकोनॉमी झोन उभा करण्याचा प्रयत्न झाला होता पंरतु तोही अजून सफल झाला नाही. माझे असे म्हणणे आहे की, छोटया छोटया एरियामध्ये स्पेशल इकोनॉमी झोन उभे करुन काहीही साध्य होणार नाही.अनेक देशांनी स्पेशल इकॉनामी झोन्स उभी केली असल्याची आपल्यासमोर अनेक उदाहरणे आहेत .त्याप्रमाणे आपल्याकडे रत्नागिरी येथे स्पेशल इकॉनामी झोन उभे करण्यात यावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.राजीव गांधी यांनी ज्यावेळी सायन्स टेक्नॉलॉजी आणि कॉप्युटर तंत्रज्ञान भारतात आणले होते त्यावेळी समोरच्या बाकावर बसलेल्या अनेकांनी थट्टा उडवली होती हे मला आज आठवत आहे.परंतु आज आपल्याकडील जे सॉफट वेअर इंजिनिअर्स आहेत किंवा कॉम्पुटर तज्ञ आहेत त्यांनी संपूर्ण जगात आपल्या देशाची प्रतिष्ठ प्रस्थापित केलेली आहे परंतु इनफॉर्मेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी च्या बाबतीत महाराष्ट्र कोठे आहे ? याबाबतीत मोठे प्रश्न चिन्ह आहे. बंगलोर किंवा हैद्राबादमध्ये इनफॉर्मेशन ॲन्ड टेक्नॉलॉजीच्या बाबतीत प्रगती केल्याचे ऐकतो परंतु महाराष्ट्रामध्ये या क्षेत्राला गती देण्यासाठी अर्थसंकलपात तरतूद केल्याचे दिसून येत नाही.जर ख-या अर्थाने महाराष्ट्रात उद्योजकता आणावयाची असेल तर पायाभूत सुविधा निर्माण् करणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे त्या दृष्टीने रस्ते आणि वीज या दोन विषयांना प्राधान्य दिले पाहिजे. नवीन रस्त्यासाठी तसेच उड्डाण पुलांसाठी तरतूद करण्यात येते परंतु सध्या जे अस्तित्वात रस्ते आहेत ते चांगले ठेवण्यासाठी तरतूद केल्याचे अर्थसंकल्पात दिसत नाही म्हणून हे रस्ते रिपेअर करण्यासाठी अधिक तरतूद करण्यात आली पाहिजे. रस्ते असो वा इतर सरकारी मालमत्ता असो त्याच्या रिपेअर करता अधिक तरतूद केली पाहिजे. नळपाणी योजनेच्या बाबतीत सुध्दा तीच स्थिती आहे.नळ पाणी योजना तयार करण्यात आल्या आहेत परंतु त्यापैकी अनेक योजना बंद

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

असतात.कोकणातील तरी 40 टक्के योजना बंद आहेत. त्या योजना बंद असण्याचे मुख्य कारण म्हणजे या योजना रिपेअर करण्यासाठी तरतूद केली जात नाही. तेव्हा सरकारी मालमत्ता चांगली ठेवण्यासाठी तरतूद असणें अत्यंत आवश्यक आहे.इंटरटेनमेन्ट इन्डस्ट्रीजच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री प्रमोद नवलकर यांनी एक बाजू अशी मांडली की, इंटरटेनमेन्ट इन्डस्ट्रीजमुळे विकृती निर्माण होते. त्याबाबत जी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे ती केलीच पाहिजे परंतु एक गोष्ट सत्य आहे की इंटरटेनर्मेन्ट इन्डस्ट्रीजमुळे मुंबई आणि त्या परिसरात मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण झाला आहे. रोजगार देण्याच्या दृष्टीने बायो टेक्नॉलॉजी आणि इंटरटेनमेन्ट इन्डस्ट्रीज ही दोन महत्वाची साधने आहेत असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.या उद्योगाला चालना देण्यासाठी बजेटमध्ये तरतूद मोठया प्रमाणावर केली आहे असे मला वाटत नाही.या देशाचे आधुनिकीकरण होत असतांना आणि जगामध्ये नवीन व्यापाराची पध्दत येत असतांना तसेच मोठया प्रमाणावर स्पर्धा वाढत असतांना महाराष्ट्राला या स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी, जागतिक स्पर्धेत आपण उतरण्यासाठी शेतक-यांना व मच्छिमारांना सक्षम करण्याची आवश्यकता आहे.परंतु तसे करण्यात आल्याचे अर्थसंकल्पात दिसून येत नाही त्या दृष्टीने विचार करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, यानंतर मला इंटरनल सिक्युरिटी पॉलीसी सबंधी बोलावयाचे आहे.

श्री.प्रमोद नवलकर : बंगल्यातील की बंगल्याच्या बाहेरील ?

कर्नल सुधीर सावंत : बंगल्यात सिक्युरिटी ठेवण्याची जबाबदारी त्या त्या व्यक्तीची आहे.परंतु लॉ ॲन्ड ऑर्डरच्या दृष्टीकोनातून जर बोलावयाचे झाले तर आजच्या परिस्थितीमध्ये लॉ ॲन्ड ऑर्डर हा ब्रिटीशकालीन शब्द आहे तो शब्द आता जुना झालेला आहे.त्याऐवजी इंटरनल सिक्युरिटी असे आपण म्हटले पाहिजे ..

नंतर श्री.सुंबरें

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांच्या समितीमध्ये काम करण्याची मला संधी मिळाली आहे आणि त्या समितीनेही विचार करून विस्तृतपणे सरकारला सूचना दिल्या होत्या. त्यापैकी काही स्वीकारल्या गेल्या, काही स्वीकारल्या गेल्या नाहीत हा भाग वेगळा. अध्यक्ष महाराज, दुर्दैवाने अशा प्रकारची समिती पध्दत सभागृहामध्ये बंद झाली आहे. आज विषय असा आहे की, या बजेटवर आपण सर्वसाधारण चर्चा करीत आहोत परंतु खातेवार किंवा विभागनिहाय चर्चा काही येथे होत नाही त्यामुळे त्या त्या विभागाबद्दल आपणास सविस्तर चर्चा करता येत नाही. त्यामुळे प्रशासनाला वाटेल ते करण्यास मोकळीक मिळते. अध्यक्ष महाराज, आज महाराष्ट्रात इंटर्नल सेक्युरिटीच्या दृष्टीने बोलावयाचे झाले तर फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. दाऊद बद्दल कोणी म्हणतो तर कोणी इतरांबद्दल म्हणतो. पण या राज्यामध्ये कायद्याचे राज्य आज आहे की नाही ही शंका सामान्य माणसाच्या मनामध्ये निश्चितपणे येते यात शंका नाही. आज तरुणाईच्या दृष्टीने गुन्हेगारी ही सर्वात आकर्षक अशी गोष्ट वा क्षेत्र झालेले आहे. कारण त्यातून सहजगत्या आणि मुबलक असा पैसा येतो. आज जवळ जवळ 50 टक्के पैसा हा गुन्हेगारीतून आणि भ्रष्टाचारातून निर्माण झालेला आहे अशा प्रकारच एक अहवाल देखील प्रसिध्द झालेला आहे. गुन्हेगारीतून येणारा हा पैसा मग फिल्म जगतामध्ये आणि रिअल इस्टेटमध्ये पेरला जातो. रिअल इस्टेटमध्ये सर्वात जास्त किंमत ही मुंबईमध्ये होती. कारण हा अनैसर्गिक पैसा ड्रग्ज आणि आर्म्स मधून येतो आणि त्यातून पुन्हा गुन्हेगारी वाढते, त्या पैशातून वाटेल त्या गोष्टी विकत घेतल्या जाऊ शकतात आणि हेच मोठे आकषण तरूणांना या क्षेत्राबद्दल वाटत असते. तेव्हा आज मुंबईमध्ये आणि या राज्यामध्ये पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याची मोठी गरज आहे असे मला वाटते. त्या दृष्टीने मग गुन्हे अन्वेषण विभागासाठी आपण निधी किती आणि कसा देता आहात हे पहावयाचे तर मागील वर्षी आपण 72 कोटी दिले होते आणि आता या वर्षी 97 कोटी दिलेले आहेत. त्यातील 90 टक्के पैसा हा पगारावरच खर्च होतो. खरे तर या गुन्हे अन्वेषण विभागाच्या दृष्टीने फोरान्सिक लॅबॉरेटरीला मोठे महत्त्व आहे. पण त्यासाठी अत्यंत तुटपुंजा म्हणजे 13 कोटी इतका पैसा देण्यात येतो. त्यामुळे फोरान्सिक लॅब. आणि गुन्हे अन्वेषण विभाग या दोघांचा मेळ गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी लागतो तो होऊ शकत नसल्याने गुन्ह्यांचा तपास पूर्णपणे आणि लौकर लागत नाही.

.... (वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते...) ..... 3एल 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

अध्यक्ष महाराज, माझ्या कॉग्रेंस पक्षाकडून मी पहिलाच वक्ता आहे तेव्हा मला अधिक वेळ आपण दिला पाहिजे. ...

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : 20 मिनिटे झाली आपण भाषण करीत आहात ...

कर्नल सुधीर सावंत : अध्यक्ष महाराज, वेळेचे निर्बंध माझ्यावरच आपण कशासाठी घालीत आहात. माझ्या पक्षाच्या वतीने मी पहिलाच वक्ता आहे. बाकी सर्व वक्त्यांनी एक एक तास भाषणासाठी घेतलेला आहे. कॉंग्रेस पक्षाकडून केवळ 10 मिनिटांमध्ये भाषण करणे मला शक्य होणार नाही. मी आपला अधिक वेळ घेणार नाही, पण मला माझे काही महत्त्वाचे मुद्दे येथे मांडावयाचे आहेत त्यासाठी आपण मला थोडा वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, मी एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आलो आहे. आज संपूर्ण पोलीस दलाची पुनर्रचना करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आजच्या जगामध्ये, सायबर क्राईम्स बाबत तपास करणारी यंत्रणा आजच्या आपल्या पोलीस दलाकडे नाही. एकीकडे पोलिसांचे मनोबल खच्ची करण्याचे प्रयत्न चालले आहेत. ज्यांना प्रेसिडेंटचे गोल्ड मेडल मिळालेले आहेत असे अधिकारी धडाधड तुरुंगात जात आहेत आणि भ्रष्टाचारी अधिकारी मात्र प्रमोशन्स घेत आहेत. अशी परिस्थिती या पोलीस दलामध्ये कशी आणि का होत आहे हे पाहण्याची आवश्यकता आहे. जे प्रामाणिक अधिकारी आहेत, ज्यांना राष्ट्रपती पदक विजेते अधिकारी आहेत ते तुरूंगात कसे जातात आणि जे भ्रष्टाचारी आहेत, भ्रष्ट आहेत त्यांना काहीच होत नाही आणि ते सहजगत्या वरच्या पदांवर कसे जात आहेत हेच समजत नाही आणि यामागे काही कारस्थान तर नाही ना हे पाहण्याची नितांत गरज आहे. त्याकडे आपण अधिक लक्ष द्यावे असे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

अध्यक्ष महाराज, आपल्या गुन्हे अन्वेषण विभागाकडे आर्थिक गुन्हेगारीचा देखील सेल आहे. व्हिएन्ना येथे युनोमध्ये ठराव झाला आणि त्याप्रमाणे आर्थिक गुन्हेगारीबद्दलचा कायदा करण्याचे सर्व देशांनी मान्य केले. मनी लॅंडिंग ॲक्ट केंद्र सरकारने पास केला. काळा पैसा पांढरा करण्यासाठी जे नियम आहेत. ...

(यानंतर श्री. जागडे ....3एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी होते की नाही, ही शंकाच आहे. आर्थिक गुन्हेगारीविरध्द सीआयडी मध्ये जे पथक निर्माण करण्यात आलेले आहे, त्याला जबरदस्त ताकद देण्याची गरज आहे. त्या पथकामध्ये अर्थतंज्ज्ञ पाहिजेत, रिझर्व्ह बँकेचे अधिकारी पाहिजेत, कॉम्प्युटर एक्सपर्टची गरज आहे. सभापती महोदय, माजी सैनिकांची पोलिसांमध्ये जास्तीत जास्त भरती करण्यात यावी. माजी सैनिकांबाबतचा एक प्रस्ताव मला या निमित्ताने गृह खात्यासमोर ठेवावयाचा आहे. भारतीय सेनेत ज्या सैनिकांची सेवा सात वर्षे झाली आहे, त्या सैनिकांना पोलिसामध्ये भरती करावी. काश्मिरमध्ये 25 ते 26 वर्षाची मुलांनी काम केले आहे, ती पोलीस दलामध्ये देण्यासाठी भारतीय सेना तयार आहे. कारण भारतीय सेनेला आपले सैन्य तरुण ठेवावयाचे आहे. म्हणून आज जे सैन्यात आहेत, ते सैनिक आपल्याकडे यावयाला तयार आहेत. त्यांना पोलीस दलात भरती करण्यात यावी. त्यामुळे आपणाला अनुभवी व्यक्तिमत्व पोलीस दलाला मिळेल. राष्ट्रप्रेमाने पछाडलेली शक्ती पोलीस दलात आणण्याची शासनाला संधी आहे. ती शासनाने गमावू नये.

सभापती महोदय, पर्यटनाच्या बाबतीत मला माझे विचार मांडावयाचे आहेत. यासाठी 80 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पर्यटनासाठी आकर्षक असे स्थळ सिंधुदूर्ग जिल्हा आहे. भारतामध्ये गोव्याला पर्यटनाच्या अग्रगण्य असे स्थान मिळाले आहे. केरळाला सुध्दा त्या प्रकारचे स्थान मिळाले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील समुद्रतटावर जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. सिंधुदूर्ग जिल्ह्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आम्ही माननीय श्री. माधवराव शिंदे यांना सिंधुदूर्ग जिल्ह्यात घेऊन गेलो होतो. त्याप्रमाणे केंद्र सरकारने सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला. परंतु त्यानंतर काहीच झाले नाही. त्याचे कारण एकच आहे. सगळीकडे पंचतारांकित हॉटेल बांधण्याचे फॅड आलेले आहे. पंचतारांकित हॉटेल झाले तरच पर्यटन होणार. सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्ह्यात पंचतारांकित हॉटेलची गरजच नाही. सीआरझेडच्या निर्बंधाप्रमाणे समुद्रतटावर पंचतारांकित हॉटेल येऊच शकणार नाही. म्हणून आम्ही बचत गटाच्या माध्यमातून राहण्याची तसेच त्यांच्या जेवणाची सोय सुरु केली आहे. आज या कामासाठी अनेक लोक पुढे आले आहेत. त्यांना शासनाने 25 टक्के सबसिडी देण्याची गरज आहे. त्यांनी आपल्याच घरात खोल्या बांधून पर्यटकांची सोय केली तर एक नवीन प्रकल्प आपण आपल्या महाराष्ट्रात उभा करु शकू. सभापती महोदय, परदेशी तसेच देशी पर्यटकांसाठी नवीन काहीतरी निर्माण केले पाहिजे. सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने प्रत्येक जिल्ह्याला पाच पाच लाख रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

दिले आहेत. त्यामुळे जो काही पैसा आहे, तो आपण एका ठिकाणी वापरावा. वेंगुर्ला तालुक्यातील एक गाव पर्यटन गाव म्हणून शासनाने उभे करावे. म्हणजे गोव्यातील तसेच परदेशातील पर्यटक त्या ठिकाणी येऊ शकतील.

सभापती महोदय, पर्यटनामध्ये सहकार आम्ही सिंधुदूर्ग जिल्ह्यात पहिल्यांदाच सुरु केला आहे. त्याला प्रचंड यश येत आहे. 23 सहकारी संस्था एका जिल्ह्यात उभ्या राहिलेल्या आहेत. त्यांना 1:9 या प्रमाणात भाग भांडवल देण्यात यावे अशा प्रकारची मी विनंती करीत आहे. म्हणून ज्यावेळी आपण पर्यटनाकडे विशेष लक्ष द्याल तेव्हाच त्याचा विकास होऊ शकेल.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

एक जागा निवडण्यात येईल. या अर्थसंकल्पावर बोलतांना मला सरकारचे अभिनंदन करतांना अत्यंत आनंद होतो की, पहिल्यांदा सरकारने हा शिलकी अर्थसंकल्प सादर केला आहे. अशा पध्दतीने पुढे वाटचाल सुरु राहिली तर 1 लाख 10 हजार कोटीचे कर्ज महाराष्ट्रावर आहे ते कमी करण्यामध्ये आपण निश्चितपणे यशस्वी होऊ. माननीय अर्थ मंत्र्यांनी हा सातवा अर्थसंकल्प सादर केला . ज्यावेळी दहावा अर्थसंकल्प सादर केला जाईल त्यावेळी महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा हा संपूर्णपणे निकाली निघालेला असेल अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये मी माझे थोडक्यात विचार मांडणार आहे. या ठिकाणी शिक्षणावरील अनुदानावर जास्त खर्च दाखविला आहे. विकसनशील किंवा विकसित अशा दोन्ही राष्ट्रांमध्ये शिक्षणावर अधिकाधिक खर्च करणे म्हणजे सुदृढ समाज बनविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु असे दिसते की, वेतनेतर अनुदान आतापर्यंत नियमितपणे दिले गेले नाही. शिक्षण सेवक योजना सुरु करण्यात आली, तिला वेठबिगारीचे स्वरुप प्राप्त झाले. कायम विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचे शासनाचे धोरण नाही. शिक्षकांना वेळेवर पगार दिला जात नाही, त्यांना थकबाकीची रक्कम दिली जात नाही. अनुदानीत शाळांना दहा-दहा वर्षे अनुदान दिले जात नाही. शिक्षणावर 9 हजार कोटीपेक्षा जास्त खर्च होत असल्यामुळे शिक्षणावरील खर्च दिवसें दिवस कमी कमी कसा होईल या दृष्टीने सरकारच्या योजना तयार होत आहेत. उच्च शिक्षणाच्या शुल्कासाठी शासनाने तीन पर्याय ठेवले आहेत? ते कोणत्या अर्थाने ठेवले आहेत याचा उलगडा होत नाही. तेव्हा आपण अगोदरच त्यांना शुल्क वाढवून देणार आहात काय? त्यामधून तुम्हाला फायदा कसा मिळणार आहे? तुम्ही त्यासाठी ऐच्छिक पर्याय देणार असाल तर त्याला कोण तयार होणार आहे? शैक्षणिक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ केले आहे ही एक जमेची बाजू आहे. परंतु सर्वसामान्य मध्यम वर्गीयाच्या आवाक्या बाहेरील हा शैक्षणिक खर्च आहे, त्यामध्ये त्याला थोडासा दिलासा मिळेल. परंतु त्यांच्या मुलांची उच्च शिक्षणाची दारे बंद होतील की काय अशी त्याला भिती वाटते. सभापती महोदय, शासनाने मोफत पाठ्यपुस्तक योजनेचे गेल्या वर्षी धिंडवडे काढले. त्या योजनेमध्ये बदल कां करण्यात आला या बाबतचा तपशील अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये दिलेला नाही. आता आपण शिल्लक राहिलेली पुस्तके वाटणार आहात ती चांगल्या स्थितीतील आहेत कां? त्यामध्ये असलेल्या खंडीभर चुका दुरुस्त करुन आपण देणार आहात की, शुद्धीपत्रकाची पुस्तिका तयार करुन देणार आहात? राज्य सरकारने चित्रपटांसाठी द्यावयाच्या अनुदानामध्ये वाढ करुन 15 लाखाचे 20 लाख केले आहेत ही चांगली बाब आहे. परंतु याठिक्राणी संख्यात्मक वाढ झालेली असली तरी चित्रपटांची गुणात्मक वाढ झाली आहे कां? 60 चित्रपटांपैकी 10 चित्रपट सुध्दा दर्जेदार नाहीत. पुणे फेस्टीव्हलसाठी आपण जानेवारीमध्ये 15 लाखाचे अर्थसहाय्य दिले. आपण 10 लाखाचा प्रभात ॲवॉर्ड दिला, हा एक वादाचा विषय आहे. आपण त्याला प्रभात म्हणण्याचे कारण काय? 10 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

चित्रपटाला व 5 लाख दिग्दर्शकाला दिले आहेत. सुरेश कलमाडींचा पूजा फेस्टिव्हल हा खाजगी ट्रस्ट आहे, त्या ट्रस्टला सरकार मदत कशी देऊ शकते? इंटरनॅशनल चित्रपटांची कॉंपिटीशन IFFI गोवा महोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आली. या महोत्सवाच्या निमित्ताने आपल्या देशातील पैसे बाहेर जात आहेत. त्यामध्ये केंद्र सरकारचा काय फायदा? केंद्र सरकारने हा नवीन पायंडा कशासाठी पाडला? आणि मंत्रिमंडळाने त्याला मान्यता कशी दिली? शासनामार्फत स्वत:चे फेस्टिव्हल साजरे होत असतांना कुणाला खुष करण्यासाठी आपण हे करीत आहात? तसेच, हे ॲवॉर्ड फॉरेन एक्सचेंजमध्ये कन्व्हर्ट करावयाचे म्हणजे मोठीच समस्या निर्माण झाली आहे. हे ॲवॉर्ड उत्कृष्ट चित्रपटासाठी "यस्टर्डे साऊथ आफ्रिका" या चित्रपटाला आणि दिग्दर्शनाबद्दल पेरुच्या "लास्ट डेज ऑफ सँटिगो" या चित्रपटांना मिळाले. राज्य मंत्रिमंडळाचा सुध्दा संकोच करण्यात आला असून 69 मंत्र्यांच्या संख्येवरुन 40 मंत्री झाले आहेत. परंतु त्यावरील खर्च मात्र वाढत आहे. 2004-05 मध्ये 13 कोटी 89 लाख 91 हजार एवढा खर्च झाला म्हणजे हा खर्च सव्वा तीन कोटींनी वाढला आहे. नव्या स्मारकांसाठी तरतूद करण्यात आली आहे ही चांगली गोष्ट आहे. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, सावित्रीबाई फुले यांची 3 जानेवारीला आठवण होते.असे असून सुध्दा त्यांची स्मारके योग्य स्थितीतच नाहीत याचे कारण काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर . . . .

सभापती महोदय, गोराईला पाचूचे बेट म्हटले जाते, त्याचा विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यात येणार आहे. तेथे रिसॉर्ट बांधण्यात येणार आहे. पण ते परदेशी पर्यटकांसाठीच आहे का ? म्हणजे मुंबईची गर्दी आणखी वाढणार आहे. तसेच येथे पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करीत असताना तेथील जे निसर्ग सौंदर्य आहे, ते तुम्ही शाबूत ठेवणार आहात का? मुळात आरे कॉलनी हे पर्यटन क्षेत्र आहे, पण ते तुम्ही उध्वस्त करणार आहात आणि गोराईला मात्र नवीन पर्यटन क्षेत्र उभारणार आहात. हाज हाऊसच्या बांधकामाला अर्थसहाय्य दिले जाणार आहे. त्यातून अल्पसंख्यांकांचे तुष्टीकरण करण्याचा आपला बेत आहे का ? केंद्र शासनाप्रमाणे राज्य सरकारी कर्मचा-यांना तीन टक्के महागाई भत्ता दिला जाणार आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. सरकारी कर्मचा-यांबरोबर शिक्षकांना सुध्दा हा महागाई भत्ता आपण लगेच द्यावा. पण यासाठी तरतूद कशी करणार आहात हे कळत नाही. आपण 1 एप्रिल पासून मूल्यवर्धित करप्रणाली लागू करणार आहात. त्यामुळे बेसन, मैदा, रवा, मिरची, गूळ, हळद, आटा इ. रोज लागणा-या जिनसांच्या किंमतीत वाढ होणार आहे. अन्नधान्याच्या बाबतीत शेजारच्या राज्यात अशी करप्रणाली नाही. मग आपल्या येथील व्यापार परराज्यात जाणार आहे का ? तसेच 2003 मध्ये जेव्हा व्हॅटबाबतचे विधेयक सभागृहामध्ये आले होते, तेव्हा मी एक सुधारणा सुचविली होती की, यामध्ये चार्टर्ड अकाऊंटच्या बरोबरच कॉस्ट अकाऊंटंटचाही समावेश करावा. आपण तशी तरतूद यामध्ये केलेली आहे का ? घरांच्या बाबतीत स्टॅम्प डयुटीमध्ये सूट दिलेली आहे. सामान्य माणसांना यातून थोडासा दिलासा मिळणार आहे. राज्याचा आर्थिक पाहणीचा अहवाल पाहिला तर 1991 ते 2001 पर्यंत परराज्यातून प्रतिवर्षी 4 लाख लोक येत आहेत. लोकसंख्या वाढीमध्ये स्थलांतरीत लोकांचे प्रमाण 21 टक्के आहे. प्रत्येक 5 व्यक्तीमागे 1 व्यक्ती स्थलांतरीत असते असे म्हटलेले आहे.तुम्ही कितीही योजना आख, कितीही उड्डाणपूल बांधा, तरी देखील मुंबईतील गर्दीचा स्फोट वाढतच राहणार आहे हे निश्चित. मुंबईत रस्ते वाहतुकीमध्ये अमुलाग्र बदल केला जाणार आहे. मेट्रो रेल्वे, 462 कि.मी.लांबीचे रस्ते आहेत, 41 उड्डाण पूल, 66 भूयारी मार्ग, 300 कि.मी.लांबीचे पदपथ इ.कामांसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यासाठी केंद्र शासनाकडून आपल्याला नक्की निधी मिळणार आहे का ? की हे मृगजळच आहे. तसेच महाराष्ट्र शासनाला यात 190 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत, त्याची तरतूद केलेली आहे का ? अशी शंका मनात येते.

. . . .3 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर . . . .

महसूली शिल्लक दाखविणारा अर्थसंकल्प म्हणजे जमा-खर्चाचे उत्तम व्यवस्थापन असल्याचे हे द्योतक आहे असे मानले जाते. मात्र 1 लाख 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज आपण कसे फेडणार आहात याबाबतीत कोणताही खुलासा झालेला नाही. सभापती महोदय, मला आणखी एका मुद्याबाबत बोलावयाचे होते, परंतु त्यासंबंधीच्या नोटस्‌चा कागद मला मिळत नाही. त्यामुळे मी माझे भाषण येथेच संपविते. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : आपण आता अर्थसंकल्पावरील चर्चा येथेच थांबवित आहोत. उद्या सकाळी होणा-या विशेष बैठकीमध्ये राहीलेल्या सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील. आता अर्धा तास चर्चा घेण्यात येईल.

. . . .3 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धा तास चर्चा

पृ.शी.: शासकीय सेवेमध्ये विविध गटातील व्यक्तींना सामावून घेणे.

मु.शी.: शासकीय सेवेमध्ये विविध गटातील व्यक्तींना सामावून घेणे यासंबंधी प्रा.शरद पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :--

"शासकीय सेवेमध्ये सामावून घेणेसाठी विविध गटांतील व्यक्तींना सामावून घेणेबाबत महाराष्ट्र शासनाने आपल्या विविध गटांमध्ये रिक्त होणा-या जागा भरण्यासाठी प्रकल्पग्रस्त, अनुकंपा, जनगणना कर्मचारी, पदवीधर/अंशकालीन कर्मचारी व हजेरी सहायक यांचे प्राधान्य क्रम ठरविलेले आहेत. तथापि उपलब्ध होणा-या जागा भरीत असताना प्रत्येक गटाची टक्केवारी ठरविलेली नसल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच काही संवर्गातील उमेदवार आता उपलब्ध नसल्यामुळे अग्रक्रमाच्या यादीतही बदल करण्याची आवश्यकता आहे. जागा उपलब्ध असूनही निश्चित मार्गदर्शक सूचना व्हावी, क्षेत्रीय अधिका-यांकडून नोकर भरती न होणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे चालू...

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये जेल्या अ□ वर्षापासू□ शास□मध्ये □ोजर भरती बंद होती. तथापि शासजीय सेवेमध्ये आजि □मशासजीय सेवेमध्ये □ोजर भरती जरत असता□, जाही घटजां□ प्राधाया□ आरजज ठेवज्यात आले होते. त्यामध्ये स्वातंत्र्य सै□, माजी सै□, प्रजल्पग्रस्त, अ□ुपा जालील उमेदवार, ज□जज□ जर्मचारी, हजेरी सहाय्यज आजि शेवटचे अंशजालि□ पदवीधर जर्मचारी अशा विविध घटजां□ शासजीय सेवेमध्ये सामावू□ घेज्यासाठी जाही प्रमाजात प्राधाय दिलेले होते. अ□ुपा तत्वावरील उमेदवारां□ पाच टक्जे आरजज ठेवज्यात आले होते. □ोरच्या जाळामध्ये शास□□ पाच टक्क्याची अट जाढू□ टाजली. प्रजल्पग्रस्तां□ देजील □मा□ज होजाऱ्या जाजेतू□ पाच टक्जे जाजा ठेवज्याबाबतची सूच□ शास□□ सर्व विभाजां□ दिलेल्या होत्या. त्याचबरोबर उपलब्ध होजाऱ्या जाजांपैजी 5 टक्जे जाजा ज□जज□ जर्मचाऱ्या□ द्याव्यात, अशाप्रजारचे आदेश शास□□ □र्मित जेलेले होते. अशाप्रजारे शास□□ □ोजर भरतीच्या संदर्भात प्राधाय□म ठेवू□ विविध प्रजारचे □र्जय आजि आदेश वेळोवेळी जाढलेले होते. या संदर्भात शास□च्या वेजवेजळ्या विभाजां□ वेजवेजळे आदेश जाढले. प्रजल्पग्रस्तांच्या संबंधात पाटबंधारे विभाजा□ आदेश जाढले, अ□ुपा तत्वावर □ोजऱ्या देज्याच्या संदर्भात सामाय प्रशास□ विभाजा□ आदेश जाढले, रोजजार, स्वयंरोजजार विभाजा□ अंशजालि□ जर्मचाऱ्यांच्या संबंधातील आदेश जाढले, अशाप्रजारे विविध प्रजारचे आदेश जाढल्यामुळे एजप्रजारे जोंधळाची, संभ्रमाची अवस्था □मा□ज झाली होती. ज्यावेळेला शास□□ माजासवर्जीय जर्मचाऱ्यांची भरती जरज्यासाठी विविध विभाजां□ सूच□ दिल्या, त्यावेळेला □ोजर भरती जरत असतां□ या □□□ाळ्या घटजातील माजासवर्जीयां□ शासजीय सेवेमध्ये सामावू□ घेज्यात आले. विशेषत: अंशजालि□ पदवीधर जर्मचाऱ्यां□ सेवेमध्ये सामावू□ घेत असता□ अ□ अडचजी □मा□ज झाल्या. मध्यंतरीच्या जाळामध्ये हजेरी सहाय्यजांची संज्या जवळपास संपुष्टात आलेली होती. पात्र हजेरी सहाय्यजां□ सेवेमध्ये सामावू□ घेज्यात आले. त्या□ोर जंडित सहाय्यजांची संज्या मोठयाप्रमाजात होती. त्यांच्या संबंधा□ विचार जरू □ये, अशाप्रजारचा शास□□ □र्जय घेतला. तथापि त्यांची देजील शासजीय सेवेमध्ये सामावू□ घेज्याची माजजी आहे. आज आझाद मैदा□वर जंडित हजेरी सहाय्यजां□ धरजे आंदोल□ सुरु जेले आहे, त्यांचाही सहा□ुभूतीपूर्ज विचार जरावा अशी माजजी आहे. ज□जज□ जर्मचाऱ्यांची संज्या आता संपुष्टात आलेली आहे. उच्च □यायालया□ पात्र हजेरी सहाय्यजां□ सेवेमध्ये सामावू□ घेज्याबाबतचे □देश शास□ला दिलेले होते. त्याप्रमाजे त्यां□ सेवेमध्ये घेऊ□ त्यांची संज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

प्रा.शरद पाटील (पुढे चालू....

जवळपास संपविलेली आहे. त्यामुळे उर्वरित जे घटक आहेत, त्यामध्ये अंशकालिक पदवीधर कर्मचारी आहेत. त्यांच्याबाबतीत शासनाच्या निश्चित मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे केंद्रीय अधिकाऱ्यांना सेवेमध्ये सामावून घेण्यास अडचण होते. अंशकालिक पदवीधर कर्मचाऱ्यांबरोबरच कंडित हजेरी सहाय्यक हेही प्राधान्यक्रम असलेले घटक आहेत.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील...

या सर्वांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यासाठी निश्चित अशा स्वरुपाच्या मार्गदर्शक सूचना क्षेत्रिय अधिका-यांना द्याव्यात. आज ज्या जागा उपलब्ध होतात त्या जागा एका विशिष्ट गटातूनच भरल्या जातात. असा अनुभव अनेक ठिकाणी येतो.सोलापूर जिल्हाधिका-यांनी उपलब्ध असलेल्या सर्व जागा अनुकंपा तत्वारील उमेद्वारांना नोकरीमध्ये घेऊन भरल्या. इतर प्रवर्गातील किंवा इतर घटकातील उमेदवारांना मात्र त्यांनी सेवेत सामावून घेतलेले नाही. त्यामुळे अशा प्रकारचे विसंगत, परस्पर विसंगत आणि एकसुत्रीपणा नसलेल्या अशा नियुक्त्या राज्यात निरनिराळया जिल्हयातून, निरनिररळया विभागातून होत आहेत. त्या थांबविण्यासाठी शासनाने निश्चित धोरण ठरवावे आणि विशेषत: ज्या अंशकालीन पदवीधर कर्मचा-यांना सेवेमध्ये सामावून घेऊ असे शासनाने वेळोवेळी आश्वासने सभागृहामध्ये दिलेली आहेत त्याही आश्वासनांची पूर्ती होण्यासाठी जे पात्र पदवीधर अशंकालीन कमचारी आहेत त्यांची वयोमर्यादा संपण्यापूर्वी त्यांना सेवेत समावून घेण्याच्यादृष्टीने शासनाने धोरण ठरवावे आणि त्यासंबंधी कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी मी या अर्धा-तास सूचनेच्या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांकडे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) :सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील साहेबांनी या ठिकाणी चर्चा उपस्थित केली. अनेक वेगवेगळे संवर्ग, स्वातंत्र्य सैनिक, संपकालीन कर्मचारी, जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी, या सर्वच प्रवर्गामध्ये शासनाने वेगवेगळया वर्षी यांना प्राथम्यक्रमाने घ्यावे अशा पध्दतीचे वेगवेगळे जी.आर. काढण्यात आलेले आहेत. या सगळयाच प्रवर्गामध्ये 1 लाख 80 हजार एवढया एकूण जागा प्रतिक्षासूचीवर आहेत. सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, आज शासनाच्या या जी.आर.मध्ये सुस्पष्टता निश्चित प्रकारे नाही. त्याचे कारण, आज एखाद्या कुठल्याही डिपार्टमेंटला जर मागणी करावयाची असेल तर कलेक्टरनी आज कोणत्या प्राथम्यक्रमाने याबाबतची यादी पाठवायची याबाबतची सुस्पष्ट आदेश नसल्यामुळे निश्चितप्रकारे अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या दृष्टीकोनातून मला काही अधिकची माहिती देखील सभागृहाला या ठिकाणी द्यावयाची आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने देखील मधल्या एका केसमध्ये ऑर्डर केलेली आहे. ती देखील मी या ठिकाणी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "It should be mandatory for the requisitioning authority/establishment to intimate the employment exchange and employment exchange should sponsor the names of the candidiates to the requisitioning departments for selection strictly according to seniority and reservation as per requisition. In addition, the appropriate department or undertaking or establishment, should call for the names by publication in the newspapers having wider circulation and also display on their office notice boards or announce on radio, television and employment news bulletins and then consider the cases of all the candidates who have applied."

याचा अर्थ सभापती महोदय, सुप्रिम कोर्टाचे देखील असे आदेश आहेत की, जाहिरात देऊन आणि एम्प्लॉयमेंटच्या माध्यमातूनच अशा पध्दतीने कुठेही बॅकडोअर एंन्ट्री न करता, कुठलाही प्राथम्यक्रम न देता यामध्ये सरळ जाहिरातीच्या पध्दतीने, एम्प्लॉयमेंटकडून नांव घेऊन जे सिनियॉरीटीचे उमेदवार असतील त्या पध्दतीने त्यांची परीक्ष घेऊनच ख-या अर्थाने या सगळया नेमणुका व्हाव्यात अशी सुप्रिम कोर्टाची देखील यामध्ये ऑर्डर आहे. त्यासंदर्भात राज्य शासनाने देखील 19

श्री.टोपे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोव्हेंबर,2003 ला एक वेगळा जी.आर. प्रस्थापित केलेला आहे. म्हणून त्यामध्ये सुप्रिम कोर्टाचा ऑर्डर लक्षात घेऊन त्याचबरोबर वेगवेगळया सवर्गात टक्केवारी पाहिजे अशी जी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे.त्याचबरोबर प्राधन्यक्रमात काही बदल करणे आवश्यक आहे अशीही काही मागणी आहे. या सगळयाच मागणीच्या दृष्टीकोनातून खरे म्हटले तर सविस्तर विचार होऊनच निर्णय होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

आणि म्हणून जी काही सुस्पष्टता शासनाच्या त्या आदेशांमध्ये नाही ती सुस्पष्टता आणण्याच्या दृष्टीकोनातून शासनस्तरावर आम्ही लवकरात लवकर निर्णय घेऊ असे मला या चर्चेच्या माध्यमातून आपल्याला सांगावयाचे आहे. साधारणपणे चार ते पाच महिन्यांच्या आत याबाबतचे सुस्पष्ट आदेश शासन काढील आणि खंडित हजेरी सहाय्यकांबाबतचा आपला जो काही विचार आहे, पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांबाबतचा जो विचार आहे त्याबाबतच्या सगळया गोष्टी त्या आदेशामध्ये निश्चित प्रकारे अंतर्भूत असतील असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा. शरद पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी सुप्रीम कोर्टाच्या निकालातील एक परिच्छेद वाचून दाखविला आणि त्यामध्ये शासकीय सेवेमध्ये नोकर भरती करीत असताना सर्वच जागांसाठी जाहिरात द्यावी अशा स्वरुपाचे निर्देश दिलेले आहेत असे सांगितले. याचा अर्थ प्रकल्पग्रस्त आणि अनुकंपाखाली ज्यांना आपण नेमणुका देत असतो त्यांना देखील हा नियम लागू आहे काय ? त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, जी टक्केवारी अनुकंपाखालील उमेद्वारांसाठी आणि प्रकल्पग्रस्तांसाठी राखून ठेवलेली आहे ती शासन रद्द करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अनुकंपासाठी कोणतीही टक्केवारी नाही. पूर्वी 5 टक्के अशी टक्केवारी होती. या टक्केवारीचा शासन निर्णय आम्ही रद्द केलेला आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आणि शासनाने वेगवेगळया वेळेस काढलेले शासन निर्णय यामध्ये विसंगती निर्माण झालेली आहे. म्हणूनच शासनाला याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठीच कालमर्यादेमध्ये शासन याबाबतीत विचार करील आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव त्या निर्णयामध्ये होईल असे मी सांगू इच्छितो.

तालिका सभापती (श्री. अनंत तरे) : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई, चंद्रपूर, अमरावती, जालना, अकोला, वाशिम, रत्नागिरी, रायगड, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर या जिल्हयांत साथीच्या रोगाची लागण.

मु. शी. : राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई, चंद्रपूर, अमरावती, जालना, अकोला, वाशिम, रत्नागिरी, रायगड, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर या जिल्हयांत साथीच्या रोगाची लागण या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1957 ला दिनांक 22 मार्च, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई, चंद्रपूर, अमरावती, जालना, अकोला, वाशिम, रत्नागिरी, रायगड, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर या जिल्हयांत साथीच्या रोगाची लागण" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1957 ला दिनांक 22 मार्च, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, याच सदनामध्ये दिनांक 22 मार्च, 2005 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, सुधीर सावंत, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा. फौजीया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, विलासराव शिंदे, विनोद तावडे, प्रा. शरद पाटील, सर्वश्री जयंत पाटील, मधुकर चव्हाण व श्रीमती संजीवनी रायकर यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यामध्ये जो विषय होता तो म्हणजे वेगवेगळया जिल्हयांमध्ये आणि खरे म्हणाल तर महाराष्ट्रव्यापी अशा तऱ्हेचा मलेरिया निर्मुलनाचा जो कार्यक्रम आहे तो केंद्र शासनातर्फे राबविला जातो. केंद्र सरकारला महाराष्ट्र शासनाने कळविले की, आमच्याकडे पुरेसा औषध पुरवठा आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी माननीय सभापतींना कागदपत्रे सादर करुन सदनाला माहिती दिली की, असा जर पुरेसा औषध पुरवठा राज्यात उपलब्ध आहे तर मग आपल्या राज्याने तीन लाख रुपयांची औषध खरेदी का

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक .....

केली ? खाजगी औषध उत्पादकांकडून महाराष्ट्र सरकारने अशा तऱ्हेची जी औषधांची खरेदी केली त्याचे उत्तर दुर्दैवाने 22 मार्चच्या चर्चेमध्ये नंतर आले नाही. दुसरा मुद्दा असा की, माननीय मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये असे सांगितले होते की, डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 या कालावधीमध्ये मलेरिया, डेंग्यु, लेप्टोस्पायरोसीस वगैरे रोगांमुळे एकूण पाच जण मृत्यू पावले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक....

मा.मंत्रिमहोदयांनी चर्चेच्या प्रारंभी उत्तरामध्ये दुरुस्ती केली आणि आणखी 16 जणांचा मृत्यू झाल्याचा उल्लेख केला म्हणजे एकाच महिन्यामध्ये 23 जण मृत्यू पावले. छापील उत्तरात सांगण्यात आले की, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयात साथीच्या रोगाच्या उपचारासाठी आवश्यक असलेली सर्व औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तेव्हा मा.सदस्य श्री.विलासराव शिंदे यांनी या दाव्यालाच आव्हान दिले. मा.मंत्रिमहोदय नामदार रणजित कांबळे यांनी मात्र ठासून सांगितले की, सर्व आरोग्य उपकेंद्रांमध्ये, आरोग्य केंद्रांमध्ये, ग्रामीण व शहरी रुग्णालयामध्ये औषधांचा भरपूर साठा आहे. सभापती महोदया, स्वाभाविकपणे प्रश्न उद्भवतो की, अशारितीने पुरेसा औषधांचा साठा आपल्या महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आहे तर मग आता म्हटल्याप्रमाणे एवढया मोठया प्रमाणावर एक महिन्यात मृत्यू का व्हावेत ? की लोकांपर्यंत ती औषधे पोहोचत नाहीत की आपली सर्व यंत्रणा आहे ती कमी पडत आहे ? त्याहून अधिक दु:खद गोष्ट अशी आहे की, सरकारनेच यापूर्वी जी माहिती दिलेली आहे ती मी जरा सदनाला सांगू चाहतो. जून ते ऑक्टोबर, 2004 या काळात या 10 जिल्हयांमध्ये 17784 लोकांना हिवतापाची लागण झाली, त्यापैकी 26 जणांचा मृत्यू झाला आणि संपूर्ण राज्याचा जर विचार केला तर 39825 लोकांना हिवतापाची लागण झाली त्यापैकी 39 जणांचे मृत्यू झाले. सभापती महोदया, याच काळात 886 लोकांना डेंग्यूची लागण झाली त्यापैकी 9 जणांचे मृत्यू झाले. राज्यात तर 1015 लोकांना डेंग्यूची लागणी झाली त्यापैकी 15 जणांचा मृत्यू झाला. मला स्वाभाविकपणे मा.मंत्रिमहोदयांकडून जाणून घेण्याची उत्सुकता आहे की, जर या संबंधात दुर्दैवाने कळत नकळत एक तर हलगर्जीपणा होत असेल तो आपण कधी दूर करणार आहात ? सभापती महोदया, मी आणखी एका तिस-या पैलूकडे या दोन्ही मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. मा.श्री.संजय दत्त हे मूळ प्रश्नकर्ते सदस्य होते. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, मलेरिया निर्मूलनासाठी हंगामी स्वरुपात फवारणी कर्मचारी नेमण्यात आले आहेत. पण प्रत्यक्षात रायगड जिल्हयात 116 पदे रिक्त आहेत. महाराष्ट्रात तर 5 हजार पदे रिक्त आहेत. मा.सदस्य श्री.संजय दत्त यांनी यासंदर्भात मंत्रिमहोदयांना सवाल केला की, ही पदे केव्हा भरणार आहात ? मा.श्री.रणजित कांबळे बोलले

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

डॉ.अशोक मोडक...

की, रायगड जिल्हयात पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे आणि ही पदे लवकरात लवकर भरण्यात येतील. मी मा.मंत्रिमहोदयांना आठवण करुन देऊ चाहतो. नागपूर अधिवेशनमध्ये दिनांक 16 डिसेंबरला मी याच विषयावर अर्ध्या तासाची चर्चा योजिली होती आणि मला आपल्याला सांगावयाचे आहे की, केवळ त्याच वेळेला नव्हेतर नंतर मंत्रिमहोदयांच्या दालनामध्ये चर्चा झाल्यानंतर परस्पर विसंगत अशी उत्तरे मिळाली आहेत. सभापती महोदया, जरा आपणही शांतपणे विचार करावा. आरोग्य महासंचालकांनी दिनांक 13 जानेवारी, 2004 रोजी एका पत्राचा मसुदा पाठविला होता त्यात असे म्हटले आहे की, रायगड जिल्हयात रिक्त पदे 116 आहेत, भरलेली 144 पदे आहेत आणि एकूण पदे 260 आहेत. येथे आश्चर्याला सुरुवात होते. कारण त्यानंतर 16 फेब्रुवारी, 2004 रोजी त्याच महासंचालकांच्या कार्यालयाकडून पत्र आले त्यात मात्र वेगळी माहिती आहे. त्यात असे म्हटले आहे की, कार्यरत कर्मचारी 306 आहेत आणि अतिरिक्त कर्मचा-यांची संख्या 29 आहे. जरा यातील विसंगती आपण कृपा करुन समजून घ्यावी आणि मला जरा मंत्रिमहोदयांकडून स्पष्टीकरण पाहिजे. जेथे 277 कर्मचारी आवश्यक आहेत तेथे 306 कर्मचारी कामावर आहेत म्हणजे 29 कर्मचारी अतिरिक्त आहेत. ही माहिती 16.2.2004 रोजीची आहे आणि 13.1.2004 च्या पत्रात महासंचालक सांगतात की, रायगड जिल्हयात 116 पदे रिक्त आहेत आणि हेच अधिकारी 16.2.04 च्या पत्रात सांगतात की, 29 कर्मचारी अतिरिक्त आहेत. माझे या अर्धा तासाच्या चर्चेतून तीन प्रश्न आहेत. प्रश्न क्रमांक 1 असा आहे की, मा.सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर तेव्हा मिळाले नाही ते कृपा करुन आता द्यावे. तुमच्या म्हणण्यानुसार व तुम्ही केंद्राला कळविले आहे की, आमच्याकडे औषधांचा साठा भरपूर आहे तर मग 3 लाख रुपयांची औषधे खाजगी औषध कंपन्यांकडून का घेतली आहेत ?

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

(डॉ. अशोक मोडक....)

मा.सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी जो प्रश्न विचारलेला होता त्या प्रश्नाचेही दुर्दैवाने उत्तर आलेले नाही. महाराष्ट्रामध्ये केवळ केन्द्र नाही, उप केन्द्र नाही तर, ग्रामीण रुग्णालये असतील, शहरी रुग्णालये असतील या सर्व ठिकाणी आमची यंत्रणा सुसज्ज आहे असे आपले म्हणणे असेल तर मग सातत्याने गेल्या सहा महिन्यामध्ये हिवतापाची, डेंग्यूची, लेप्टोस्पायरसेसची लागण इतक्या लोकांना का झाली ? इतक्या लोकांचे मृत्यू का झाले ? औषधे आहेत पण कर्मचारी नाहीत, असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? महत्वाचा प्रश्न असा आहे की, विशेषत: रायगड जिल्ह्यामध्ये हंगामी फवारणी कर्मचारी नेंमले जातात. त्यांच्या बाबतीत दुस-या मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, या हंगामी कर्मचा-यांना कायम करण्याचे सरकारचे धोरण आहे. रायगड जिल्ह्यामध्ये हे हंगामी कर्मचारी उपोषणाला बसले होते. त्यावेळी मा.अर्थमंत्री श्री. जयंत पाटील तसेच मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी त्या कर्मचा-यांना आश्वासन देऊन उपोषण मागे घेण्यास सांगितले. त्यांनी त्यावेळी सांगितले होते की, We will make your permanent.. आणि आता अतिरिक्त किती आणि रिक्त किती असा घोळ चाललेला आहे. आपण कृपाकरुन या हंगामी कर्मचा-यांच्या जिवाशी खेळू नका. या कर्मचां-यांना आपण पर्मनन्ट कधी करणार आहात ? माझ्या तीन प्रश्नांची उत्तरे मा. मंत्री महोदयांनी द्यावीत एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : मा.सदस्यांच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर मी पहिल्यांदा देतो. हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनामध्येही मांडला गेला होता. त्यावर चर्चा देखील झाली होती. या प्रश्नाच्या बाबतीत नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे मी आपणास सांगतो. मलेरिया डिपार्टमेंटमध्ये सर्व टेम्परररी वर्कर्स काम करीत होते. ते डिपार्टमेंट सार्वजनिक आरोग्य विभागाकडे होते. त्यानंतर 73व्या दुरुस्तीमध्ये काही डिपार्टमेंट जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचे ठरले. मलेरिया डिपार्टमेंट जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये घेण्यात आला. जेव्हा हा निर्णय झाला त्यावेळी सर्व मल्टीपर्पज वर्कर्स स्टेट डिपार्टमेंटचे होते. पदांचा आढावा घ्यावयाचा होता. जिल्हा परिषदेने प्रत्येक सबसेंटरमध्ये एक मल्टीपर्पज वर्कर असला पाहिजे अशा प्रकारचा निर्णय घेतला आणि जिल्हा परिषदेने आपल्या स्तरावर काही मल्टीपर्पज वर्कर्सची भरती करणे सुरु केले होते. आरोग्य विभागाचा आढावा चालू होता म्हणून त्यांनी पदे हस्तांतरित केली नाहीत. आज परिस्थिती अशी आहे की, स्टेट डिपार्टमेंटचे वेगळे मल्टीपर्पज वर्कर्स आहेत आणि जिल्हा परिषदेचे वेगळे मल्टीपर्पज वर्कर्स आहेत. एका सबसेंटरमध्ये एकच मल्टीपर्पज वर्कर असला पाहिजे असे जिल्हा परिषदेचे धोरण आहे. रायगड जिल्ह्याचा जो प्रश्न आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, तेथे एकूण 293 सबसेंटर्स मंजूर झालेली आहेत. स्टेट सेक्टरचे 163 वर्कर्स आहेत आणि लोकल सेक्टरचे, म्हणजे जिल्हा परिषदेचे 130 वर्कर्स आहेत. त्यामध्ये 13 वर्कर्स अर्बनमध्ये काम करतात. म्हणजे एकूण 290 मल्टीपर्पज वर्कर्स आहेत. जिल्हा परिषदेचे 277 सबसेंटर्स आहेत. अर्बन सेक्टरमध्ये 13 पदे आहेत. आज आपल्याकडे 293 मल्टीपर्पज वर्कर्स आहेत. म्हणजे 3 वर्कर्स एक्स्ट्रा आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकूण सबसेंटर्स 9728 आहेत. अर्बनमध्ये 881 सबसेंटर्स आहेत. एकूण जागा 10609 आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

सभापती महोदय, 9980 पदे मंजूर आहेत. या ठिकाणी विचारले गेले की, ही पदे केव्हा भरली जाणार आहेत त्याबाबतीत माहिती सांगू इच्छितो की, सदर पदे भरण्यासंबंधीचा आढावा चालू आहे. आम्हाला असे दिसून आले आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात 629 पदे आहेत. महाराष्ट्र राज्यात नवीन सब सेंटर्स 750 निमाण करण्यात येणार असून मंत्रिमंडळाच्या बैठकी समोर यासंबंधीची फाईल जाणार आहे. त्या सब सेंटर्सला मंजुरी मिळाल्यानंतर 1379 पदे निर्माण होणार आहेत. ती आम्ही नंतर भरणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : मी थोडी माहिती या ठिकाणी विचारु इच्छितो. मल्टीपर्पज वर्कर म्हणजे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय,हा प्रश्न वेगळा आहे.

डॉ. दीपक सावंत : मल्टीपर्पज वर्कर म्हणून तुम्ही भरती करीत आहात. What kind of work you are giving to them?

श्री. रणजित कांबळे : सर्व प्रकारची कामे करणारे ते कर्मचारी आहेत. सर्व्हे करण्याचे काम ते कर्मचारी करीत असतात. They do the work which a temporary worker uses to do.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, केवळ हा माझाच प्रश्न नाही. 22 मार्च,2005 रोजी श्री.विलासराव शिंदे यांनी हाच प्रश्न विचारला होता की, रायगड जिल्हयात 116 पदे रिक्त आहेत.आता मी आपल्याला काय म्हणणार आहे ते आपण कृपया ऐकून घ्या. 13 जानेवारी आणि 16 फेब्रुवारीच्या पत्राचा घोळ चालला आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने काही प्रमाणात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न फारच वेगळा आहे.116 कर्मचारी उपोषणाला बसले होते. त्या कर्मचा-यांना मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. The Hon. Minister may please try to understand. सभापती महोदय, अनंतकाळी मला काळजी अशी वाटते की,...

श्री.रणजित कांबळे : शेवटी आम्हाला 1631 पदे भरावयाची आहेत. ज्या ज्या जिल्हयात पदे रिक्त आहेत ती पदे आम्ही भरणार आहोत. ज्या ठिकाणी जास्तीची पदे आहेत ती पदे आम्ही इतरत्र वर्ग करणार आहोत. And, they will be accommodated. संपूर्ण महाराष्ट्रात 250 पदे शिल्लक रहाणार आहेत. या एक्सेस कर्मचा-यांना वेगळया जिल्हयात सामावून घेण्यात येणार आहे. That is the only alternative we have as of today.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : जर त्यांच्याकडे अतिरिक्त पदे नसतील त्यांनी पहिल्यांदा 116 कामगारांना कंत्राटी तत्वावर वा टेंपररी बेसीसवर का घेतले ? आता ते लोक उपोषणाला बसल्यानंतर त्यांना मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, तुम्हाला आम्ही सामावून घेऊ. कंत्राटी कामगार हा एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात जाईल काय हा बेसीक प्रश्न आहे. रायगड मधील कामगारास सांगली येथे टाकले तर त्याचे कुटुंब कुठे जाणार ? त्यांना एवढा पगार नसतो की, तो आपले कुटुंब घेऊन त्या ठिकाणी जाऊ शकेल. You have to accommodate them in the same district.

श्री. रणजित कांबळे : कंत्राटचा अर्थ असा आहे की, ज्यावेळेस विभागाचे काम निघते त्यावेळी त्यांना कामावर घेत असतो. हे कर्मचारी ठराविक कालावधीपूरते कामावर ठेवण्यात येत असतात. ते कायम स्वरुपी कर्मचारी नसल्यामुळे त्यांची जबाबदारी शासनाची नाही. त्या कामगारांची अशी मागणी होती की,आम्हाला सेवेत कायम करा. On sympathetic ground, त्या कामगारांचा विचार केला गेला. त्याप्रमाणे आम्ही त्यांना आम्ही विचार करु अशा प्रकारचे आश्वासन दिलेले आहे. सध्या आमच्याकडे पदेच शिल्लक नाहीत तर आम्ही त्यांना कसे भरती करणार ?

डॉ. अशोक मोडक :18 ऑगस्ट,2004 ला रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना आरोग्य सेवेच्या सह संचालकांनी पत्र पाठविले आहे हे आपल्याला माहिती आहे. त्यात त्यांनी स्वच्छ शब्दात असे म्हटले आहे की, मघाशी उल्ले्ख केला तोच उल्लेख आहे. ते म्हणतात 115 पदे रिक्त आहेत. दुसरी आकडेवारी सांगते 116 पदे रिक्त आहेत..

तालिका सभापती : सभागृहाची वेळ सायंकाळी 7.30 वाजेपर्यन्त वाढविण्यात आली होती. आता 7.30 वाजले आहेत. त्यामुळे सभागृहापुढील कामकाज संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : आरोग्य संचालनालयाने जे पत्र पाठविले आहे त्याच्या शेवटी काय म्हटले आहे ते कृपा करुन मंत्रीमहोदयांनी समजून घ्यावे. पत्राच्या शेवटी असे म्हटले आहे की, सदर प्रकरण हे आपल्या आस्थापनेअंतर्गत असल्याने खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संदर्भ तीन अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधीन राहून पदे भरण्याबाबत आपल्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा. माझे म्हणणे असे आहे की, एका बाजूला दोन मंत्री त्यांना आश्वासन देतात,कोर्ट त्यांच्या बाजूने निर्णय देत आहे आणि आरोग्य संचालनालय त्यांना सांगत आहे. असे असताना आपण या लोकांना वा-यावर का सोडता ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शेवटी ही पदे जिल्हा परिषद भरते आणि जेवढी आवश्यकता आहे,जेवढी पदे आहेत तेवढीच भरती होणार आहे. आपण जे वारंवार सांगत आहात की त्यांना नोकरीवर घ्या हे माझ्या लक्षात आले आहे. पण जेव्हा पदेच नाही तर कसे नोकरीवर घेणार ? मी कोणतेही आश्वासन देणार नाही....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आरोग्य खात्याच्या संचालकांनी असे कळविले की, 115 पदे रिक्त आहेत. 115 पदे रिक्त आहेत असे ते म्हणतात आणि आपण म्हणता ही पदे अतिरिक्त आहेत हा फरक लक्षात घ्या. महत्वाचा मुद्दा असा की, 115 पदे रिक्त आहेत असे ते कळवीत असताना सुध्दा You say that there are vacancies. In those vacancies you will accommodate the persons who are there. It means you will accommodate them as and when vacancy arises. . त्यांचे पत्र असे म्हणते की जागा आहेत आणि म्हणून तुम्ही त्यांना का सामावून घेत नाही याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जेव्हा हा विभाग हस्तांतरित झाला तेव्हा स्टेट सेक्टरने आपली पदे तशीच ठेवली आणि जिल्हा परिषदेने भरती केली त्यासाठी हा विभाग जिल्हा परिषदेकडे गेला होता. आपण कितीही म्हटले की पदे आहेत तरी मी आपल्याला स्पष्ट सांगतो की, डीजी एचएस यांना पत्र देण्याचा अधिकार नाही. We have categorically informed them. हे प्रकरण फार जुने आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदय सांगतात की आमच्याकडे पदे नाहीत आणि तसे पत्र देण्याचा अधिकार नाही असे ते सांगत आहेत तर संबंधित अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, It was a genuine mistake at that time. मी मा.सदस्यांबरोबर बैठक घेतली आणि ग्राम विकास खात्याचे जे मंत्री आहेत श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याबरोबर सुध्दा बैठक झाली. त्यावेळी आरोग्य महासंचालक होते. त्यावेळी आम्ही स्पष्ट सांगितले की, या कर्मचा-यांना कसे सामावून घ्यावयाचे ही आमची प्रायॉरिटी होती. 10000 कर्मचारी आहेत त्यातून 250 कर्मचारी लोकल सेक्टरमध्ये शिल्लक राहणार. 250 आहेत त्यांना अर्बनमध्ये त्याच जिल्हयात ॲडजेस्ट करणार किंवा शासनाला अशी शिफारस करणार की कोणत्या ना कोणत्या विभागात या लोकांना ॲडजेस्ट करा. त्याच जिल्हयात ॲडजेस्ट करा. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 750 पदे निर्माण होणार आहेत त्याची प्रोसेस चालू झालेली आहे. प्रोसेस पूर्ण होण्यासाठी जवळजवळ सहा महिने लागणार आहेत.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : त्या ठिकाणी जे 116 लोक उपोषणाला बसलेले आहेत होते किंवा जे कोणी उपोषणाला बसलेले होते त्या लोकांना येत्या सहा महिन्यात येथे ना तेथे कोठे तरी जिल्हयात अकॉमोडेट करणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : काही एक्सेस मल्टीपरपज वर्कर्स आहेत. मल्टीपरपज वर्कर्सची पदे भरलेली आहेत.सन्माननीय सदस्य जे बोलत आहेत ते टेम्पररी पदासंबंधी बोलत आहे. दोन्हीमध्ये हा फरक आहे.

डॉ.विमल मुंदडा :सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी पूर्ण माहिती दिलेली आहे.शासनाचा 19 मार्च 2003 चा एक जी.आर. आहे त्याप्रमाणे एम.पी.डब्ल्यू. च्या नियमित जागा भरत असतांना 50 टक्के जागा जे कोणी हंगामी कर्मचारी आहेत त्यांच्यामधून भरण्याची कार्यवाही आम्ही करणार आहोत.पदांचा आढावा घेण्याचे काम चालू आहे.अनुशेषाच्या अंतर्गत 373 पदे आम्ही भरलेली आहेत.सन्माननीय सदस्यांनी रायगड जिल्हयाच्या बाबतीत माहिती विचारली असून सन्माननीय राज्यमंत्र्यांनी त्यांना ही माहिती दिलेली आहे. जी एक्सेस पदे आहेत त्या पदाच्या बाबतीत सिनिऑरिटीप्रमाणे जेथे जेथे ॲडजेस्ट करता येतील त्याप्रमाणे इतरही भागात त्यांना अकॉमोडेट करुन घेण्याची कार्यवाही आम्ही निश्चितपणे करु.

श्री.अरविंद सावंत :सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. हे लोक नक्की किती आहेत हे सांगण्यात यावे. सन्माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की हे कोणते 116 लोक आहेत ? त्याचा नक्की आकडा मी सांगू शकत नाही. मल्टीपरपरज वर्कर्स म्हणून आम्ही जेवढे घेतलेले आहेत तेवढेच हे लोक आहेत आणि बाकीचे आणखी कोणी असतील तर ते टेम्पररी असतील. रेग्युलर पध्दतीने त्यांना अपॉईन्ट केले जाते असे माननीय राज्यमंत्र्यांचे म्हणणे आहे.सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक 115 किंवा 116 चा आकडा सांगत आहेत तेव्हा हे क्लिअर व्हावयास पाहिजे की ,मल्टी परपरज वर्कसची नक्की संख्या किती आहे ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांच्या आकडया प्रमाणे रायगड जिल्हयामध्ये मंजूर पदे 494 आहेत परंतु प्रत्यक्षात तेथे फक्त 290 पदे आहेत .त्याचबरोबर तेथे 293 पदे भरलेली आहेत.त्यामुळे आज तेथे तीन पदे एक्सेस आहेत.त्याबाबतीत मी वारंवार सांगत आहे की, त्या जिल्हयामध्ये एक्सेस पदे आहेत. संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र आपल्यासमोर मी ठेवले होते व त्यासदर्भात आपल्याला माहिती दिली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : वेटींग लिस्ट किती आहे ?

श्री.रणजित कांबळे :वेटींग लिस्ट नाही.

डॉ.अशोक मोडक :खाजगी उत्पादकांकडून औषधे का मागितली याचे समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही.तेव्हा त्याचे उत्तर देण्यात यावे.

(उत्तर दिले नाही)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :विदर्भातील साखर उद्योगाकडून 16 हजार कोटी रुपयांच्या कर्जाची वसुली करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई

मु.शी : विदर्भातील साखर उद्योगाकडून 16 हजार कोटी रुपयांच कर्जाची वसुली करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3235 ला दिनांक 21 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

<u>माननीय गृह निर्माण राज्यमंत्र्यांना करावयाच्या निवेदनाबाबत</u>

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात माननीय उपसभापतींनी दिलेल्या निदेशाप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण आता सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी उद्या निवेदन करावे.

श्री.दयानद मस्के : ठीक आहे

तालिका सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 30.3.2005 रोजी सकाळी 10.30 ते 12.30 पर्यन्त सभागृहाची खास बैठक भरेल व त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रो 7 वाजून 38 मिनिटांनी,बुधवार, दिनांक 30.3.2005 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही